स्त्री मनाची हळवी साथीदारी...

# सखी सांवादिका



दिवाळी विशेषांक २०२६

: संपादक :

विशाखा विलास पवार

ओम पब्लिकेशन

स्वागत मूल्य रु. २३०/-

With best
compliments from

# Balaji Chavan And Company



# With best compliment from

# M.C.CHANDANANI CONST.CO

## REGD.GOVT.CONTRACTORS

"Committed to Superior Quality and Results"

**Spl. In: Road Construction, Hot Mix - Hot Laying of BM, AC & Ready Mix Concrete (RMC)**




OFFICE: A-212, Woodland Complex, New Link Road, Furniture Bazar, Ulhasnagar-3
PLANT: Survery No.35/6, Maharalgaon, Kalyan-Murbad, Post Varap, Kalyan.
Email : mcchandnani@gmail.com

दिवाळी विशेषांक २०२६

स्त्री मनाची फुलवा रांगोळी ...

# सखी संवादिका




-: संपादक :-

विशाखा वि.पवार



प्रकाशन : ओम पब्लिकेशन





**ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- ६९३०९१९७ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला.**



**अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.**



**Email -** info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com



# अंतरंग



## कथा


१ .पंख लाभले स्वातंत्र्याचे - साधना राजेंद्र झोपे..... ०५
२ .वलयापलीकडे - माधुरी चौधरी..... १३
३ .सखी शेजारीणी - सुनिता देहेरकर..... १९
४ .घरातील देवता - प्राजक्ता आनंद हेदे ..... २३
५ .तडजोड जगण्यातली....- वर्षा प्रदिप ब्रम्हपुरकर..... ३३
६ .अनपेक्षित - सुचित्रा अशोक कुंचमवार..... ३७
७ .माझी प्रिय मावशी - सुहासिनी मानकामे..... ४१
८ .वचन - नेहा उजाळे..... ४५
९ .पुन्हा जुळलेले रेशीमबंध - जया सुधाकर पाटील..... ४९
१० .मुके प्राणी - वैशाली नेरकर ..... ५९
११ .छंद माझा वेगळा - भारती सावंत..... ६१


## लेख


१२ . हरवत चाललेला कौटुंबिक संवाद-कविता झुंजारराव..... ६५
१३ . जरा जिवंतिका-सरोज सुरेश गाजरे..... ६९
१४ .नेल पॉलिशची गंमत- ओमनी फिचर्स..... ७३
१५ . स्त्री- भारती सावंत..... ७५
● काव्यसृष्टी..... ७९
● पाककृती..... ८३




# संपादकीय...

## सण–उत्सव आणि महिला


सण–उत्सव आणि महिला जन्मापासूनच एका सुंदर धाग्याने बांधल्या गेल्या आहेत. सण म्हटलं म्हणजे सर्वांत पहिले आनंदाची लहर घरातील महिलेच्या चेहऱ्यावर दिसते. सणांची तयारी महिला आधीपासूनच सुरू करतात. वर्षभरातील सगळे सण, कुणाचातरी साठावा वाढदिवस, मुंज, लग्न, बारसं, साखरपुडा अशा विविध कार्यक्रमांची पूर्तता आनंदाने व्यवस्थित पद्धतीने त्या करत असतात. शिवाय घराण्याची परंपरा ,कुळाचार हे तर तिच्या रक्तात मध्ये असतं. त्यासाठी तर त्या सदैव तत्पर असतात. त्यात आपण स्वतःहून ओढून घेतलेली गोष्ट म्हणजे वरील सर्व गोष्टी, इव्हेंट हे सार 'लार्जर दॅन लाईफ' पद्धतीने साजरे करणे. त्यासाठी आपण पैशाचा खर्च, वेळ,मनुष्यबळ किती वापरतो ह्याचा विचारच करत नाही. पूर्वीही हे सगळं केलं जात होतं. पण तेव्हा एकत्र कुटुंब पद्धती होती. घरातील सर्व स्त्रिया एकत्र येऊन हे सगळं करत असत.

आजसारखी त्यावेळी महिलांना बाहेरची कामं,ऑफिस,मुलांचे प्रोजेक्ट,नवऱ्याच्या कामात मदत, बँकेचे क्लिष्ट व्यवहार अशी अधिक कामे नव्हती. आता महिलांचे कार्यक्षेत्र विस्तारत चालले आहे. त्यांचा तणावही तितकाच वाढला आहे.' हो हो मान्य आहे,' तो कमी करण्यासाठी आपण सण आणि उत्सवात आनंदाने सहभागी होतो. पण खरंच विचार करा. ह्या सगळ्या धावपळीमध्ये, 'सुपरवुमन' होण्याच्या नादात आपण आपल्यातल्या 'तिला' विसरून चाललो आहोत. आपल्या जीवनातील कितीतरी सुंदर क्षण कृत्रिम पद्धतीने जगत आहोत. वेळेचं नियोजन करून बरीच कामं आपण सहज करतोही, तरी काही गोष्टी राहून जातात. हे सर्व करताना आपण खूप थकून जातो. कधी कधी कार्यक्रमाहून परत आल्यावर घरातील कामे पूर्ण न झाल्यामुळे आपली स्वतःची किती चिडचिड होते. त्याला कोणी दुसरं जबाबदार नसतं, आपणच असतो. आपल्या क्षमतेपेक्षा अधिक काम आपण कायमस्वरूपी आपण वाढवली आहेत. ती कोणीही आपल्यावर लादली नाहीत. मग प्रश्न पडतो हे सारं कश्यासाठी करतो आपण? थोडं दमाने घेऊ. दोन कार्यक्रम कमी करू. एखादा सण उत्सव कमी धामधूमीत साजरा करू. दुसऱ्या कोणाला वेळ नाही दिला तरी चालेल; पण आपण स्वतःला थोडावेळ देऊ. मनाचे हितगुज अंतरमनाशी करू. बघा काय मिळतं ते! नाही नाही.. मी तुम्हाला एकटं राहायला नाही सांगत आहे. एकदा स्वतःशी शांत गप्पा मारून तर बघा. काय सांगते तुमच्या आतली 'ती'?

**चला तर, तिच्याबरोबर गप्पा मारू आणि तिच्यासोबत सगळ्यांबरोबर लखलख तेजाची, प्रकाशाची ही दिवाळी आनंदाने साजरी करू....**

**दिवाळी निमित्त लक्ष लक्ष शुभेच्छा!**


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
दिव्यांची परंपरा...
स्वप्नांची नवी दिशा.
हा दीपोत्सव आपल्या आयुष्यात
प्रकाश, आनंद आणि समृद्धी
घेऊन येवो.
आपणांस व आपल्या परिवारास
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
www.tjsb.bank.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466



# पंख लाभले स्वातंत्र्याचे

- साधना राजेंद्र झोपे

**त्यांनी खूप खोदून खोदून विचारल्यावर सुमेधाने आपण सहलीला येण्याचे रद्द करत आहोत असे सांगितले कारण सांगितले नाही,पण निर्मलाताईंना एकंदर परिस्थिती लक्षात आली. दुसऱ्याच दिवशी त्यांनी केतकीला भेटायला बोलावले.**

'शशांक,केतकी, तुमची झोप झाली की मला तुमच्याशी थोडं बोलायचे आहे. मी यासाठी तुम्हाला आधी सांगितले की, तुम्ही रविवारी बाहेर जायचा परस्पर प्लॅन करता. मग सांगायचे राहून जायला नको' सुमेधा बोलली.

शशांकने खुणेनेच त्याच्या बाबांना, विजयरावांना विचारले,पण त्यांनी 'काय माहीत' अशा अर्थाने खांदे उडवले.

'आई, तुला काय बोलायचे ते तू आत्ताही बोलू शकतेस'

'नाही आत्ता नको. तुम्हालाही झोप येत आहे आणि मला पण जरावेळ झोपायचे आहे.'

'ठीक आहे' असे म्हणत शशांक आणि केतकी त्यांच्या रुममध्ये झोपायला निघून गेले. ते निघून गेलेले बघून विजयराव सुमेधाला म्हणाले, 'काय सांगायचे तुला? कशाला मुलांना उगाच विचार करत बसायला लावतेस?'

'रावसाहेब, तुम्ही पण जरा धीर धरा. मी पण जरावेळ जाऊन पडते. तुम्हीपण आराम करा.'

इकडे रुममध्ये आल्यावर केतकी शशांकला म्हणाली,

'काय सांगायचे असेल आईना?'

'तू नको विचार करू जास्त. बाबांना पण नाही माहीत. बाबा आहेत ना आपल्या बाजूने. आज तू पण सकाळ पासून काम करून दमली आहेस. झोप तू पण जरावेळ. माझे पण तुझ्या हातची चिकन करी खाऊन पोट खूप भरलंय. ती चिकन करी डोळ्यांवर

आली आहे.'

'शशांक, एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का? आई आज अजिबात किचनमध्ये आल्या नाहीत.'



'हो आलंय लक्षात, पण तू नको लक्ष देऊस. आज नसेल वाटले तिला काम करावंस. रोज देते ना आयते!'

'हो पण...'

'नको ना बाई जास्त विचार करू. मला खूप झोप येत आहे. मी झोपतो, तू पण झोप.' आणि खरंच शशांक झोपला पण! केतकीपण विचार करत करत झोपून गेली. विजय आणि सुमेधा पण झोपले. पण सुमेधाला 10 मिनिटांतच जाग आली. असंही ती कधीच अर्ध्या तासाच्या वर झोपत नसे. सुमेधा पलंगावरच भिंतीला टेकून बसली. तिच्या मनात विचार आला की, आता रावसाहेब एक दीड तास उठणार नाहीत. ती डोळे बंद करून मनातल्या मनात दुपारी सर्वांशी कसे बोलायचे त्या शब्दांची जुळवाजुळव करत बसली. तिला सुरुवातीपासूनच कोणालाच असं एकदम बोलायची सवय नव्हती. कुणी तिला बोलले तरी ती उलट उत्तर देत नसे. त्याच्याच फायदा सर्वांनी घेतला. शेवटी मनाशी एक पक्का निश्चय केला की, आज आपण बोलायचेच काहीही झाले तरी. त्या हॉलमध्ये आल्या. सकाळी रावसाहेबांच्या हातात पेपर असतो त्यामुळे त्या नेहमीच दुपारी निवांत पेपर वाचत असत. आजही सुमेधा नेहमीसारखी निवांत पेपर वाचत बसली होती. साधारण साडेतीनच्या सुमारास विजयराव आले. नेहमी रावसाहेब उठल्यावर सुमेधा दुपारचा चहा आणि थोडंफार खायला बनवत असत. क्रिश त्यांचा नातू त्याला पण खायला हवं असायचे काहीतरी. पण आज मात्र सुमेधा निवांत पेपरच वाचत बसली. पेपर फक्त बाजूला करत ती म्हणाली,

'काय झाली झोप?'

' हो?,पण तुमचं काय चालले आहे. निवांत पेपर वाचन सुरू आहे. आज

किचनमध्ये काही काम नाही वाटते?'

'माहीत नाही.'

'काय? किचनमध्ये काही काम आहे की नाही हे तुम्हाला माहीत नाही' ते आश्चर्यचकित होत म्हणाले. या त्यांच्या बोलण्यात चार वाजले. घड्याळाकडे बघत विजय म्हणाले,

'मॅडम,आज चहा करण्याचा विचार नाही का?'

'थांबा हो जरावेळ, उठू द्या तुमच्या सूनबाईला, ती करेल सर्वांचा चहा आणि आज काय एकदम मॅडम!'

'मग काय म्हणून, तुम्ही एकदम मॅडमच्या थाटात वावरत आहात आज. काय तुम्ही पण रिटायरमेंट घेतली का? पण नाही तुम्ही तर म्हणता की, आम्ही बायका कधीच रिटायर होत नाही घरकामातून.'

'होच मुळी. आम्ही कधीच रिटायर होऊ शकत नाही घरकामातून, पण सुट्टी तर घेऊ शकतो.'

'चला म्हणजे एकंदरीत तुमची सुट्टी आहे म्हणावी आज. ठीक आहे...'

यावर सुमेधा फक्त हसली. एक दिवस काम नाही केले तर लगेच बोलून दाखवले. पण रोज अगदी सगळ्यांचे सगळे वेळच्यावेळी व्यवस्थित करते. याचे कधी कौतुक करावेसे वाटले नाही?

'पण मी काय म्हणतो, त्या केतकीला बिचारीला एक दिवस सुट्टीचा मिळतो, एक दिवस आराम करावासा वाटतो.त्याचा साधा विचारही आला नाही का?'

'बरोबर आहे रावसाहेब तुमचे. पण माझे काय? मी एक दिवसही सुट्टी न घेता काम करते. अगदी मला बरं नसतांनाही ते नाही कधी लक्षात येत. नोकरी करणारी स्त्री सर्वांना दिसते पण गृहिणीचे काय?'

'आज जरा अतीच होतंय.'

सुमेधाला भयंकर राग आला पण नेहमीप्रमाणे ती आताही गप्प बसली. जरावेळाने केतकी आणि शशांक आल्यावर विजयराव केतकीला म्हणाले, 'केतकी,चहा करते का?'

केतकीने किचनकडे बघितले, तर तिथे सगळेच शांत होते आणि सासूबाई निवांत बसलेल्या होत्या. केतकीने नाराजीनेच चहा केला.ती चहा पिता–पिता म्हणाली, आई, तुम्हाला काहीतरी सांगायचे होते ना?

'हो, आधी निवांत चहा पिऊन घे मग सांगते.'

सर्वांचा चहा पिऊन झाल्यावर सुमेधा बोलू लागली,

'मी आजवर कधी घराबाहेर पडली नाही. तुमचे सर्वांचे काही ना काही कारणाने बाहेर जाणे होते.'

'जास्त प्रस्तावना करू नको, काय ते लवकर सांग आणि हो आम्ही बाहेर जातो ते

कामानिमित्त.'

'बरोबर आहे तुम्ही कामानिमित्त जातात. जरी मित्र, मैत्रिणींसोबत गेले तरी. असो. मला सांगायचे आहे की, आमची महिला मंडळची सहल केरळला जाणार आहे. तिथून अजून आसपासची काही ठिकाणही आम्ही बघणार आहोत. अशी साधारण येऊन जाऊन १०-१२ दिवस लागणार आहे.'

'माझी परमिशन नाही आणि पैसे काय झाडाला लागतात.' विजयराव बोलले.

'पैसे झाडाला लागत नाही हे मला पण माहिती आहे. मी परमिशन मागत नाही, सांगते आहे. मी ऑलरेडी पैसे भरलेत.'

'बरं का? मला न विचारताच आणि पैसे कमावण्यासाठी कष्ट करावे लागतात.'

'बरोबर आहे पैसे कमावण्यासाठी कष्ट करावे लागतात आणि मी कधीपर्यंत तुमची परमिशन घेत राहू. न सांगता तर जात नाही.'

'पुरे झाली तुमची हुशारी. ते पैसे परत मागून घ्या.'

'आणि आई, क्रिशचे कसे होणार?'

एवढा वेळ गप्प बसलेली केतकी बोलली

'अग केतकी, तुझ्या आईला बोलवू.' शशांक म्हणाला

'वा रे शशांक, तिकडे ओजस नाही का?'

'अरे हो.'

'अरे वा, मी जर घरी राहून काहीच



करत नाही तर हा प्रश्न यायलाच नको.' आज सुमेधाचा तोल सुटला.

'सुमेधा, तू अती बोलतेय. मी एकदा नाही सांगितले म्हणजे नाही.'

'ते शक्य नाही. केतकी, तू सकाळी आरामशीर आवरून जाऊ शकतेस आणि क्रिशला स्कूल बसपर्यंत पोहचवण्याचे आणि आणण्याचे काम तुझे सासरे करतील.'

'मला शक्य नाही. सकाळी मी

फिरायला जातो.'

'अहो,10–12 दिवस नका जाऊ.'

विजयरावांना सुमेधाचे बोलणे ऐकून आश्चर्य वाटले, इतकी वर्षे काही न बोलणारी आपली बायको इतके निर्णय घेऊ शकते? आता आपल्यावर काम पडणार या विचाराने केतकी धुसफुसत आपल्या खोलीत निघून गेली.सुमेधापण बाल्कनीत येऊन बसली. तिच्यापाठोपाठ विजयराव आले आणि त्यांनी रागातच विचारले,

'हे काय चालवलं आहेस तू?'

'जे मला फार आधीच करायला हवं होतं!संसाराला मी माझ्या पदराला बांधून ठेवले होते आणि तो ओढता ओढता मी पार थकून गेले, म्हणून ती गाठ सोडायची ठरवली मी.'

'तू ओढत होती संसार? आणि मी काय माश्या मारत होतो का?'

'नाही हो, माझे अजिबात असे म्हणणे नाही. संसार आपल्या दोघांचा आहे. फक्त एवढंच की मी गाठ बांधून ठेवली. ती आता फक्त थोडी सैल करायची आहे. मलाही मोकळा श्वास घ्यायचा आहे. जोपर्यंत मी तुमच्या सर्वांच्या गरजा पूर्ण करायचं ठरवलं तर सर्वजण माझा एवढा राग का करत आहेत? जरा शांत बसून माझ्या ठिकाणी स्वत:ला ठेवून आपल्या आयुष्याचा पूर्ण चित्रपट आठवा.'

विजयराव रागारागाने निघून गेले. सुमेधा बाल्कनीत बसून राहिली. जरावेळाने क्रिश तिच्याजवळ आला आणि तिला म्हणाला,

'आजी, तू पिकनिकला जाते आहे?'

'हो रे बाळा, पण तुझी गैरसोय होईल'

'अग आजी, मी आवरतो की माझे माझे. तू नको टेंशन घेऊ, मस्त मजा कर.'

'हो रे बाळा'

क्रीश गेल्यावर संध्याकाळच्या जेवणाचे बघावे या विचारात सुमेधा स्वयंपाक घरात आली. त्या काम करू लागल्या तर केतकी रागातच आली आणि त्यांच्या हातातले काम घेऊन ती काम करू लागली. शेवटी सुमेधा परत हॉलमध्ये येऊन बसली. रात्रीचे जेवण मुक्यानेच झाले. पहाटे तिला जाग आली तिने बघितले तर विजयराव बिछान्यावर नव्हते. ते कुठे गेले हे बघण्यासाठी सुमेधा बाहेर आली तर सकाळी सकाळी केतकी किचनमध्ये काम करतांना दिसली. त्यांना आश्चर्य वाटले. त्या फ्रेश होऊन तिला मदत करु लागल्या तर ती त्यांना कोणत्याच कामाला हात लावू देत नव्हती. सुमेधाने मग जास्त लुडबुड न करता हॉलमध्ये येऊन बसली. विजयराव फिरून आल्यावर सुमेधा म्हणाली,

'तुमच्यासाठी चहा बनवते.'

सुमेधा उठणार तेवढ्यात ते केतकीला म्हणाले,

'केतकी, मी शशांक सोबतच चहा घेईन.'

सुमेधाला वाईट वाटले. तिला जाणवले की, घरातल्या सगळ्यांनी आपल्याशी अबोला धरला आहे. असेच दोन तीन दिवस गेले. त्या सारख्या विचार करत की, मुलगा आणि सुनेचे एकवेळ ठीक आहे, पण नवराही असा वागतो. त्यानंतर सुमेधा जास्तीत जास्त खोलीत राहू लागली; नाही तर मंदिरात. पण कुणीच आपली नाराजी सोडत नव्हते. एकटा क्रीश तेवढा बोलत असे. शेवटी स्वतः चे मन मारत, घरच्यांच्या समाधानासाठी तिने सहलीला जाण्याचे रद्द करण्याचे ठरवले. पण सुमेधाची ही विचंचना निर्मलाताई म्हणजे केतकीच्या आईच्या नजरेतून सुटली नाही. त्यांनी खूप खोदून खोदून विचारल्यावर सुमेधाने आपण सहलीला येण्याचे रद्द करत आहोत असे सांगितले. कारण सांगितले नाही, पण निर्मलाताईंना एवंदर परिस्थिती लक्षात आली. दुसऱ्याच दिवशी त्यांनी केतकीला भेटायला बोलावले.



'काय ग केतकी, घरी काही प्रॉब्लेम आहे का?'

'अरे हो ना'

'काय?'

'अग, माझ्या सासूबाईंनी मोठा घोळ करून ठेवला आहे.'

'हो का? पण काय घोळ घातला आहे?'

'अग, त्या म्हणे केरळला सहलीला जायचे त्यांना. पैसे पण भरून ठेवले आहेत.'

'हो का?'

'बघ तर. घरात सगळेच चिडलेत त्यांच्यावर. कुणीच बोलत नाही.'

' अरे वा. खूप छान. होतील सरळ मग.'

'मग काय तर'

'पण केतकी, एक सांगू?'

'अग बोल की'

' त्या सहलीला मी पण जात आहे. पण आमच्याकडे कुणीच हरकत घेतली नाही. तुझी वहिनी तर माझ्यासाठी खरेदी पण करत आहे.'

'काय सांगते?'

'हो. पण तू नको काळजी करू, तुझी सासू सहलीला येण्याचे रद्द करत आहे.'

केतकीला आनंद झाला.

'काय सांगते काय आई, मी आता घरी जाऊन ही बातमी सासऱ्यांना आणि शशांकला सांगते. माझे बाई किती मोठ टेंशन कमी केले तू'

'हो ग, पण केतकी, तुमच्या घरातले तुम्ही लोक एवढे स्वार्थी असणार असे वाटले नव्हते ग मला.'

'आई'

'हो,तू आणि शशांक मस्त फिरायला जाता.तुझे सासरे ते पण दूर निमित्ताने फिरायचे. हे का मला माहीत नाही! तुझ्या सासूने मात्र कुणाच्या आनंदात अडथळा आणला नाही आणि त्यांनी सहलीला जायचे म्हटले तर एवढा आकांडतांडव का? त्यांनी त्यांची हौस पूर्ण करूच नये का? आयुष्यभर त्या घरातल्या सर्वांचे करत होत्या ते दिसले नाही का कधी तुम्हाला कुणाला. त्या तुमचेच काय पण; त्यांनी माझेही खूप केले आहे. आज मी तुमच्या सर्वांसमोर एवढी धडधाकट उभी आहे ती त्यांच्यामुळे.

'काय?'

'होय, जेव्हा मला मोनोपॉजमुळे डिप्रेशन आले होते. तेव्हा त्या माझ्या मदतीला धावल्या.अग तुम्ही सगळे तर आपापल्या कामावर निघून जायचे. पण त्या घरचे आवरून माझ्याजवळ तासनतास येऊन बसायच्या. मला मानसिक आधार दिला खुप. तुला आणि कुणालाच माहीत नाही डिप्रेशन मध्ये मी आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला होता.'

'काय?'

'हो,पण त्या वेळीच मदतीला धावून आल्या आणि मला सावरले. तुम्हाला सगळ्यांना वाटले की,मी डॉक्टरांच्या औषधांनी बरी झाली. पण तसे काही नाही. डॉक्टरांच्या इलाज फक्त रोगावर होतो गं; आरोग्यासाठी आपली आधार देणारी व्यक्ती लागते. तो आधार सुमेधाताईंनी दिला. त्यावेळी तुझे टेन्शन त्यांनी आपले मानले. तुझ्या सासऱ्यांच्या प्रगतीत अडथळा नको म्हणून त्यांनी घरातील तुझ्या आजी सासू सासरे यांचे मुकाट्याने केले.मग आता का तुम्ही त्यांचा आनंद आपला मानत नाही? तुझ्या सासऱ्यांचा इगो हर्ट झाला आहे. समजाव त्यांना आणि सहलीला आनंदाने पाठवा. बाकी तुमची मर्जी. तुमच्या घरात पडण्याचा मला अधिकार नाही. तुला समजावणे माझे काम होते.'

केतकी घरी आली तोवर सुमेधाने स्वयंपाक करून ठेवला होता. सर्वांची जेवण झाल्यावर सुमेधा आता लवकरच आपल्या खोलीत निघून जायची. केतकीने शशांक आणि आपल्या सासऱ्यांना सारे नीट

समजावले. त्यांनाही पटले. दुसऱ्या दिवशी केतकीने सुट्टी घेतली. सुमेधा आवरून बाहेर जायला निघाली तशी केतकी बोलली,

'आई, मी आणि बाबा बाहेर जात आहे. तुम्ही थांबा.'

'तुझ्याकडे आहे ना एक चावी? मला आज बाहेर जायलाच हवे.'

'आम्ही आल्यावर जा.'

शेवटी नाईलाजाने सुमेधा थांबली. बराच वेळाने केतकी आणि विजयराव परत आले. त्यांच्याजवळ बरेच सामान होते. सुमेधाने काही पिशव्या घेतल्या आणि सोफ्यावर ठेवल्या. कुणी कसेही वागले तरी सुमेधाला त्यांच्यासारखे वागायला जमत नव्हते. ती पाणी घेऊन आली. नंतर ती आपल्या खोलीत जायला लागली तशी केतकीने त्यांना हाक मारून बोलवले. केतकी तिला एक एक सामान दाखवत होती, तेव्हा सुमेधाला आश्चर्य वाटले. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

केतकी त्यांचा हात पकडत म्हणाली,

'आई,मला माफ कर. आम्ही खूप स्वार्थी विचार करत होतो. पण माझ्या आईने वेळीच माझे डोळे उघडले. तुम्ही आनंदाने सहलीला जा. खुप मजा करा.'


विजयराव तर काहीच बोलू शकले नाही. त्यांनी फक्त तिचा हात आपल्या हातात घेत तिला आश्वस्त केले. सुमेधाच्या मनात आले, 'आज मला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचे पंख लाभले.'

## चारोळी

दुनियेचं हसू होईल
अनू इज्जतीचा पंचनामा
'समजून घेऊ' जग म्हणतं
अनू पडद्याआडून जाहीरनामा!

**- निशा शिंदे**



# दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा !





# श्रीमती प्रियांका थोरवे

## कॉन्ट्रॅक्टर

## सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे



With best compliment from

# Dimple Enterprises

Builder & Developers

**Mahesh Shirke**
**Director**
**9370488011**

**Building no. 21/B, 202 Ashok Nagar, Bhiwandi, (E).**

With best compliment from




# M/s. Vaishnavi Construction

**Prop. Avinash Jayvant Vekhande**

**Mob-9527928456**

**Address:- S-02, 2nd Floor, VitthalDham Apt., Rahul Nagar, Cherpoli**
**Tal:- Shahapur, Dist:- Thane Pin 421 601**
**Email: vaishnavi.construction1974@gmail.com avinashvekhande270@gmail.com**



# वलयापलीकडे

- माधुरी चौधरी

**बराच वेळ रेश्मा बोलत राहीली. येवढ्या वर्षांची मनातील सल ती एकदोन प्रश्नांमध्येच काढू बघत होती पण मनोजकडे येवढा वेळ नव्हता. त्याला पुढे महमूदजींची पण मुलाखत घ्यायची होती. त्याची अस्वस्थता वाढत होती.**

रेश्मा ... एक दहा वर्षांपूर्वी हिंदी चित्रपटसृष्टीत नावाजलेल नाव. निसर्गाने सौंदर्य भरभरून बहाल केलेलं. लाखो दिलोंकी धडकन वगैरे असं काहीसं..... आता पंन्नाशी ओलांडलेली. भरपूर पैसा गाठीशी. कुबेराने आपला भंडारा मुक्त हस्ताने तिच्यावर उधळलेला. जेव्हा भरपूर काम होते तेव्हा कुणाशी मैत्री करणे,बोलणे याला कधी वेळ दिला नाही की किंमतही दिली नाही. मग लग्न तरी कशी करणार?आपल्याच मस्तीत जगलेली रूपगर्विता. पण म्हणतात ना वेळ कुणासाठी थांबत नसतो! काळ आपले निशाण बरोबर सोडत असतो. जसजशी चाळीशी ओलांडली, विशीतील मुलींसमोर हे अनुभवाने व वयाने प्रगल्भ झालेलं सौंदर्य फिके पडत होत आणि मुख्य नायिकेच्या भूमिका तिला काही येत नव्हत्या..... हळूहळू मागे पडत चाललेली रेश्मा आता फक्त पाट्यांमधूनच दिसत होती. प्रसिद्धि माध्यमेही तिच्यापासून दूरच असायची. सतत प्रसिद्धीच्या झोतात असणाऱ्या रेश्माला मात्र हे सहन होत नव्हते व त्याचा परिणाम तिच्या मानसिक आरोग्यावर होत होता. आजकाल तिला भरपूर पिण्याची सवयही लागली होती. मानसिक आरोग्यही बिघडले होते. अजूनही ती मागचे आयुष्य आठवतच जगणे पसंत करत होती. भूतकाळात रमतांना ती तासंतास घालवायची. कुणी आलेच भेटायला तर एवढे बोलायची... सांगायची की समोरचा वैतागून जायचा मग नंतर तिला भेटायचे टाळायचा. आजकाल फोनही फारसे येत नव्हते. काल अचानक फोन वाजला.


'हॅलो,रेश्मा मॅडम आहेत का?'

पलीकडून विचारणा झाली.

'हो बोलतेय.आपण कोण?'

रेश्मा उत्सुकतेने बोलली.

'नमस्कार मॅडम, मी पत्रकार मनोज



शिरसाट बोलतोय. मला आमच्या न्यूज पेपर इंडियन एक्सप्रेससाठी तुमची मुलाखत घ्यायची आहे. तुमची सहमती असेल तर मी उद्या येऊ शकतो का?'

'या ना सकाळी ९ वाजता आपण भेटू या.'

आधीसारखे कसलेही आढेवेढे न घेता रेश्मा बोलली.

'ठीक आहे , मी बरोबर ९ वाजता येतो मॅडम'

म्हणत मनोजने फोन ठेवला. रेश्माला अजून बरेच काही बोलायचे होते, पण त्या आधीच मनोजने फोन ठेऊनही दिला. पूर्वी अशी मुलाखत असली की दोनतीन महिने आधीच वेळ घ्यावी लागत असे पण आज तिने अगदी सहज वेळ दिली होती. कुणीतरी तिची दखल घेतेय व तिला भेटायला येते आहे या गोष्टीनेच ती आनंदीत झाली होती. ती संध्याकाळ अन् ती रात्र तिने भूतकाळात रमत घालवली. उद्या काय बोलायचे आणि कसे बोलायचे याच विचारात सकाळ कधी झाली तिला कळलेच नाही.

दुसऱ्या दिवशी अगदी सकाळी सात वाजेपासूनच रेश्मा तयार होऊन बसली होती. तिच्यासोबत आधीपासून मदतनीस म्हणून काम करणारी रंजना मात्र अजूनही तिच्या सोबत होती. तिच्या कितीतरी अडचणीच्या वेळी रेश्माने तिला भरपूर मदत केली होती आणि अजूनही करत होती म्हणून रंजना अगदी सावली सारखी तिच्या सोबत असायची. आता कामाचे स्वरूप थोडे बदलले होते पण तिने सोबत मात्र सोडली नव्हती. रेश्माचे आर्थिक व्यवहार, घरातील दोन नोकरांचे घेणेदेणे व रेश्माची काळजी घेणे हे तिचे काम. आजही रेश्माची मुलाखत म्हणून ती सातलाच हजर होती बघते तर रेश्मा तयार होऊन बसलेली.

'रेश्माताई अगं सातच तर वाजलेत.... ९ वाजता येणार ना तो रिपोर्टर?'

'हो गं पण लवकर आला तर .... उगाच आपल्यामुळे उशीर व्हायला नको. म्हणून तयार झाले बघ'

म्हणत रेश्माने आपला पदर नीट केला. रंजनाला आता तिची दयाच आली.... पण आज कितीतरी दिवसांनी तिने रेश्माला एवढे खूश पाहिले होते. त्यातच तिला समाधान होते. तिने फक्त हसत मान हलवली व चहापाण्याच बघायला आत निघून गेली. पुढच्या अर्ध्याच तासात हॉलमधील टेबल खाद्यपदार्थांनी सजला होता. रंजनाही छानशी तयार झाली.साडेआठ ते नऊपर्यंतची वेळ मात्र लांबत चालली होती.

नऊ नंतर मात्र रेश्माला धीर धरवरत नव्हता. क्षणाक्षणाला तिची अस्वस्थता वाढत होती.

'रंजना व्यवस्थित तयारी झालीय ना. त्यांचा पाहुणचार चांगलाच व्हायला हवा हं' अस्वस्थता न लपवता तिने विचारले.

'हो मॅडम, तुम्ही काळजी करू नका.... आणि एका ठिकाणी बसा बरं, येतील ते आता...'

'अगं पण किती उशीर झाला बघ...'

'येतील हो ताई, ट्रॅफिक असेल रस्त्याने ...'

म्हणत रंजनाने रेश्माला पाणी दिले. येवढ्या वर्षांच्या सहवासाने रंजनाला रेश्माच्या सर्व सवयी माहीत होत्या. रेश्माने घटाघटा पाणी पिले अन् खुर्चीवर जाऊन बसली.

मनोज तसा वक्तशीर होता. आजही वेळेतच घराबाहेर पडला होता. पण आज रस्त्याने नेहमीपेक्षा जरा जास्तच गर्दी होती. शेवटी वीस मिनिटे उशिर झालाच. त्याने घाईघाईतच दारावरची बेल वाजवली. रेश्मानेच दरवाजा उघडला... मनोजला थोडे आश्चर्य वाटले कारण रेश्मा काम करत होती तेव्हाच्या तिच्या घमंडीपणाच्या अनेक कथा मनोजने ऐकल्या होत्या. आज तिच रेश्मा त्याच्या स्वागतासाठी स्वतः दरवाजा उघडत होती.

'या या मनोजजी....स्वागत आहे तुमचं.'

या वयातही रेश्माच सौंदर्य लाजबाब होते. त्यात तिचं अस लाघवी बोलणं ऐकतच रहावं असे. मनोज क्षणभर बघतच राहीला.

'नमस्कार रेश्माजी, कशा आहात?'

'मी मस्त.या बसा'

सोफ्याकडे बोट दाखवत रेश्मा स्वतः समोरील खुर्चीवर बसली. तिचा तो बसण्याचा राजेशाही थाट तिच्या व्यक्तिमत्त्वात अजून भर घालत होता. रंजनाने लगेचच नाश्ता आणून दिला आणि आस्वाद घेताघेताच गप्पा व मुलाखत सुरू झाली....

'मला सांगा मॅडम, तुम्हाला पहिला ब्रेक कधी व कसा मिळाला..'

'त्याचे असे झाले..... मी सतरा वर्षांची असतांना आमच्या कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनात नाटक करत होते. तिथेच आदरणीय महमूदजी आले होते... त्यांनी मला व माझ्या कामाला बघून तिथेच 'रंग दे' या सिनेमासाठी साईन केले... त्यानंतर महमूदजी व मी अनेक चित्रपट सोबत केले. महमूदजी म्हणजे एक जिंदादिल व्यक्तिमत्त्व .... आजही इंडस्ट्रीज मधील आघाडीचे नाव आहे....'

रेश्मा भूतकाळात रमली होती. आपल्यापेक्षा मोठे महमूदजी इंडस्ट्रीजला आजही चालतात आणि आपण चालत नाही मात्र याची खंत तिला वाटत होती. पहिल्याच प्रश्नाचे उत्तर द्यायला पंधरा मिनिटे घेतली होती रेश्माने....

मनोज प्रथम शांतपणे ऐकत होता. पण जसजशी वेळ जात होती तसा अस्वस्थ होत होता.... त्याला अकरा वाजता मेहमूदजींची मुलाखत घ्यायला जायचे होते.... रेश्माला मध्येच थांबवत मनोजने दुसरा प्रश्न विचारला.

'रेश्माजी तुमचे भविष्यातील प्लॅन काय आहेत? कुठे पाहता स्वत:ला? काम करायचे की नाही? कोणती भूमिका करायला आवडेल?'

रेश्माचा बोलण्याचा आवाका बघून मनोजने सर्व प्रश्न एकदाच विचारले. ही गोष्ट रंजनाच्याही लक्षात आली पण खूप वर्षांनी ती रेश्माला अशी आनंदी व मनमोकळे पणाने बोलतांना बघत होती. तिच्या दृष्टीने त्या मुलाखतीपेक्षा तिच्या मॅडमने असे मोकळे होणे महत्त्वाचे होते. आजकाल रेश्मा स्वत:तच असायची. कुणाशी बोलतही नव्हती. आज ती अशी बोलती झालेली बघून रंजनाचे डोळे पाणावले. मनोजच्या चाणाक्ष नजरेने ते ही हेरले होते.

'भविष्यातील प्लॅन.... अरे आजकाल माझ्यासारख्या चाळीशीतील बायकांना नायिकेचे रोल येतात कुठे.... साईड रोल.. छोटे छोटे रोल... ते कसे करायचे... सर्वोच्च शिखर गाठल्यावर परतीचा मार्ग लागतोच पण तो सन्मानाचा हवा ना... उगाच काम मिळतंय म्हणत कसलेही रोल कसे करणार ? मलाही कळतेय की आता वीस वर्षाच्या तरूणीची भूमिका मला मिळणार



नाही. पण जसे पुरुषांना केंद्रस्थानी ठेऊन भूमिका आखली जाते तसे स्त्रीसाठी का



नाही... चाळीशीनंतर नायिकेने दुसऱ्या नायिकेची आई व्हावे आणि दोनचार डायलॉग बोलून संपायचे असेच चालते.... मनालाच पटत नाही. एखादी सशक्त भूमिका मिळाली तर करेलही.....'

बराच वेळ रेश्मा बोलत राहिली. येवढ्या वर्षांची मनातील सल ती एकदोन प्रश्नांमध्येच काढू बघत होती, पण मनोजकडे येवढा वेळ नव्हता.त्याला पुढे महमूदजींची पण मुलाखत घ्यायची होती. त्याची अस्वस्थता वाढत होती. हे चाणाक्ष रंजनाच्या लक्षात आले. रेश्माच्या अशा वागण्यामुळेच मीडिया तिच्यापासून लांब गेला होता. रेश्मा अजूनही आपला भुतकाळ विसरायला तयार नव्हती. रंजनाने एक छानशी कॉफी पुन्हा मनोजसमोर धरली. पण मनोजने सभ्यपणे नकार देत घड्याळाकडे पाहिले. अकरा वाजून गेले होते. त्याला निघायचे होते. रेश्मा अजूनही बोलत होती. तिला मध्येच थांबवत मनोज म्हणाला,

'मॅडम तुमचे बोलणे अगदी ऐकतच रहावे असे वाटते. मला माझ्या सर्वच प्रश्नांची उत्तरे तुमच्या बोलण्यात मिळाली आहेत. मला आता निघायला हवे.तुमच्या पुढील आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा .धन्यवाद'

'अरे मनोजजी, अजून तर आपण काही बोललोच नाही.'

'मॅडम बोलायला मी पुन्हा परत वेळ काढून येईल. आपण छानशा गप्पा मारू या. आता मला निघायला हवे.' म्हणत मनोजने आपला पसारा आवरला सुद्धा. येवढा वेळ प्रसन्नतेने बोलणारी रेश्मा एकदम अस्वस्थ झाली. रंजना मनोजला दरवाजापर्यंत सोडायला गेली.

'धन्यवाद सर आपण वेळ काढून

आलात'

'रंजनाजी सांभाळा मॅडमला. मी खरेच थांबलो असतो, पण मीपण वेळेचा बांधलेला आहे हो.... हो पण मुलाखत मात्र छानच येणार बघा.. मी करतो सर्व व्यवस्थित'

म्हणत मनोज निघूनही गेला. रंजना रेश्माकडे बघत तिच्या मनस्थितीचा अंदाज घेत होती. रेश्मा नाराज असली तरी आनंदी वाटत होती.

'रंजना छान बोलले ना मी? पण खूप कमी प्रश्न विचारलेत ग त्यांनी.... मुलाखत येईल ना पेपरला.. नाहीतर तू पुन्हा एकदा बोलून घे त्यांना काय हवे नको ते ही बघ...'

'ताई छानच बोललात तुम्ही आणि देतील ते मुलाखत पेपरला. काळजी करू नका'

मुलाखत येईल की नाही हे रेश्माला पण माहीत नव्हते. पण खूप दिवसांनी आपले दहा वर्षांपूर्वीचे आयुष्य आठवत रेश्मा आज येवढी छान प्रसन्न झाली होती... आणि रंजनाला ते ही पुरेसे होते. तेवढ्यात 'बाई बाई मनमोराचा कसा फुलारा फुलला...' गाणे रेश्माच्या तोंडातून बाहेर पडले. कितीतरी वर्षांनी रेश्मा गुणगुणली होती. आता मात्र रंजनाही मनमुराद हसली. जणू काही तिला तिची पहिली रेश्माताई भेटत होती.....

## टीप्स

### नखांचे आरोग्य राखण्यासाठी नेलपेंट लावताना करू नका ही चूक

जुन्या नेलपेंटवर नवा कोट देणं

नेलपेंट लावण्याची हौस असूनही बऱ्याचजणींना यासाठी पुरेसा वेळ काढता येत नाही. जुनी नेलपेंट काढून पुन्हा नवीन कोट लावण्यासाठी वेळ नसेल, तर काही जणी जुन्या नेलपेंटवरच नवा कोट लावतात. असं करणं नखांसाठी मुळीच चांगलं नाही. कारण त्यामुळे नखांचे पोषण होत नाही. यासाठी नखं रिमूव्हरने स्वच्छ करावीत आणि मगच नवीन नेलपेंट लावावी.

नेलपेंट स्क्रॅच करून काढणे

नेलपेंट काढण्यासाठी नेहमी चांगल्या रिमूव्हरचा वापर करावा. कारण जर तुम्ही नखांवरील नेलपेंट नखांनीच स्क्रॅच करून काढली तर यामुळे नखांवर ओरखडे उठतात. नखांचे सौंदर्य यामुळे खराब होतेच, पण नखांची वाढही खुंटते. नखे कायम निरोगी राहण्याची ही चूक कधीच करू नका.



## दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!

दिव्यांच्या प्रकाशात उजळला निसर्ग, सुख समृध्दी घेवूनी आला दिपावली पर्व ...

कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार प्राप्त संस्था

जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ

अधिक माहितीसाठी आमच्या गुंतवणूक सल्लागाराशी संपर्क करा.

अंबरनाथ - ८६६९८१३९८१, कल्याण (पू.) - ८१०८८१७६२१ , टिटवाळा- ७७३८३४१४०८

बदलापूर- ७०५८४८८३११, कल्याण (प.) - ९७०२३५००७३, शहापूर- ७३८७६५६६९८

श्री. प्रकाश पाटील- अध्यक्ष

श्री. मनोहर जाधव- उपाध्यक्ष

श्री. सुनील घनवट- मुख्यव्यवस्थापक

प्रशासकीय कार्यालय- १०३, साकेत को. ऑप. हौ.सो.लि., वडवली विभाग, अंबरनाथ (पू), जि. ठाणे ४२१ ५०१ फोन : ८६६९८१३९८१

With best compliment from

## SHIV- KALA

URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD.




B-3, Ganpati Plaza UMC Road, Chopra Court Ulhasnagar-421 003
Tel.: 0251-2708989 / 2705959

With best compliment from

## NANDLAL THAKUMAL

CO.OPERATIVE CREDIT SOCIETY LTD.



Shop no. 1, Tilson Market, Ulhasnagar- 421003 Thane

# ओम पब्लिकेशन


- इन्फो डायरी (वैविधपूर्ण माहिती संकलन)
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- जल - आशय (महाराष्ट्रातील धरण, पाटबंधारे,
  जल संधारण, जल विद्युत अर्थातच संपूर्ण पणे पाणी
  या विषयाला वाहिलेला ग्रंथ.)
  लेखक - राघवेंद्र कुलकर्णी आणि डॉ. विलास ज. पवार
- कल्पतरु युवा - युवा पिढीसाठी दिवाळी अंक
- सुरक्षा अभियान - सुरक्षा या विषयाला वाहिलेले वार्षिक
- सखी संवादिका - फक्त महिलांसाठी दिवाळी अंक
  संपादक - विशाखा पवार
- श्री - गणेश पूजा आणि आरती संग्रह
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- श्री लक्ष्मीपूजन - श्री लक्ष्मी, कुबेर पूजा आणि कथा, मंत्र संग्रह
- ड्रिंक्स ॲन्ड डाईन -मिनी कॉफी टेबल बुक (मराठी आणि इंग्रजी)
  लेखक -डॉ. विलास पवार

दिवाळी अंकाच्या संपादनासाठी सहाय्य
कथा/कविता/कांदबरी/आत्मचरित्र इत्यादी पुस्तकांच्या
प्रकाशनासाठी सक्रिय मार्गदर्शन

संर्पक

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- ६९३०९१९७

E-mail : vilaspawar@ompublication.com



# सखी शेजारीणी

- सुनिता देहेरकर

**आमच्या प्रेमाला दोघांकडून मान्यता मिळाली. त्याचे असे झाले की, ऑफिसवरून घरी येत असताना पुष्पाची छेड काढणारे कॉलेजचे दोन गुंड पोरे दिसली. ते पुष्पाला त्रास देत होते व तिची वाट अडवून उभे होते.**

जुन्या एस. एस. सी. पास होऊन मी रेव्हेन्यू डिपार्टमेंट मध्ये मी नोकरीस लागलो. घरची परिस्थिती चांगली नव्हती म्हणून कॉलेजला जाण्याचा विचार रद्द केला. आमचे कुटुंब हे मोठे कुटुंब होते आणि एक वडील सोडले तर कमावणारा असे कोणीच नव्हते. परिस्थितीपुढे हार मानून मी नोकरी करण्याचा निर्णय घेतला.

माझी पोस्टींग वाडा या तालुक्याच्या ठिकाणी झाली होती. माझे गाव शहापूर व वाडा असा रोजचा एस. टी. चा प्रवास शक्य नसल्याने मी वाडा येथे खोली घेऊन राहायाचे ठरवले व तशी घरच्यांना कल्पना दिली.

सुदैवाने वाडा येथे मला भाड्याची खोली मिळाली. श्री. पोपट शाह व सरला बेन या सुस्वभावी व साध्या कुटुंबाने भाड्याने खोली देण्याचे मान्य केले. त्यांची फक्त एकच अट होती की, ते स्वत: गुजराती व जैन धर्मीय असल्याने त्यांना भाडेकरू शाकाहारी हवा होता. बऱ्याच लोकांना ही अट मान्य नसल्याने आमची खोली पडून आहे असे ते मला म्हणाले. 'शेठजी, तुम्ही काळजी करू नका, मी प्युअर शाकाहारी आहे.'

'मग काही हरकत नाही,' शेठजी म्हणाले. अशा रीतीने मला खोली मिळाली. शेठजी किराणा मालाचे व्यापारी होते. त्यांना एकुलती एक मुलगी होती. ती कॉलेजला जात होती. सरला बेन एकट्याच घरी असायच्या आणि पोपट शेट दुकानात. मी तहसीलदार कचेरीत कामाला असल्याने मला सर्व 'भाऊसाहेब' म्हणून हाक मारत. मला अवघडल्यासारखे होई.

पोपट शेट व सरला बेनच्या मुलीचे नाव पुष्पा होते. पुष्पा दिसायला खूपच सुंदर होती. कॉलेज एक कॉलेज असा तिचा प्रवास होता. त्याला अपवाद फक्त तिच्या मैत्रिणीचा. पण मैत्रिणीकडे जातानाही तिला विचारून जावे लागायचे. पण मला मात्र शाह



फॅमिलीकडे कधीपण जाता यायचे. व्यापारी मंडळींचा रेव्हेन्यू डिपार्टमेंटशी जवळचा संबंध असल्याने शेठजी मला आदराने वागवत. आमच्या डिपार्टमेंटमध्ये क्लार्कला 'भाऊ साहेब' म्हणण्याची प्रथा होती. असो.

हळूहळू पुष्पा आणि माझी मैत्री घट्ट होत चालली होती. माझ्याशी गप्पा मारायला, थट्टा–विनोद करायला तिला आवडू लागले. पुष्पा मला पाहताक्षणी आवडली होती. माझ्याही मनात तिच्याविषयी गुप्त प्रेम भावना होतीच. मला वेळ मिळेल तेव्हा आम्ही दोघे गुपचुप कुणाला नकळत फिरायला जाऊ लागलो.

एक तर पुष्पा आणि माझ्यात फारसे अंतर नव्हते. आम्ही जवळपास समवयस्क होतो. तरुण सुलभ प्रेम भावना निर्माण होणे यात गैर असे काहीच नाही.

आम्ही दोघे मनाने व शरीराने जवळ येत चाललो होतो. सरला बेनला माझा विनोदी स्वभाव व माझे आदराशीर वागणे खूपच पसंत पडले होते. माझ्यामुळे शेठजींची तहसीलदार ऑफिस मधली सर्व कामे भराभर होऊ लागली. दिवस खूप मजेत चालले होते. माझी खोली शेठजींच्या घराला लागूनच होती आणि म्हणून एक दिवस पुष्पाला म्हणालो, 'पुष्पा, तू माझी सखी शेजारीण आहेस.' त्यावर ती हसून म्हणाली 'होय राजेश! मी खरंच तुझी सखी व शेजारीण आहेच. पण नुसती शेजारीण नाही तर तुझी 'लाडकी शेजारीण' आहे. होय ना!'

एक दिवस मी पुष्पाला म्हणालो, 'पुष्पा, आमच्या घरी माझ्या लग्नाविषयी बोलणी चालू आहेत. काय करू?'

'राजेश (माझे नाव) तू जर मला सोडून दुसऱ्या कुठल्या मुलीशी लग्न केले तर मी जीवच देईन.'

'ए वेडे, मी तरी तुझ्याशिवाय जगू शकेन का? पण आपल्या प्रेमाला तुझ्या आई–वडिलांकडूनही परवानगी मिळायला नको का?'

ते मी पाहीन. तू नको काळजी करू.

मी त्यांची एकुलती एक व लाडकी मुलगी आहे. ते नाही म्हणणार नाहीत.

'पण ते कट्टर जैन धर्मीय आहेत. त्यांना हिंदू जावई चालेल का?'

'चालेल, जरूर चालेल आणि हिंदू व जैनात काय फरक आहे का? राहिला प्रश्न शाकाहारी व मांसाहारीचा. तर तू स्वतःच शाकाहारी आहेस. म्हणजे खाण्या–पिण्याचा काही प्रश्नच येणार नाही.'

मी प्रेमाने तिला जवळ ओढले व एक दीर्घ चुंबन घेतले. त्याने अजिबात विरोध केला नाही. आईने आणलेले स्थळ मी नाकारले. पण पुष्पाने आणि मी म्हणजे आम्ही दोघांनी आमच्या प्रेमाविषयी पोपटशेठना व सरलाबेनना अधिकृतरीत्या काहीच सांगितले नव्हते.

पण एक अशी घटना घडली की, आमच्या प्रेमाला दोघांकडून मान्यता मिळाली. त्याचे असे झाले की, ऑफिस वरून घरी येत असताना पुष्पाची छेड काढणारे कॉलेजचे दोन गुंड पोरे दिसली. ते पुष्पाला त्रास देत होते व तिची वाट अडवून उभे होते. पुष्पा मोठ्याने ओरडून 'हेल्प हेल्प' म्हणत होती. मी जिवाची पर्वा न करता धावत तिच्या जवळ गेलो व त्यांना झोडपून काढले.



एवढ्यावरच मी थांबलो नाही तर रीतसर पोलिस कम्प्लेन्ट केली. रेव्हेन्यू खात्यामार्फत भाऊसाहेब म्हणून मला मान होताच. त्याचा उपयोग झाला.

जेव्हा ही गोष्ट पोपटशेठ व सरला बेनच्या कळली तेव्हा त्यांनी मनापासून आभार मानले. शेठजी म्हणाले, 'मि. राजेश, तुमच्या दोघांच्या प्रेमा बद्दल मला कळले आहे. पण मी ते मुद्दामहून दर्शविले नव्हते. मला खात्री आहे. माझ्या मुलीचे संरक्षण तुम्ही नक्की कराल आणि म्हणून तुमच्या दोघांच्या प्रेमविवाहाला मान्यता आहे.'

'पण सासरेबुवा, तुम्हाला आमच्या दोघांचे एकमेकांवर प्रेम आहे हे कधी कळले. आम्ही तर दोघांनी ते तुम्हाला सांगितले नव्हते. उलट मला भीती होती की, तुम्ही मला, खोली सोडून चालता व्हा असे म्हणाल!'

'बेटा, आम्ही व्यापारी लोक आहोत. व्यापारी माणसाची नजर पारखी असते. तसेच त्याला सर्व प्रकारचे ज्ञानही आवश्यक असते. तसेच हिंदू धर्म व जैन धर्मात फारसा फरक नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. शिवाय तुझ्या सारखा चांगला जावई मिळत असेल तर कोण नाही म्हणेल.'

पुष्पाने आणि मी दोघांना वाकून नमस्कार केला व त्यांचे आशीर्वाद घेतले. अखेर मला हवी तशी सुंदर, सुशील शेजारीण मिळाली होती.

टीप्स

# सोप्या घरगुती उपायांनी मिळवा सुंदर त्वचा

**घरच्या घरी त्वचेची काळजी घ्यायची असेल तर काही सोप्या गोष्टी करूनही तुम्ही सुंदर आणि नितळ त्वचा मिळवू शकता.**

त्वचेसाठी आहार हा देखील तितकाच महत्त्वाचा असतो. चांगला आहार असेल तर त्वचा आतून स्वच्छ आणि चांगली होते. त्यामुळे तुम्ही रोजच्या आहारात प्रथिनांचा समावेश करा. फळे, भाज्या, अंडी, चिकन यांचा समावेश करा. त्यामुळे त्वचा चांगली राहण्यास मदत मिळते.

दिवसातून एकदा शक्यतो झोपताना चेहऱ्याचा मसाज करा. कोणतेही मॉश्चरायझर घेऊन तुम्ही चेहऱ्याला लावा आणि गोलाकार आकारात मसाज करा. त्वचा चांगली राहण्यास मदत मिळते.

कोलेजन हे त्वचेसाठी खूप गरजेचे असते. हल्ली बाजारात कोलॅजन असलेल्या पावडर मिळतात. ते देखील तुम्ही रोजच्या रोज घ्या. त्यामुळे त्वचा आतून चांगली होते.



कितीही स्किनकेअर प्रॉडक्ट असून काहीही उपयोग नाही. तुम्ही आंघोळीनंतर जर योग्य रूटीन फॉलो केले तरच त्याचा फायदा तुम्हाला होऊ शकतो.

चेहऱ्याला व्हिटॅमिनचा योग्य साठा मिळाला की, त्वचा अधिक सुंदर राहते. व्हिटॅमिन सी युक्त प्रॉडक्ट, पदार्थ, फळे यांचा समावेश करा. त्यामुळे त्वचा अधिक सुंदर आणि चिरतरुण राहण्यास मदत होईल.

सुरक्षाविषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था

# सुरक्षा अभियान

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षेविषयक कार्य करण्याच्या रस्ता सुरक्षा व अन्य सुरक्षाविषयी बाबत जाणून घ्यायचे असेल व या क्षेत्रात कार्य करायचे असेल तर संपर्क साधावा :**


संस्थापक / अध्यक्ष

**डॉ. विलास ज. पवार**

ऑफिस : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) -४०० ६०२

✆ ०२२-६९३०९१९७ / ९८२११६१६६२

For Crises management, Concept Marketing,
Media Management, Event Management, Public Relation &
Other Managing ability and Challenging Works.



**Avidmedia**
Management & marketing Pvt. Ltd.

**Contacts:**
022-69309197, Cell - 9167785599

# घरातील देवता

- प्राजक्ता आनंद हेदे

**तुझे दादा वहिनी एका बस अपघातात मृत पावले. त्यातच आम्ही गावी राहून कसबसे भागवत होतो. पण तिथे काहीच होत नव्हतं. म्हणून मग आम्ही इकडे आलो. तुम्हाला कोणत्या तोंडाने सांगायचं कळत नव्हतं.**

'काय ग चपात्या आज जास्त केल्यास? काही विशेष आहे का?' समीरच्या बोलण्याने रूपा भानावर आली.

'अरे हो, अरे रोज आपल्या पुरत्याच करते, आज घाई गडबडीत जास्त झाल्या.'

'चल चल उशीर होईल, हा टिफीन घे. मला पण मग ऑफिस पर्यंत ड्रॉप कर, उशीर होईल नाहीतर मला, असं म्हणत रूपा आणि समीर सर्व नीट आवरून ऑफिसला निघाले. दार बंद करताना पण रूपा जरा वेगळ्याच विचारात होती.

समीरने तिला तिच्या ऑफिसजवळ सोडलं. ती रोजच्यासारखं बाय न करताच आत शिरली. समीर गाडी घेवून पुढे निघाला. ही रूपा पण ना, आई बाबा मुंबई मध्ये आले की नको त्या अपेक्षेने त्यांची वाट पाहते. जे झाल ते झालं. विसरायचं ते नाही. असा स्वतःशी पुटपुटत स्वतःच्या ऑफिस जवळ पोहोचला.

रूपा देखील आज कामाच्या दुनियेतून, जरा भूतकाळाच्या विचारात गुंग झाली. किती सुंदर दिवस होते ते. समीर आणि मी कॉलेज पासून एकत्र, मैत्रीचे बंध रेशमी बंधात कधी गुंफले कळलेच नाही. तेव्हा दोन्ही कुटुंबाच्या संमतीने सारे कसे छान जुळून आलेले. मी करियर ओरिएंटेड असून सुद्धा सासूबाईंनी छान जुळवून घेतलेलं. आईच्या हाताखाली मी घरातील पण सारे काही शिकली होते. त्यामुळे सासू आणि जावेला जमेल तशी मदत करून मी ऑफिसला निघायची. घरात मोठे

दीर, जावू, आणि त्यांची छोटी परी, सासू सासरे आणि आम्ही दोघे असा हसरा परिवार.

सारेच सर्वांशी जुळून घेत होते. पण मला एक आवडत नव्हतं. इतरांच्या अगदीच खासगी आयुष्यात सुद्धा साऱ्यांनाच सर्व



जाणून घ्यायची घाई असायची. मला पण सासू आणि जावू सतत, 'तू हे केलं का? ते केलं का? मग पाळणा कधी हलवता? ऑफिस मध्ये आज काय केलं? तू उदास का? हसते का?' अशा असंख्य प्रश्नांनी भंडावून सोडत.

मी एकदा मग समीरच्या कानावर हे सर्व घातलं. तर तो मलाच बोलला, 'मी म्हणूनच त्या सर्वांपासून जरा अलिप्त राहतो. मग तू का त्यांच्यात मिसळून राहते? तोंडावर उत्तरं दे.'

'अरे समीर मी कशी उत्तरं देणार? तू आधीपासून अलिप्त राहतो, त्यांना ते पटत, मी कस राहणार? मी सून आहे. माझी बदनामी होईल.' त्यावर समीर सरळ बोलला, 'स्वतः मधला 'स्व' जपायचा असेल तर कोणालाच डोक्यावर घेवू नकोस.' 'बर' म्हणत मी गप्प झाली.

त्या दिवशी कहरच झाला. शेजारच्या काकी आमच्याकडे आल्या होत्या, तर त्यांनी मला बाळा बद्दल विचारले. मी बोलली एवढ्यात नाही विचार, आधी जॉब.

तर त्या काही बोलणार तेव्हड्यात माझी सासूच बोलली, हे नको ते काय सांगते ग त्यांना. 'काही नाही अहो बोरकर वहिनी, पुढच्या वर्षी नक्कीच दोघांचे तीन दिसतील हे.'

असं म्हणून सर्व हसू लागले. बोरकर काकी गेल्यावर, मी जरा चिडूनच सासूला बोलली, 'तुम्ही काही पण का सांगता बाहेरच्यांना? आम्ही मुलाबद्दल नाही विचार केला.'

तेव्हढ्यात जावूबाई पण बोलली अस थोडेच आहे, पुढच्या वर्षी हवंच हा.

जेवताना सर्व जेवण आवडीचे होते, तरी जेवायची इच्छा नव्हती. दोन घास खावून

मी सरळ उठून आत जाणार, तेव्हढ्यात सासू बाई बोलल्या, आता असं कमी जेवून होणार नाही. पोटभर जेव.

मी भूक नाही सांगून सरळ उठून गेली. सकाळी उठून टिफीन बनवताना मी गप्पच होती. छोटी मुळे वहिनी सकाळी लवकर उठत नसे, सासू आणि मी सकाळचं आवरत असू, त्यावेळी सासू मला बोलली. रूपा, ' एक तरी मुल हवंच ग' बाकी तू सर्व गुण संपन्न आहेसच. ह्यावर रूपा कसलाही विचार न करता, सासूला ताडकन बोलली. मला मूल एवढ्यात नको आणि परत हा विषय मला घरात नको. माझे करियर मला प्रिय आहे. बस...अस म्हणत, चिडून मी कामावर आले.

संध्याकाळी घरी गेल्यावर पाहते तर काय? सासू सासरेबॅग घेवून तयारीत होते. दीर आणि जावू त्यांना समजावत होते. पण त्यांनी सरळ गावी निघायची तयारी केलेली. मी आणि समीरने विचारलं तेव्हा, सासरे बोलले...'तुम्हाला मोठ्यांना दुखवायला आवडत तर मग आमची किंमत आम्ही का कमी करायची? रहा तुमचे तुम्ही.' त्या दोघांच्या हट्टी स्वभाव समीर मध्ये आला असणार असा विचार क्षणभर माझ्या मनात येवून गेला.

मूलं होण म्हणजे सर्व संसार सुखी होत नाही, आमचा निर्णय सकाळी रूपाने दिला आता तुमचं तुम्ही ठरवा, समीरच्या ह्या बोलण्याने आई बाबा तडक निघून गेले.

जिथे आई बाबांची किंमत नसेल त्या घरात माझ्यासारख्या बिनकामाच्या माणसाला काय किंमत? असे म्हणत हळव्या मनाचे सतीश दादा देखील वहिनी आणि परीला घेवून, सासू सासऱ्यां सोबत गावी निघून गेले. ते आजपर्यंत म्हणजे जवळपास पाच वर्षे लोटली तरी परत फिरून आले नाहीत. एवढ्या मोठ्या घरात आम्ही दोघेच आणि आता आमचं येणारं बाळ.

ते पण सर्वांना एकत्र राहता येईल म्हणून समीरने मोठ्या हौसेने आमच्या लग्नाच्या आधी हे घर घेतलेलं. त्याचे हफ्ते होते म्हणूनच आम्ही बाळाचा विचार करणार नव्हतो.

पण त्यावेळी आम्हाला कोणीच समजून घ्यायला तयार नव्हतं. केवळ मी चुकीचं बोलली, असं म्हणून सर्व निघून गेलेले. असो सध्या आई बाबा गावावरून इकडे मुंबई मध्ये राहत असलेल्या त्यांच्या नातेवाईकांकडे येणार होते. मला वाटलं येतील आमच्याकडे, पण समीर बोलतो तेच बरोबर, नाही येणार ते. उगाच जास्तीच जेवण मी बनवलं.

विचारांच्या तंद्रीत समोर रामू फाईल घेवून उभा कधी राहिला ते कळलच नाही. भरभर काम आवरून आज ती रूटीन चेकअपसाठी समीर सोबत डॉक्टरकडे

जाणार होती. आलेल्या फाईल हातात घेत, रामूला तिने एक कप गरम कॉफी देण्याची विनंती केली. खूप छान सर्व कामाच्या व्यापात स्वत:ला झोकून दिलं आणि कामाचा ताण हलका करत राहिली.

दुसऱ्या दिवशी लंच ब्रेक झाल्यावर ती निघाली. क्लिनिकच्या जवळपास समीर भेटला.

'बाळाची हालचाल सर्व काही ठीक आहे. फक्त सांगितलेलं डाएट नीट सांभाळा. शक्य असेल तर कोणाला तरी अनुभवी घरच्या व्यक्तींना सांगा म्हणजे आहार आणि नोकरी नीट पार पडेल' डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रूपा 'हो' म्हणून समीर सोबत बाहेर पडली.

'समीर, ऐक ना, मला तर आई वडील नाहीत. आपण तुझ्या आई बाबांना बोलवूया का रे? मी माफी मागते हवं तर त्यांची. पण कोणीतरी हवंच रे घरी, अनुभवी.'

'तुझं डोकं फिरलं आहे का? ते दोघे ऐकणार आहेत का? त्यात दादा वहिनी तर अजून नाटवंत करणार, त्यांना इकडे पाठवायला. उगाच आता घोळ नको. त्यांना यायचं असतं ना तर ते आले असते. तुला सांगावंपण लागलं नसतं. चल आपण घरी जावू, सुमन ताईंना विचारू. त्या जेवण बनवतील का? तसे पण बाकीची कामं करतातच त्या, रात्रीच पण जेवणाच सांगू त्यांना, देवू वाढवून पैसे.'

समीरचे बोलणे ऐकून रूपा, गप्प गुमान गाडीत बसली. घरी सुमन मावशी वाट



बघतच होत्या, 'ताई आलात तुम्ही बरच झालं. सर्व आवरलं आहे, तुम्ही जेवून घ्या. मी निघते.'

'सुमन ताई, आज तुम्ही जेवण का बनवलं? त्यात एवढा वेळ थांबलात पण?' रूपाच बोलण थांबवत, सुमन बोलली. 'अहो ताई, पोटुशी आहात तुम्ही. सकाळी तुम्ही बोलला होता आज डॉक्टर कडे जाणार. म्हटलं तुम्हाला उशीर होणार. अशा परस्थितीमध्ये वेळेत जेवण हवं. म्हणून सर्व केलं. नका विचार करू. मी येते उद्या. तुम्ही दोघे जेवा.'

सुमन निघाली, रूपाचे डोळे भरून

आले. रक्ताच्या नाही पण ह्या अशा माणसांना माझे मन कळत. समीर म्हणतो तेच बरोबर. नाचणीची भाकरी, कमी तिखट वांग्याची भाजी, सुरणाची कापं, भात, ताक असा छान रुचकर बेत, सुमन टेबलवर मांडून गेली. खूप दिवसांनी दुसऱ्याच्या हातचे गरम गरम ती जेवणार होती.

पोटभर जेवून मस्त, बेडवर आडवी झाली. समीरचे काम चालू होते. पण रूपा मॅडम निद्रिस्त झाल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून योगा वगैरे आवरून , छान चहा केला. 'काय मॅडम, 'आज ऑफिस नाही का? अगदी आरामात सर्व करत आहात'. समीरने मिश्किल हास्य करत विचारले.'

'समी, आज सुट्टी टाकते दोन दिवसांची. जरा घरीच राहीन'. बरं बरं, आराम कर. सुमन ताईंना पण सांगून बघ जेवणाच. देवू त्यांना वाढवून पगार. पण आजच बोल. मस्त एन्जॉय कर सुट्टी.'

'हो हो तू जा,' असं म्हणत रूपा त्याला दारापर्यंत सोडून आली. घराच्या भिंतीही आज अबोल वाटत होत्या. करू का फोन? पण आई काही बोलल्या तर? उगाच समीरला वाईट वाटेल. काय करू ते कळत नव्हतं. पण खरचं एवढं मोठं घर एकटीला खायला उठायचं.

तेव्हढ्यात दाराची बेल वाजली, दार उघडून सुमन ताईंना आत घेतलं, हा घ्या डबा. डबा हातात घेत, रूपा बोलली, 'काय आहे?'

'बघा उघडून'. सुमन ताई बोलल्या.

डबा उघडताच सर्वत्र घमघमाट सुटला. अगदी छान साजूक तुपात केलेला शिरा होता. तोही केळ घालून केलेला. अगदी रूपाला आवडतो तसा.

'सुमन ताई, अहो हे एवढं कशासाठी?'

'अहो बाईसाहेब अशा अवस्थेत वाटतं खावंसं, त्यात शिरा तुमचा लय आवडीचा.'

'हो हो,' म्हणत रूपाने ताटली मध्ये, शिरा वाढून घेऊन खायला घेतला. अगदी आईंच्या हाताची चव. डोळ्यात आसवे आली. पण एक ताटली शिरा खाऊन पोट भरलं तरी मन भरत नव्हतं. 'बाईसाहेब मी जेवण बनवते. तुम्ही आराम करा.'

रूपाला आज खरंच सर्व आयत हवं होतं. अगदी तसेच होत होतं. विचार करता करता तिला झोप लागली. डोळे उघडले तेव्हा सर्व स्वयंपाक तयार होता. हॉल मध्ये छान मोगरा दरवळत होता.

'चला बाईसाहेब मी निघते. सर्व जेवण तयार आहे. जेवून आराम करा.'

'हो, निघ तू. खूप बरं वाटलं. अग पण ही फुलं?

'तुम्हाला मोगरा आवडतो ना, ह्या अशा अवस्थेत प्रसन्न रहायचं, चला, मी आता संध्याकाळी येईन,' असं म्हणत सुमन

निघाली.

स्वयंपाक घरात रूपाने जाऊन बघितलं तर सर्व पदार्थ अगदी छान बनवले होते. वरण भात, मटार ची उसळ, फुलके,



कोशिंबीर त्यात गोड म्हणून शिरा होताच. बर वाटलं आज सर्व कसं आयतं मिळालं.

जेवून, निवांतपणे स्वत:ला आवडतील अशी गाणी ऐकत दुपार रूपाने खूप आरामात घालवली. संध्याकाळी समीर आल्यावर छान कॉफी केली. तेव्हढ्यात सुमन ताई गरम गरम भजी घेऊन आल्या.

'सुमन ताई आता हे कशाला? अहो जेवण खूप आहे. रात्री दोघांना होईल. आता भजी कशाल?'रूपाच्या प्रश्नावर, 'आता चहा सोबत खा' म्हणत. सुमन भांडी आवरायला गेली आत.

'कॉफी सोबत भजी, क्या बात है?' समीरने लगेच भजी तोंडांत टाकली. 'एक नंबर....अगदी आई बनवते तशीच चव. कोणी बनवली ही भजी ताई तुम्ही का?'

समीरला उत्तर देत, 'नाही नाही, मी नाही. आमच्या गावावरून आलेल्या एका पाव्हणीने बनवली. पाहुणी म्हणजे ह्यांची दूरची आत्या.' असं घाईघाईत सुमन बोलली. 'साहेब खूप छान पदार्थ करतात त्या.'

'सुमन ताई तुझ्या त्या दूरच्या आत्याने च सकाळचा शिरा बनवला होता का?' रूपाच्या बोलण्यावर सुमन थोडी गोंधळली. 'नाही', त्यांनी सांगितला तसा मी बनवला. लय झ्याक झाला. असं म्हणून सुमनने सर्व आवरून घेतल. सकाळी येते म्हणून निघाली पण.

'समीर, मला ना सुमन ताईंच्या घरी जाऊन एकदा त्यांच्या आत्याला भेटायचं आहे.'

'रूपा तुझं आपलं काहीतरी, अग

त्यांच्या आत्याला तुला का भेटायचं? डोहाळे खाण्याचे लागतात. पण माणसांना भेटायचे कसले आले आहेत डोहाळे?'

'हे बघ समीर, हे डोहाळे समज किंवा माझा हट्ट. पण तू तो पुरव. पण ह्यातलं आधीच सुमन ताईंना नको सांगू काही.'

'बरं बरं उद्या बघू, रविवार पण आहे.'

दुसऱ्या दिवशी सुमन एका मोठ्या डब्यात थालीपीठे घेऊन आली. डबा उघडताच घमघमाट सुटला. 'बाई साहेब हे घ्या' म्हणत, रूपा कडे डबा सुपूर्त केला.

रूपाला थालीपीठ कधी एकदा खाते असं झाले. समीर सुद्धा नाश्ता करताना थालीपीठवर तुटून पडला.

'सुमन ताई या तुम्ही पण खा, चहा घेऊन या.' अस म्हणत रूपाने त्यांना सुद्धा दिला नाश्ता.

'सुमन ताई आज आताचे जेवण नका बनवू, आम्ही बाहेर जाणार आहोत. तसे पण रात्रीच रात्री बघू. तुम्ही आता घरी जा. घरी पण पाहुणे आहेत ना.'

'बर,' असं म्हणत सुमन घरी जायला निघाली.

ती बाहेर पडताच,रूपा ने तयारी केली, 'समीर चल.'



'आता? अग आज जरा आराम कर. उद्या बघू.'

'नको चल तू' म्हणत. रूपाने समीर सोबत सुमन चे घर गाठले.

'अहो बाई साहेब तुम्ही....इकडे. या या काही हवं होत तर मला सांगायचं. मी आली असती.' असं म्हणत सुमन ने त्यांचे स्वागत केले. 'ही माझी लेक... कुसुम. आठवीला आहे, आणि हा कौशल दुसरीत आहे. नवरा गेल्यानंतर हेच माझं कुटुंब.'

'अरे वाह गोड आहेत लेकर.' असं म्हणत रूपाने त्या दोघांच्या हातात, मिठाई आणि चॉकलेट चे बॉक्स दिले.

दोन्ही मुले खुश झाली. 'सुमनताई

आत्या कुठे आहेत?

आत्या? आत्या म्हणत सुमन गोंधळली.

'बाईसाहेब आत्या तर सकाळीच गावी गेल्या.'

'सुमन ताई, आत्या गावी गेल्या मग थालीपीठ कसे बनवलेले त्यांनी? मला कळेल का?'

रूपाच्या बोलण्यावर सुमन अजूनच गोंधळली. 'हो हो ...नाही नाही' असं करू लागली.

'बाईसाहेब माफ करा. मी खोटं बोलली. माझी कोणतीही आत्या नाही आली. तर तुमचे सासू सासरे इकडेच आमच्या मागच्या चाळीत राहतात. त्या दिवशी मी तुमच्या कडून उशिरा घरी आली. तेव्हा ते माय बाप मला दिसले. गेल्याच महिन्यात ते इथे आले आहेत. त्यांची आणि माझी ओळख झाली. मी तुमच्याकडे कामाला जाते असं सांगितलं. तर ती माउली तुम्ही पोटूशी आहात, असं समजल्यावर मला रोज तुम्हाला काय आवडत काय नाही हे बघायला सांगितलं. ती माउली तुम्हाला जे आवडत ते स्वतः माझ्याकडे आणून देऊन तुम्हाला द्यायला सांगू लागली. माझ्याकडे कुठून आले नाहीतरी साजूक तूप वगैरे. मी कुठून एवढं तुम्हाला बनवून देणार?'

'आई बाबा आले आहेत ना? मला त्या दिवशी खाल्लेल्या शिराच्या चवीवरूनच अंदाज आलेला, ही चव आईंच्या हातची. म्हणून समीर मी इकडे यायचा घाट घातला. सुमन ताई आम्हाला घेऊन चला त्यांच्याकडे.'

'समीर चल आपण जावू. हो हो चला.'



'त्या घरात राहतात ते माय बाप.' सुमन ने घर दाखवलं तसे,आई बाबा म्हणतच समीर आणि रूपा ने त्या घरात प्रवेश केला. आई बाबा म्हणत त्यांना घट्ट मिठी मारून रडले. 'बाबा हे काय? तुम्ही इथे? दादा वहिनी कुठे आहेत?'

'अरे समीर, सर्व होत्याच नव्हतं झालं रे. तुझे दादा वहिनी एका बस अपघातात मृत पावले. त्यातच आम्ही गावी राहून कसबसे भागवत होतो. पण तिथे काहीच होत नव्हतं.

म्हणून मग आम्ही इकडे आलो. तुम्हाला कोणत्या तोंडाने सांगायचं कळत नव्हतं. इकडे आता मी पहारेकऱ्याची नोकरी करतो.'

'बाबा दादा वहिनीच एवढ वाईट झाले,



तरी तुम्ही आम्हाला सांगितलं नाही.....अहो तुमची ही अवस्था आणि आम्ही तुम्हाला काय हाकलवून देणार.....अहो काय हे. तुमचा एक मुलगा जिवंत असताना तुम्ही असे काम करणार?' समीर अगदी रडकुंडीला येऊन बोलला.

'आई चला आत्ताच्या आत्ता घरी चला. जे काही महत्त्वाचं सामान आहे ते घ्या सोबत. गाडीत बसा. बाकीचे मग आपण आणण्याची सोय उद्या करू, रूपाच्या बोलण्याने सासूने तिच्या तोंडावरून हात फिरवला. 'पोरी दोन जीवांची हाय ग तू, खूप बर वाटलं.'

'हो ना, मग चला ह्या लेकीचे डोहाळे लपून छपून नको तर, आनंदाने पुरवा. सुमन ताई...तुझ्या दोन्ही लेकरांना घेऊन पण तू चल आजचा दिवस आमच्याकडे. सर्वजण माझ्या आई बाबांचे स्वागत अगदी जंगी करू. परी बेटा ये आता तूच आमची मोठी लेक. आपण तुला मोठ्या शाळेत पाठवू. चला चला, आइस्क्रीम खाऊया.' अस म्हणत रूपाने परीला जवळ घेतलं.

'दादा वहिनी हवे होतात, तुम्ही एवढ पण कोणी रागावत का? की एवढे लांब आम्हाला न सांगता गेलात.' सर्वजण घरी आल्यावर रूपाला आता कुठे घर भरल्यासारखं वाटलं. घरातील प्रत्येक भिंत, हसून हसून साऱ्यांचं स्वागत करत होती. घराला घरपण येणे म्हणजे काय असतं? ह्याची प्रचिती सर्वांना आलेली. रूपाला तर अवघडलेल्या अवस्थे मध्ये आई बाबांचे प्रेम मिळणार म्हणून ती खूपच खुश होती. आज आई बाबा, परीच्या रुपात तिची रुसलेली देवता घरी परतली होती.

शुभ दिपावली

ब्युटी टीप्स

# गव्हाच्या पिठाचे फायदे

- गव्हाच्या पिठामध्ये अधिक प्रमाणात विटामिन्स आणि मिनरल्स आढळतात. तसेच यामध्ये विटामिन ई आणि जिंक असून सुरकुत्यांच्या समस्या दूर करून इलास्टिसिटी राखून ठेवते. यामुळे त्वचा अधिक ताजी आणि आकर्षक दिसते.
- गव्हाच्या पिठाने चेहऱ्यावर मसाज केल्यास, डेड स्किन सेल्सची समस्या दूर होते आणि मुरूमांचा त्रास होत नाही. सर्क्युलर मोशनमध्ये गव्हाचे पीठ चेहऱ्यावर लावल्याने उजळपणा मिळतो.
- **UV Rays** चा प्रभाव कमी होतो. गव्हाच्या पिठात असणारे अँटीऑक्सिडंट्स त्वचेचा सूर्याच्या किरणांपासून बचाव करतात. यामुळे त्वचा अधिक काळ तरूण राहण्यास फायदा मिळतो.

# निस्तेजपणा कमी करण्यासाठी

उष्णता, ऊन आणि प्रदूषणामुळे त्वचा अत्यंत खराब होते. निस्तेज झालेल्या त्वचेची काळजी घेण्यासाठी २ चमचे गव्हाच्या पिठामध्ये १ चमचा कोरफड जेल, बदाम तेल मिक्स करा. हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि मसाज करा. कोरफडमध्ये असणारे सूदिंग इफेक्ट त्वचेवरील गेलेला चमकदारपणा पुन्हा मिळवून देण्यास मदत करते. तर याशिवाय त्वचेला थंडावाही मिळतो. निस्तेजपणा दूर करण्यासाठी याचा आठवड्यातून २–३ वेळा प्रयोग करा.



# With best compliments from

Indianewsnet.com™


The News Portal In Cyber World

## Chief Editor : Dr. Vilas Pawar

# NEWS PORTAL

**Marathi & English**

HAPPY Diwali



# दिवाळी निमित्त
# हार्दिक शुभेच्छा!



फेडरेशन ऑफ कमर्शियल प्रिमायसेस ॲन्ड इंडस्ट्रियल इस्टेट को. ऑप. सोसायटी लि. ठाणे डिस्ट्रीक्ट

## डॉ.विलास ज.पवार
अध्यक्ष


## डॉ. अनिल खडतरे
सचिव



## वंदना श्री.काटदरे
खजिनदार




कार्यालय : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : ०२२-६९३०९१९७
Email: fed.premises@gmail.com



# तडजोड जगण्यातली....

- वर्षा प्रदिप ब्रम्हपुरकर

**तिच्या हातात राजीनामा वापस घेत असल्याचा अर्ज होता .सगळ्यांनी तिला आशीर्वाद दिले. दिनेश आज तिला शाळेत सोडणार होता. अर्थातच तिचा अहंकार मोडून काढण्यासाठी तिच्यासह घरातले सगळेच तिच्या सोबत होते.**

श्री सरस्वती विद्या मंदिर, प्राथमिक आणि माध्यमिक विभाग. असं मोठ्या अक्षरांत लिहिलेल्या शाळेच्या पाटीकडे दिपाने क्षणभर उभं राहून पाहिले आणि अस्वस्थ मनाने ती झपझप पावले टाकत निघून गेली.

दीपा आज शाळेतून लवकर आली होती. नीलाई म्हणजे तिच्या सासूबाईंनी चहा टाकला आणी 'चहा घ्यायला ये' म्हणून दिपाला आवाज दिला.

नीलाई आणि दादांचा म्हणजे दिपाच्या सासऱ्यांचा चहा घेऊन झाला. तरी दीपा रूम मधून बाहेर आली नाही.

मग मात्र नीलाई तिच्या रूममध्ये गेल्या तेव्हा दीपा जोरजोरात कुणाशी तरी भांडत होती आणी रडतही होती. नीलाईला काय करावं समजत नव्हतं त्या गेल्या तशाच बाहेर आल्या.

दादांना सांगून त्या शेजारीच असलेल्या विठ्ठल मंदिरात भजनासाठी गेल्या. त्यात त्याचं लक्ष लागत नव्हतं म्हणून त्या तासाभरात वापस आल्या. दादा अंगणातल्या झोपाळ्यावरच बसलेले दिसले.

घरात अंधार होता. देवाजवळ दिवाही लावला नव्हता.

मग मात्र त्या काळजीत पडल्या. घरात जाऊन दिवाबत्ती केली. तो पर्यंत त्यांचा मुलगा दिनेश आला. तो नेहमीप्रमाणे रूममधे गेला तर सांजवेळेला दीपा झोपलेली दिसली. काळजीने त्याने नीलाईला विचारले काय ग काय झाले आहे दीपाला, बरं नाहीये का ? डॉक्टरकडे जाऊया का ...!

नीलाई म्हणाल्या काय झालं आहे ते

कोणालाच माहीत नाही. शाळेतून आल्या पासून ती रूममधेच आहे.

काहीतरी नक्कीच बिनसले आहे हे नक्की. नीलाईने स्वयंपाक केला.

दोन्ही नातवंडांना दादांना, दिनेशला जेवायला वाढलं आणि त्या दिपाची वाट पहात बसल्या. दिपा आली दोघीजणी जेवल्या. दिपाखूप चिडलेली दिसत होती. कोणीही काही बोलले नाही. तो दिवस तसाच संपला. सकाळी नेहमी प्रमाणे नातवंड शाळेला गेली नीलाईने त्यांना डब्बा दिला. दिनेशही आवरून ऑफिसला निघाला. दहा वाजता दिपालाही शाळेला निघायचं असतं पण ती अजून तयार नव्हती शाळेत जायची कोणतीच तयारी करतांना दिसत नव्हती. दहा ते पाच शाळा असते म्हणून पटापट सगळं आवरून छान टापटीप साडी मेकअप करून हौसेने तयार होणारी प्रसन्न दिसणारी. संध्याकाळी शाळेतून आल्यावर मुलांची वाट पहणारी. खायला खाऊ तयार करून ठेवणारी.

स्वता:च्या डब्यात वेगवेगळे पदार्थ नेऊन सर्व सहकार्यांना खाऊ घालणारी दीपा आज सगळं संपल्या सारखं वागत होती.


आता शांत बसून चालणारं नाही. म्हणून दादांनी दिपाला आवाज दिला व म्हणाले. 'तू शाळेत जाताना मला बँके जवळ सोड मला पेन्शन आणायची आहे.'

ते ऐकल्यावर दीपा रडायला लागली म्हणाली 'आज मी संस्थेच्या अध्यक्षांना भेटायला त्यांच्या घरी जाणार आहे. आज माझी रजा आहे.' दादांनी विचारले 'रजा ..! का तुला बरं वाटत नाहीये का.' तसं तिला ज्यास्त रडू येत होतं. दीपा म्हणाली, 'दादा मी काल नोकरीचा राजीनामा देऊन आले आहे. आता फक्त तीन महिने शाळेत जाईन.'

हे ऐकून दादा आणी नीलाईला धक्का बसून एकदम ते खालीच बसले.

म्हणाले 'एवढा मोठा निर्णय एकदम एकटीने कसा काय घेतलास.'

दादांचा रागाचा पारा चढला होता.



'दिनेशला विचारलेस का ..! त्याला माहीत आहे का?'

'आम्हांलाही विचारावं असं वाटलं नाही तुला..!'

दीपा आतून धूमसत होती. नीलाईने तिच्या पाठीवरून हात फिरवला आणि असं करण्याचं कारण विचारलं. तेव्हा दीपा म्हणाली.

'या वर्षी मुख्याध्यापक पदाच्या बढतीसाठी माझा नंबर होता परंतु शाळेने पाठवलेल्या यादीत माझं नावं नाहीये.'

'मी मुख्याध्यापक पदासाठी पात्र आहे. शाळेच्या स्थापनेपासून मी तिथे काम करते. मी शैक्षणिक दृष्ट्यासुध्दा पात्र आहे आणि माझा नोकरीचा कालावधी पण इतरांपेक्षा जास्त आहे. तरीही माझे नाव लिस्ट मधे नाही. त्या मुळे आता मला तिथे नोकरी करायची नाही. म्हणून मी राजीनामा दिला आहे.'

हे ऐकून दादा खूप चिडले. 'असे का केले यांची रीतसर चौकशी आपण केली असती.'

'तू घाईने राजीनामा द्यायला नको होता.' तेवढयात दिनेश आला. झाला प्रकार ऐकून तो स्तब्धच झाला व म्हणाला, 'दीपा आपल्याला तुझ्या नौकरीचा गरज आहे.'

'आपला संसार मुलांची शिक्षणं हे सगळं आपल्या दोघांच्या मिळकतीतूनच आपण करतो. तू थोडं थांबायच होतंस, घरात चर्चा केली असतीस तर ..!'

'तुझ्या जवळच्या मैत्रिणींच्याही कानावर घातले असते तर काही मार्ग सापडला असता. झाल्या प्रकाराचीही तीव्रता कदाचित कमी झाली असती. तेव्हा राजीनाम्याचा विचार तुझ्या डोक्यात आला नसता.'

'म्हणून सांगतो माणसाने नेहमी संवाद साधला पाहिजे. ते काही नाही आता तू राजीनामा मागे घे. राजीनामा वापस घेता येतो. तीन महिन्यांचा कालावधी असतो'. त्याचं वाक्य पूर्ण व्हायच्या आत दीपा म्हणाली. 'नाही मी मागे घेणार नाही.'

'संस्थेला माझी गरज असेल तर माझा राजीनामा नामंजूर होईल.' आता दीपाचा अहंकार जागा झाला होता. तिने शाळेसाठी घेतलेले कष्ट तिला सतत आठवत होते.

तिने स्वताः वेगवेगळ्या शैक्षणिक पदव्या घेऊन ते शिक्षण ती शाळेतील मुलांना देऊन घडवत होती. त्यामुळे तिला आता तिची हक्काची पदोन्नती हवी होती. पण तसं झालं नव्हतं. आठ दहा दिवस असेच निघून गेले.

दिपाची काहीच हालचाल दिसत नव्हती. तेव्हा एक दिवस देवा जवळ दिवा लावताना नीलाईने दिपाला आवाज दिला व समजून सांगायला सुरूवात केली. दीपा तुला शिक्षिका व्हायचं होतं. गरीब विद्यार्थ्यांना

घडवायचं होतं. त्या सोबतंच तुझ्या संसारालाही हातभार लावायचा होता. आदर्श शिक्षिका व्हायचं होतं. हे सगळं आता



संपणार.'

तेव्हा दीपा म्हणाली 'मी दुसरीकडे नोकरी शोधेन.' नीलाई म्हणाल्या 'म्हणजे पुन्हा नव्याने सुरूवात, कमी पगार मिळणार. शिवाय सहकारी नवे, संस्थाचालक नवे. जमेल का तुला..!'

'इथे कसं सगळे तुझे जुने ओळखीचे, संस्थेतले सगळे अगदी घरच्या सारखे आहेत न.' असं म्हणल्यावर दीपा पुन्हा रडू लागली.

म्हणाली 'खरंच मी पूर्ण चौकशी करून राजीनामा द्यायला हवा होता.'

'आता मी तो मागे नाही घेऊ शकत. मला अपमान वाटतो. कमीपणा वाटतो.'


तेव्हा नीलाई म्हणाल्या 'तुला जर वाटत असेल आपलं चुकलं आहे तर. आपली चूक आपणच सुधारायची असते. तेही स्वतासाठी.' तेवढ्यात दादा म्हणाले 'राजीनामा देण्याचा हक्क आहे .तसाच तो कालावधी संपायच्या आत वापस घेण्याचाही हक्क आहे'

'पण एवढंच सांगतो दीपा तुझं नावं का वगळण्यात आलं ह्यासाठी चौकशी करण्यात मी तुला मदत करेल. तु मागितली नाहीस तरीही.'

'बाकी तुझं तू ठरवं.' नीलाई नेहमी प्रमाणे सकाळी उठल्या त्यांनाउदबत्तीचा सुवास आला. दीपा पटापट सगळं आवरत होती.

शाळेत जाताना ती देवाच्या, दादांच्या, नीलाईच्या पाया पडली. तिच्या हातात राजीनामा वापस घेत असल्याचा अर्ज होता. सगळ्यांनी तिला आशीर्वाद दिले.

दिनेश आज तिला शाळेत सोडणार होता. अर्थातच तिचा अहंकार मोडून काढण्यासाठी तिच्यासह घरातले सगळेच तिच्या सोबत होते.



# अनपेक्षित

-सुचित्रा अशोक कुंचमवार

**त्याच्या आगमनाची सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते. त्याच्यासाठी एक छान रूम सजवली होती. त्याला काय लागेल याची लिस्ट बनवली होती थोडक्यात काय बाळाच्या आगमनाची घरातील सर्वच आणि होणारे आई बाबा देखील जय्यत तयारी करत होते.**

रीना आणि अजयचे लग्न धुमधडाक्यात संपन्न झाले आणि ती सासरी गेली. दोघांचीही आधीपासूनची ओळख होती. त्यामुळे सासरी नवीन रीनासाठी नव्हतेच काही. नवीन लग्नाचे गोड गुलाबी दिवस जात होते. म्हणता म्हणता त्याला चार वर्षे झाली. सगळे त्यांना चिडवत होते, गोड बातमी कधी देणार म्हणून.दोघांचे प्रयत्न चालूच होते,ते देखील येणाऱ्या पाहुण्याची आतुरतेने वाट पाहत होते.कोण काय उपाय सांगेल ते करून पाहत होते. डॉक्टरांचे उपचार चालूच होते. दोघांच्याही सगळ्या टेस्ट झाल्या,सगळे रिपोर्ट नॉर्मल होते त्यामुळे आता वाट पाहण्याशिवाय हातात काहीच उरले नव्हते.

तो गोड बातमी देणारा दिवस लवकर यावा म्हणून दोघेही देवाला साकडे घालत होते आणि एक दिवस अचानक ती सकाळ आनंदाची वार्ता घेऊन आली, हो..!! तीच बातमी, ज्याची ती दोघेही आणि घरातील सगळेच आतुरतेने वाट पाहत होते. सगळ्यांना खूप आनंद झाला. अजय तर आनंदाने उड्या मारत होता. तो म्हणाला,'हे बघ आता अवघड काही कामे करू नकोस स्वत:ची आणि माझ्या बाळाची काळजी घे ,मी बाबा होणार आहे रीना,माझे डोळे आतुरलेत गं त्याला पाहण्यासाठी'. डॉक्टरांच्या सल्ल्याने रीनाला औषध पाणी सुरू झाले. अजय रीनाची खूप काळजी घ्यायचा. सगळे काही व्यवस्थित चालू होते. आता तब्येत ही छान ठणठणीत होती.

दिवसेंदिवस रीनाच्या वाढणाऱ्या पोटाकडे पाहिले की, तिला खूप हसू यायचे. अजयही खूप खुश होता मुलगा किंवा मुलगी

काहीही होवो पहिले अपत्य खुशीने आनंदाने स्वीकारायचे असे ठरले होते कारण पालकांचे ते पहिले अपत्य होते, संसाराच्या वेलीवरचे ते अनमोल फूल होते .

पोटातील त्या बाळासोबत दोघेही खूप गप्पा मारायची. आपल्या मनातले त्याच्याशी बोलायची. तो देखील पोटात इकडे तिकडे फिरल्याची हालचाल दाखवून प्रतिसाद देत होता. हे बाळ त्या दोघांचा लाडोबा होता.

त्याच्या आगमनाची सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते. त्याच्यासाठी एक छान रूम सजवली होती.त्याला काय लागेल याची लिस्ट बनवली होती थोडक्यात काय बाळाच्या आगमनाची घरातील सर्वच आणि होणारे आई बाबा देखील जय्यत तयारी करत होते. कधी कधी पोटात बाळाची धडपड, धावपळ जाणवायची त्याचे ते पोटात सुळकन पळणे, लाथा मारणे याने ती हैराण व्हायची या त्याच्या बाळलीलांनी.. याने तर अजूनच रीनाची तारांबळ उडायची.

'मातृत्व सुख' म्हणजे काय याचा पुरेपूर अनुभव ती घेत होती.'मी आई होणार' किती सुखद अनुभूती असते एका स्त्रीसाठी. मातृत्वाशिवाय स्त्रीजन्माला परिपूर्णता लाभत नाही असे म्हणतात. म्हणजे रीना आता पूर्ण होणार होती. मी एका बाळाची आई होणार होती.

आता पोटाचा चेंडू थोडा जास्तच मोठा वाटू लागला होता. सगळे रीनाला चिडवायचे तेव्हा तिला त्यांचा रागही यायचा पण मनात खूप आनंद देखील तितकाच व्हायचा. औषध घेण्याचा खूप कंटाळा यायचा म्हणून ती डॉक्टर कडे जायला टाळाटाळ करायची. तिची तब्येत ही छान होती. काही त्रास देखील व्हायचा नाही. सगळे काही व्यवस्थित असल्यामुळे तीन महिन्यानंतर ती काही पुन्हा डॉक्टरांकडे कधी गेलेच नाहीत.

म्हणता म्हणता सहा महिने संपले आणि सातव्या महिन्यात पदार्पण झाले.एके दिवशी अचानक रीनाच्या पोटात खूप दुखायला लागले.कुणाला काय होते हे कळतच नव्हते.पहिलाच अनुभव होता त्यामुळे नक्की काय होतंय हे ती सांगूही शकत नव्हती. त्रास मात्र भयानक होत होता. त्याच परिस्तिथीत रीनाला ऍडमिट करावे लागले.डॉक्टर मॅडम म्हणाल्या रीनाची कंडिशन क्रिटिकल आहे.गर्भ पिशवीचे तोंड उघडले आहे,जर डिलिव्हरी झाली तर सात महिन्यांचे बाळ तब्येतीने नाजूक असेल त्याची खूप काळजी घ्यावी लागेल.

हे ऐकून सगळेच घाबरले आणि देवाचा धावा करू लागले.अजयला तर काय करावे हे काहीच सुचत नव्हते. अशा परिस्थितीचा आपल्याला सामना करावा लागेल असे स्वप्नातही वाटले नव्हते. आतापर्यंत ती दोघे फक्त सुखाचा अनुभव घेत

होती. पण म्हणतात न 'सगळेच दिवस सारखे नसतात' या गोष्टीला मात्र ती दोघे साफ विसरली.

सातव्या महिन्यातच डिलिव्हरी झाली तर बाळाला अपाय होऊ शकतो किंवा रिनाच्याही जीवाला धोका होऊ शकतो असे डॉक्टरांनी सांगितले होते. इतक्या वर्षानंतर इतकी वाट पाहिल्यानंतर आमचे स्वप्न पूर्ण होणार होते म्हणून आम्ही आनंदात होतो पण ते पूर्ण होण्याआधीच आमचे स्वप्नभंग होणार होते. नियतीच्या मनात काय असते हे थोडेच कुणाला ओळखता आले.

रीनाला आपण वेळोवेळी डॉक्टरकडे नेऊन दाखवायला पाहिजे होते असे अजयच्याच्या मनात वारंवार येत होते आणि आपल्याच निष्काळजीवर त्याला स्वत:चा रागही येत होता.पण हीच निष्काळजी आता सर्वांना दु:खाच्या खाईत लोटणार होती.

असे म्हणतात न की गेलेली वेळ परत येत नाही त्यामुळे आता त्यांच्या हातात काहीच नव्हते.देवाचा धावा करण्यावाचून काहीही करणे अशक्य होते.

याच विलक्षण अवघड परिस्थिती मध्ये रीनाची डिलिव्हरी झाली आणि ते ही नॉर्मल. आमचे गाऱ्हाणे देवाने ऐकले होते. बाळाच्या आवाजाने अख्खे हॉस्पिटल दणाणून गेले. अजय गोड बातमी ऐकण्यासाठी कधीपासून अधीर झाला होता. डॉक्टर मॅडम बाहेर येण्याची वाट ते आतुरतेने वाट पाहत होते.अजयचा जीव काळजीने,चिंतेने वरखाली होत होता आणि तेवढ्यात एक सिस्टर धावतच आमच्याकडे येतेय हे पाहून आम्ही घाबरून गेलो. रीनाला काही झाले नाही न या चिंतेने क्षणभर काळजात धस्स झाले.


सिस्टर म्हणाल्या, तुम्ही अजय ना!लवकर चला! तुम्हाला डॉक्टरांनी आत बोलावले आहे. मी धावतच तिच्या मागे गेलो जाईपर्यंत भीतीने आणि अनाहूत काळजीने नाना तऱ्हेचे विचार मनात येत होते. 'माझं बाळ आणि रीना सुखरूप आहेत ना...! या काळजीने माझा जीव वरखाली होत होता. वॉर्डमध्ये जाई पर्यंतचे अंतर मला मैलोंनमैल दूर आहे असे जाणवत होते. मी तसाच धावत रीनाकडे गेलो आणि पाहतो तर काय?

रीनाला जुळी मुले झाली होती आणि ती माझ्याकडे लाजून आनंदाने पाहून हसत होती. मला तर काय बोलावे हे सुचतच नव्हते. आपण कल्पना करतो एक आणि होते दुसरेच काही,जीवन यालाच तर म्हणतात का.....?

डॉक्टर मॅडमने सांगितले 'तिघेही छान आहेत. काळजी नसावी. तुम्ही वेळोवेळी डॉक्टरकडे गेला असतात,चेकअप केले असते तर ही गुड न्युज तुम्हाला आधीच कळाली असती. दोन्ही बाळाचे वजन आईला पेलवले

नाही म्हणून लवकर डिलिव्हरी झाली.आता सगळे ठीक आहे ऑल ओके.'

इतक्या वेळेपासून मनावर असलेला असलेला ताणतणाव अगदी क्षणार्धात मावळला आणि 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' असे जाणवू लागले. काळजी अन चिंतेचे वातावरण आनंदमय




क्षणात बदलून गेले.

सर्वांना खूप खूप आनंद झाला. दोन्ही बच्चू छान झोपले होते आणि त्यांचे आईबाबा किती काळजी करत होते. ही दोघे मोठी झाल्यावर त्यांच्या जन्माची कथा सांगितली तर ऐकून दोघेही हसतील हे नक्की..

ही देवाघरची दोन्ही फुले आता आमचे आयुष्य सुगंधित करणार होती. या प्रसंगाने सर्व खूप हसत होती मात्र छोटीशी चूकही आम्हाला आयुष्यभर रडवून गेली असती. यातून एक धडा देखील शिकलो की, प्रत्येक काम वेळच्या वेळी करायचे आमच्या बच्चूनी सर्वांना हा धडाच शिकवला जणू.

आजी म्हणाली 'बघा न या लबाडानी कसे फसवले सर्वानाच.आता दोघे भाऊ मोठे झाले न मग त्यांना ऐकवू त्यांच्या आगमनाची दाखवा.' आजीच्या रीनाला म्हणाला 'अगं हा देवाचा आशीर्वाद आहे, आपण मागत होतो एक आणि हे दुसरे बाळही 'अनपेक्षितपणे' आपल्या पदरात मिळाले. त्यांना काही कमी पडू नये याची काळजी आपण घेऊ आणि त्यांना सुसंस्कारित करून या देशाचे उज्ज्वल कर्तृत्व करणारे नागरिक बनवूया.' इतक्या वेळेपासून असलेल्या काळजीच्या वातावरणाचे क्षणात आनंदात रूपांतर झाले.

कधी काही वेळेस काही गोष्टींचा असाही 'अनपेक्षित' सुखद धक्क्याचा शेवट असू शकतो. नेहमी



# माझी प्रिय मावशी

- सुहासिनी मानकामे

**मावशीचे घर बैठे होते. पुढे अंगण आणि मागे मोठे परसदार. मावशीने परसदारात शेवग्याची झाडे, आंब्याचे झाड व लिंबाचे झाड लावलेले होते. त्यामुळे आंबे खायला मिळत. शिवाय मावशी लिंबाचेही लोणचे छान बनवायची.**

माझ्या आईचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. आईचे निधन झाल्यावर माहेरी जाणे जवळपास बंदच झाले होते. मला आईची खूप आठवण यायची.

पण काय करणार! मे महिन्यात माझ्या मुलांना सुट्टी लागली व मला आईची तीव्रतेने आठवण झाली.

मुले मला म्हणू लागली, 'आई, आपण या वर्षी मावशीकडे जाऊ या का? आपली शकू मावशी नेहमीच आपल्याला बोलवत असते. होय ना!'

होय रे बाबांनो, खरे आहे तुमचे म्हणणे. पण तुमच्या शकू मावशीची आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही.

पण शकू मावशीच्या बाबतीत सांगायचे तर, 'माय मरो, मावशी जगो' ही म्हण तिला तंतोतंत लागू पडेल. तरीपण मी मावशीला फोन करून विचारेन. आपण सर्वांनी न सांगता तिच्या घरी जाऊन तिला सरप्राईज देणे योग्य नाही.

'होय आई, तू म्हणते ते खरे आहे.' मुले म्हणाली.

'ठरले तर!' मी मुलांची समजूत काढली. शकू मावशी ही माझी आवडती मावशी होती. तिचे यजमान सोनारकाम करायचे. त्यांची शेतीवाडी होती. पण भाऊबंदकीमुळे शेताची वाटणी झाली. सुवर्ण नियंत्रण कायदा आला आणि मावशाचा धंदा बसला. मावशांना शिकारीचाही नाद होता. ते आपला फावला वेळ शिकार करण्यात घालवत.

मी मावशीला, मुलांना घेऊन

तुझ्याकडे येणार आहे असे म्हणताच मावशी खूश होऊन म्हणाली, 'ये ग, सुमा, मी तुझी वाट पाहीन.' माझे नाव सुमन होते पण आई मला सुमा म्हणायची आणि म्हणून माझ्या दोन्ही मावशी मला सुमा म्हणूनच हाक मारत.

ठरल्याप्रमाणे मी मुलांना घेऊन मावशीकडे गेले.

मला व मुलांना पाहताच मावशीला खूप आनंद झाला. तिने मला जवळ घेतले व माझा मुका घेतला. मावशी वज्रेश्वरी येथे राहत होती. शेतीवाडी व कुक्कुटपालन हे तिच्या



उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते. पण आता पूर्वी सारखा सोनारांचा धंदा चालत नसल्याने सर्वच सुवर्णकारांचे आर्थिक गणित बिघडले होते. तरी देखील मावशी आनंदी असायची. हसऱ्या चेहऱ्याची असायची.

रात्री आमच्या गप्पा खूपच रंगल्या. आईची आठवण निघाली. आईच्या आठवणी सांगताना मावशीच्या व माझ्या डोळ्यात पाणी आले. माझ्या जन्माच्या वेळी आईची तब्येत बरी नसायची, त्यावेळी माझी काळजी मावशीनेच घेतली होती. माझ्या करता माझी मावशी दुसरी आई होती.

मावशीचे घर बैठे होते. पुढे अंगण आणि मागे मोठे परसदार. मावशीने परसदारात शेवग्याची झाडे, आंब्याचे झाड व लिंबाचे झाड लावलेले होते. शिवाय मावशी लिंबाचेही लोणचे छान बनवायची. आंबट वरणात शेवग्याच्या शेंगा टाकायची. एव्हढे छान लागायचे आंबट वरण. तसे आंबट वरण मला कधीच जमले नाही. माझे मिस्टर म्हणत, 'सुमा, तुझी मावशी सुगरण आहे. किती छान जेवण बनवतात.' मिस्टरांच्या मताशी मी सहमत असायची. १५ दिवस आम्ही सर्व मावशीकडे होतो. जावेसे वाटत नव्हते. पण रजा संपत आली होती. कामावर जाणे तर भागच होते. जाण्याच्या आदल्या दिवशी मावशीने भरलेली कोंबडी व मसाला भात बनवला. आम्ही सर्वांनी ताव मारून तो खाल्ला. मावशी कोंबड्या पाळत असल्याने गावठी कोंबडीची अंडीही खायला मिळाली.

जाताना मी मावशीच्या हातात १०००/– रु. दिले व घरून निघताना आणलेली भारी साडी तिला दिली. मावशीचे डोळे पाणवले.

मावशीने मला जवळ घेतले व म्हणाली, 'सुमा, हे मला काही नको असते. तुम्हा मुलांचे प्रेम माझ्याकरता खूप आहे आणि तेच माझ्याकरता टॉनिकही आहे आणि येत जा गं वरचेवर!'

'होय मावशी' मी म्हणाले.

घरची आर्थिक स्थिती चांगली नसतानाही मावशीने आमच्या पाहुणचारात काहीच कमी पडू दिले नाही.

वज्रेश्वरी देवीचे दर्शन घेऊन आम्ही घरी परतलो.

घरी आल्यावर माझ्या डोक्यात एकच विचार यायचा की, मावशीला मला कशाप्रकारे मदत करता येईल. मावशीचे शेत वज्रेश्वरी जवळ असलेल्या एका खेडेगावात होते. शेतावर एक बेडे म्हणजे फार्म हाऊस होते. तिथे जर तिने मोठ्या प्रमाणावर कुक्कुटपालनाचा व्यवसाय केला तर तिला मोठ्या प्रमाणावर पैसे मिळतील. भिवंडी, ठाणे, मुंबई या शहरात कोंबड्या व अंडी विकून भरपूर पैसे मिळतील व तिला पैशाची चणचण भासणार नाही. पण त्याकरता पैशाची गरज असल्याने बँकेच्या विविध योजनांमध्ये भाग घ्यावा लागेल. तो विचार मला पसंत पडला. कारण मी स्वत: बँकेतच कामाला होते. त्यामुळे मला बँकेकडून कर्ज मिळवण्या करता काय करावे लागेल हे माहीत होते. माझी मावशी स्वाभिमानी होती, ती डायरेक्ट माझ्याकडून पैसे घेणार नाही याची मला जाणीव असल्याने मी मावशीचा एकुलता एक मुलगा सुरेश याला ही कल्पना सांगितली व त्याला ती आवडली देखील. सुरेश नुकताच



एस.एस.सी. पास होऊन नोकरीच्या शोधात होता. नोकरी करण्यापेक्षा स्वत:च्या पायावर उभा रहा असे मी त्याला सांगीतले आणि जर नोकरी मिळाली तर गडी–माणसे ठेवून धंदा पुढे चालू ठेवता येईलच.

माझ्या प्रयत्नांना यश आले व

सुरेशला बँकेचे कर्ज मिळाले. सुरेशने वज्रेश्वरी जवळ असलेल्या त्याच्या शेतावर कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला. आमच्या अपेक्षेप्रमाणे कुक्कुटपालनाचा धंदा तेजीत आला, चांगला चालला. कुक्कुटपालन केंद्राचे नाव आम्ही 'शकुंतला कुक्कुटपालन केंद्र' असे ठेवले. अल्पावधीतच धंदा नफ्यात आला. वज्रेश्वरीपासून मावशीचे शेत जवळ असल्याने तासाभरात जाऊन येता यायचे व कामगारांवर लक्षही ठेवता यायचे. मावशीला हा धंदा कोणी सुरू करून दिला हे कळल्यावर खूप आनंद झाला. तिच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. मी मावशीला म्हणाले, 'मावशी आई वारल्यानंतर तू आम्हाला वेळोवेळी मदत केली. त्यावेळी तू आम्हाला धीर दिलास आधार दिलास. आम्ही नोकरीला लागेपर्यंत मावशीने आमच्या वडिलांना आर्थिक मदत केली हे आम्हाला माहित होते. आता सुवर्ण नियंत्रण कायद्यामुळे सर्वच सुवर्ण कारागिरांची आर्थिक घडी विस्कटली आहे हे ठाऊक असल्याने मी तुला थोडी मदत केली तर बिघडले कुठे? नाहीतर नातीगोती काय कामाची? आपली माणसे म्हणायचे आणि संकटकाळी त्यांच्याकडे पाठ फिरवायची असे दुटप्पी वागणे मला आवडत नाही. आईच्या मागे तू आमच्यावर जे संस्कार केले त्यामुळेच आयुष्यात आम्ही काहीतरी करू शकलो. हो ना मावशी!'

'हो रे बाळा! पण मला सांग तू सुरेशला किती पैशांची मदत केलीस?'

'नाही मावशी! ते मी कधीच सांगणार नाही. तू माझी प्रिय मावशी आहेस. आवडती मावशी आहेस. तुला तुझ्या भाचीला काय द्यायचे असेल तर आशीर्वाद दे.'


'होय रे बाळा! माझे आशीर्वाद आहेतच. पण...'

तिचे वाक्य अर्ध्यावर तोडून मी म्हणाले पणबिण काही नाही, 'माय मरो मावशी जगो', असे म्हणतात, ते काही उगीच नाही आम्ही सर्वांनी तेच केले.

'आता पुन्हा कधी येशील?'

'सुरेशच्या लग्नाला,' मी हसून म्हटले.

सुरेशने ही संधीचे सोने केले. धंदा भरभराटीस नेला. त्यानंतर दुग्धव्यवसायही सुरू केला. सुरेश दादा, आता खरंच सुरेश दादा झाला आहे आणि साऱ्या वज्रेश्वरीत त्याच्या शब्दाला मान आहे. वेळेवर मिळालेली संधी काय करू शकते याचे आमचा सुरेश दादा एक चांगले उदाहरण आहे. मावशी आता सुखाने जीवन जगत आहे. आणखी काय पाहिजे? सुरेशच्या रिक्षाही वज्रेश्वरीत धावत आहेत, प्रवाशांची सेवा करत आहेत. आणखी काय हवे!



# वचन

- नेहा उजाळे

**लक्ष्मीपूजनासाठी तिच्याकडे एकही दागिना उरला नव्हता म्हणून तिने थोडे सुट्टे पैसे चौरंगावर मांडले. तितक्यात अजय आला आणि त्याने मुग्धाच्या हातात दागिन्यांचे दोन बॉक्स दिले.**

अजय घरी आला तोच जीवनातले सारे काही हरल्यासारखा! कित्येक दिवस त्याच्या व्यवसायातील प्रचंड नुकसान तो सहन करत होता. शेवटी त्याला त्याची कंपनी बंद करावी लागली. दारात देणेकरींची रीघ लागली. मुग्धाला आपल्या नवऱ्याची परिस्थिती पाहवत नसल्याने शेवटी तिने आपल्या दागिन्यांचा डब्बा त्याच्या हातात दिला.

'अग! हे दागिने तुझ्या माहेराहून मिळाले आहेत. त्याच्यावर फक्त तुझाच हक्क आहे. मी हे दागिने नाही घेऊ शकत.' अजय अजिजीने म्हणाला.

'अजय! आत्ता ह्यावर काही चर्चा नको. लग्नामध्ये आपण एकमेकांना वचन दिले आहे की, एकमेकांच्या सुखदु:खात आपण साथ देऊ ते वचन मी निभावते आहे. आत्ता पर्यंत तू मला कसलीच उणीव भासू दिली नव्हती आणि आता तुझ्या पडत्या काळात मी तुला असे एकटे सोडणार नाही. मला ह्या दागिन्यांपेक्षा तू जास्त महत्त्वाचा आहेस. तू असा खचून जाऊ नकोस. आपण दोघे मिळून पुन्हा नव्याने वेगळे विश्व निर्माण करू. आजकाल क्लाऊड किचन ही संकल्पना नव्याने रुजली आहे. मी उत्तम स्वयंपाक करू शकते तर ही गोष्ट आपल्या व्यवसायासाठी नक्कीच फायदेशीर ठरेल.' मुग्धा म्हणाली.

अजयने मुग्धाचे म्हणणे ऐकले. त्या दोघांनी मिळून क्लाउड किचन हा नवीन व्यवसाय सुरू केला. अजय जेवणाची ऑर्डर घेत असे, मुग्धा ऑर्डर पूर्ण करून डब्बे भरून अजयकडे सोपवत असे मग अजय डब्बे

पोहचविण्याचे काम करत असे. मुग्धाच्या हाताला चव असल्याने नाश्त्याच्या पदार्थांना, भाजीपोळीला भलतीच मागणी वाढू लागली होती. दोन महिन्यांच्या आत मागणी इतकी वाढली की मुग्धाला हाताखाली २/३ मदतनीस ठेवाव्या लागल्या. सहा महिन्यांतच क्लाउड किचनसाठी घर अपुरे पडू लागल्याने अजय आणि मुग्धाने एक भाड्याची जागा घेऊन आपली छोटीशी खानावळ सुरू केली.

दिवाळीचा सण जवळ येत असल्याने मुग्धाने घरगुती दिवाळीचा फराळ विक्रीसाठी ठेवला. त्यालाही ग्राहकांनी पसंती दर्शविली.



दिवाळीचा फराळ हातोहात संपला.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मुग्धा साडी नेसून पूजा करण्यासाठी तयार झाली, परंतु लक्ष्मीपूजनासाठी तिच्याकडे एकही दागिना उरला नव्हता म्हणून तिने थोडे सुट्टे पैसे चौरंगावर मांडले. तितक्यात अजय आला आणि त्याने मुग्धाच्या हातात दागिन्यांचे दोन बॉक्स दिले.

'अजय, काय आहे हे?' मुग्धाने विचारले.

'हे दागिने तुझ्यासाठी आहेत मुग्धा. तुझे सगळे दागिने मी लगेचचं तुला देऊ शकत नाही; पण हे मंगळसूत्र, हार आणि त्याच्यावरचे कानातले इतकेचं मी तुझ्यासाठी करू शकलो. दोन्ही बॉक्स उघडून तर बघ. अगदी तुझे दागिने होते तशाच डिझाइनचे दागिने मी बनवून घेतले आहेत.' अजय म्हणाला.

'अजय! तू माझा खरा दागिना आहेस. ह्या दागिन्यांची मला खरोखरंच आवश्यकता नव्हती.' मुग्धाच्या डोळ्यांत पाणी तरळले होते.

'हे जे वैभव आपल्याला मिळाले आहे त्याचे श्रेय तुला आहे मुग्धा आणि म्हणूनच माझी लक्ष्मी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लंकेच्या पार्वतीसारखी मला नको होती आणि त्यासाठी मी हे दागिने तुझ्यासाठी आणले आहेत. चल लवकर ह्या दागिन्यांची पूजा कर आणि हे दागिने घालून माझ्यासमोर ये. माझ्या गृहलक्ष्मीला मला डोळे भरून पहायचे आहे. मलाही लग्नामध्ये दिलेल्या वचनाला जागायचे आहे.' अजय

म्हणाला.

मुग्धाने चौरंगावर दागिने मांडले. त्यांची पूजा केली. नंतर तिने दागिने घातले आणि अजयसमोर येऊन ती त्याच्या पाया पडली. अजयने प्रेमभराने मुग्धाला कुशीत घेतले.

'अजय! मी तुझ्यासाठी काहीच आणले नाही.' मुग्धा वाईट तोंड करत म्हणाली.

मुग्धा! तू माझ्यासाठी काही आणलं नाहीस तरी तू मला एक गोष्ट देऊ शकतेस. अजय म्हणाला.

'कुठली गोष्ट?' मुग्धा म्हणाली. 'आता लवकरात लवकर आपण आपल्या दोघांच्या प्रेमाचे प्रतीक आणू या.' अजय मुग्धाच्या गालाचे चुंबन घेत म्हणाला.

'जा, चावट कुठला.' मुग्धा लाजेने चुर्रर्र होऊन अजयच्या कुशीत शिरली.

'बरं! मला खूप भूक लागली आहे. आज आपल्याकडे बासुंदी पुरीचा बेत आहे ना? मस्त घमघमाट सुटला आहे. चल आपण दोघे पटकन जेवून घेऊ.' अजय म्हणाला.

'हो चल, मी आपल्या दोघांसाठी ताटं घेते.' मुग्धा म्हणाली.

दोघांनी हसतखेळत आपले जेवण संपवले. आज मुग्धाला दोन घास जरा जास्तच गेले होते कारण आज तिच्या नवऱ्याने तिला अमूल्य भेट दिली होती.

## चारोळ्या

एक सुंदर आणि खास असे
नाते असते नवरा-बायकोचे
सर्वच नाती सामावली तरी
मित्रत्वाचेच जास्त जवळचे !

संसार रथाची ही दोन्ही चाके
वेगळे असले जरी आकाराने
धावत असतात मात्र सोबत
दोघेही वेगवेगळ्याच दिशेने!

कधी जमत नाही तुझं नि माझं
अन् तुझ्याविनाही करमत नाही
कधी अबोला, रुसवा-फुगवा
तर कधी प्रेमाची बरसात होई

शब्दांशिवाय कळते तयांना
भावना नि वेदना मनातल्या
मौनातही ऐकू येत असतात
हाका प्रेमाच्या हृदयातल्या...

-जया सुधाकर पाटील

# टीप्स

## १. सुकामेवा चांगल्यारीतीने कसा ठेवाल!

तुम्ही पाहिलं असेल की, बरेचदा सुकामेवा बरेच दिवस राहिल्यास त्याची पावडर होते किंवा बुरशी लागते. असं होऊ नये याकरिता सुकामेवा नेहमी एअर टाईट डब्यात ठेवून फ्रिजमध्ये ठेवावा.

## २.कोशिंबीर आंबट होऊ नये म्हणून

जेव्हा पाहुणे येण्याआधी आपण कोशिंबीर बनवून ठेवतो, पण ती बरेचदा आंबट होते. लक्षात घ्या, हे टाळण्यासाठी दह्यांमध्ये आधीच सर्व साहित्य घाला. पण मीठ घालू नका. कोशिंबीर वाढायच्या वेळेस त्यात मीठ घाला, म्हणजे ती आंबट होणार नाही.


## ३.बटाट्याचे पराठे बनवण्याची योग्य कृती

बरेचदा बटाट्याचा पराठा लाटताना त्यातील सारण बाहेर येते किंवा पराठा तुटतो. असं होऊ नये म्हणून पराठयाची कणीक मळताना ती मऊ असावी आणि पराठा लाटताना मधोमध प्रेशर द्यावे; कडेला नाही. यामुळे सारण बाहेर येणार नाही आणि पराठा फाटणार नाही.

## ४.आल्याची पेस्ट कशी साठवावी?

आल्याची पेस्ट घातल्याने पदार्थाला चांगलाच झणका येतो. त्यामुळे अनेक पदार्थांत आल्याची पेस्ट घातली जाते. जर तुम्हाला आल्याची पेस्ट खूप दिवसांसाठी साठवायची असल्यास त्यात एक चमचा मोहरीचं तेल मिक्स करा. खराब होणार नाही आणि चविष्टही लागेल.





# WITH BEST COMPLIMENTS FROM

CSS

## Mission & Vision

**To create a cyber safe world**

## ACTIVITIES UNDERTAKEN

- WORKSHOPS ON THE PREVENTION OF CYBER CRIME
- SEMINARS ON CYBER SAFETY
- GUIDANCE & SUPPORT TO VICTIMS
- PUBLICATIONS ON CYBER SECURITY
- TRAINING PROGRAMS FOR SAFE CYBER LIFE
- DISASTER MANAGEMENT
- AWARENESS CAMPAIGNS
- COLLABORATION WITH LAW ENFORCEMENT

Join our movement and make India a cyber safe country

www.cybersafesociety.org | +919167785599



HAPPY DIWALI

With warm wishes,

**President : Dr. Vilas Pawar  Secretary : Adv. Virat Vilas Pawar**

**M-3, Paradise Tower, Gokhale Road, Naupada,**
**Thane (W), Mumbai, Maharashtra 400602**



दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!



# दि ठाणको बँक स्टाफ को-ऑप क्रेडीट सोसा. लि. ठाणे

रजि. नं. ३१७५४

स्थापणा दिनांक २०.१०.१९६१

**१०३-१०४ लाहोटी हाऊस, चेंदणी कोळीवाडा, राघोबा शंकर पथ ठाणे (प) ४००६०१**

---

*दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!*

# सिंधूदुर्ग नागरी सहकारी पतपेढी मर्या.





522,मनिषा,शिवाजी नगर,वडवली विभाग, अंबरनाथ,ता.अंबरनाथ,जि.ठाणे

---



दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!




# जगन्नाथ सहकारी पतसंस्था मर्या.





कारावं, मलंगगड,अंबरनाथ,ता.अंबरनाथ.जि.ठाणे.



# पुन्हा जुळलेले रेशीमबंध

-जया सुधाकर पाटील

**पहिल्या वाढदिवशी संपूर्ण घर सजलं होतं. सचिनने ऑफिसमधून मोठा खर्च करून पार्टी ठेवली होती. यामिनी आई वसुधा, बहीण सारिका, मेहुणा नीलेश सगळे आले होते. यामिनीचा चेहरा आनंदाने उजळला होता.**

कोर्टाच्या आवारात तणावाची सावली पसरली होती. सकाळचा उन्हाळी ऊन अंगावर झोंबत होता, पण सचिनच्या अंगावर थंडगार काटा उभा राहत होता. पाच वर्षांचा संसार आज संपणार होता. न केलेल्या गुन्ह्यांची शिक्षा तो भोगणार होता. घड्याळाचे काटे पुढे पुढे सरकत होते,पण त्याचे आयुष्य मात्र मागे जात होते. त्याच्या डोळ्यांत सतत जुईचं हसतं रूप डोलत होतं. जुईशिवाय जगणे म्हणजे 'शरीराशिवाय आत्मा.'

यामिनी काही पावलांवर उभी होती. तिच्या चेहऱ्यावर कोणतेच भाव नव्हते. जणू काही ती सुटकेचीच वाट पाहत होती. 'सगळं संपेल आता...' तिच्या मनात विचार फिरत होते.

सचिनच्या डोळ्यांतून पाणी गळत होतं. त्याने पुसायलाही प्रयत्न केला नाही. तो सौरभच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, 'सौरभ, माझं आयुष्य उद्ध्वस्त झालं रे... जुई माझ्या आयुष्याचं सारं काही आहे. पण आजपासून तीही माझ्या हाती नाही.'

सौरभला शब्द सुचत नव्हते. त्याने फक्त मित्राच्या खांद्यावर सांत्वनाचा हात ठेवला.

सचिनने डोळे मिटले ,श्वास घेतला आणि कोर्टात सामोरे जाण्याचा निर्धार केला. आठवणींनी त्याला वेढले होते. त्याचवेळी वकील राजेंद्र पवार पुढे आले.

'सचिन, सांभाळा स्वतःला. कोर्टात डोळे पुसत जायचं नाही. आपण शेवटपर्यंत लढलो आहोत, पण यामिनी ठाम आहे.'

'यामिनी, अजून तरी वेळ गेली नाही. शेवटचा एकदा विचार कर...आपली जुई....' सचिनचा आवाज थरथरला.

'सचिन, नाटक करू नकोस. तुझ्या खोटेपणामुळेच आज आपण इथे आलो आहोत. मला आता परत फिरायचं नाही.' यामिनी थंड आवाजात म्हणाली.

यामिनीच्या बाजूला तिचा वकील आशिष राणे उभा होता. यामिनीने एक कटाक्ष टाकला, पण त्यात ना राग होता ना माया. फक्त निर्विकारपणा.

आठवणींचा वणवा सचिनच्या डोळ्यांत पेटत होता. लग्नानंतरचे ते दिवस खरे मोरपंखी. त्यांच्या लग्नाचा दिवस अजूनही त्याला आठवत होता. हिरव्या शालुत यामिनीच सौंदर्य अजून खुलत होतं. ती जणू स्वर्गीय अप्सरा भासत होती.

सचिन एका नामांकित आयटी कंपनीत काम करत होता. मध्यमवर्गीय घर, आईवडील, मोठी बहीण आणि तिचा नवरा असे त्याचे घर. जास्त ऐशआराम नव्हता, पण स्वच्छ, प्रामाणिक, समाधानात जगणारं कुटुंब.

यामिनीचे लग्न त्याच्याशी झालं आणि दोघांचा संसार फुलून गेला.

' यामिनी, मला वाटतं देवाने मला जास्तच दिलंय' सचिन हसत म्हणायचा.

'का बरं?' यामिनी लाडाने विचारायची.

'तुझ्यासारखी सुंदर बायको दिली आणि आपल्याला किती स्वप्नं आहेत ना? आपण मिळून ती पूर्ण करू या.'

सुरुवातीला दोघे छोट्याशा भाड्याच्या घरात राहत होते. घर मोठं नव्हतं, पण त्यात प्रेमाने भरलेला संसार होता.



वर्षभरात त्यांच्या घरी चिमुकली परी आली जुई. त्या दिवशी सचिनने जणू आकाश कवेत घेतले एवढा त्याला आनंद झाला. छोट्याशा बाळाला हातात घेतांना तो थरथरत होता.

'ही तर माझी भाग्यलक्ष्मीच, आईचं रूप घेऊन माझ्या जीवनात आली. ' सचिनच्या डोळ्यात पाणी आले.

नातीला पाहून विनायकराव

आणि सुचित्राला अतिशय आनंद झाला. तृप्ती आत्या तर लाडक्या भाचीच्या अवतीभोवतीच असायची.

जुईच्या जन्माने दोघांचा संसार खरंच पूर्ण झाला. सचिन ऑफिसमधून कितीही थकून आला तरी जुईला उचलल्यावर त्याचा थकवा पळून जायचा.

'जुई, बाबा आला गं!' तो दारात शिरताच ओरडायचा.

आणि जुई हातपाय हलवत त्याच्या दिशेने खुदुखुदू हसायची आणि रांगत रांगत धाव घ्यायची.

पहिल्या वाढदिवशी संपूर्ण घर सजलं होतं. सचिनने ऑफिसमधून मोठा खर्च करून पार्टी ठेवली होती. यामिनी आई वसुधा, बहीण सारिका, मेहुणा नीलेश सगळे आले होते. यामिनीचा चेहरा आनंदाने उजळला होता. अजून एक आनंदाची गोष्ट त्या दिवशी त्यांनी घडवून आणली म्हणजे जुईच्या पहिल्या वाढदिवसाची आठवण म्हणून त्याच दिवशी त्यांचे स्वप्नातले स्वत:चे आलिशान घर बुक केले.

पण सुखाला नजर लागतेच. यामिनीची बहीण सारिका आणि तिचा नवरा निलेश नेहमीच त्यांच्या घरी येत. सुरुवातीला सचिनलाही ते साधं वाटलं. कारण त्यांच्या लग्नाला चार वर्ष होऊनही त्यांना मूलं झालं नाही त्यामुळे जुईसाठी ते येत असतील असे सचिनला वाटत होतं. पण हळूहळू निलेशचा वावर जास्तच वाढू लागला. निलेशने त्यांच्या सुखी संसारावर जाळ टाकायला सुरुवात केली होती. तो सारिकाचा नवरा असला तरी यामिनीकडे आकर्षित होता. कारण दोघी बहिणीं मध्ये जमीन- अस्मानाचा फरक होता. सारिका सावली,उंचीने कमी, नाक बसके आणि जाड तर सारिका उंच सडपातळ, गोरी, चाफेकळी नाक. सारिकाच्या लग्नानंतर सतत यामिनीला वश करण्याचा प्रयत्न करत होता.

तो सारिकापेक्षा यामिनीशी जास्त बोलू लागला. छोट्या छोट्या गोष्टींत तो हस्तक्षेप करू लागला.

'यामिनी, तुझा नवरा ऑफिसमध्ये किती वेळ घालवतो बघ. तुला आणि जुईला वेळच देत नाही. हे चांगलं लक्षण नाही'.


यामिनी प्रथम हसून टाळायची. पण मनात शंकेची बीजं पडायला लागली.

'हे काय सालीसाहेबा, एकट्याच घर आणि मुलीला सांभाळून दमत असाल ना.' एका दिवशी दुपारी निलेश एकटाच आला आणि यामिनीच्या डोक्यात संशयाची बीजं पेरू लागला.

'तसे नाही काही भावोजी, माझे ते कामच आहे आणि घरकामात मदतीला बायका आहेत ना आणि एवढ्यासाठी सचिन त्यांची कामं सोडून घरी कसा राहू शकेल?' यामिनीने हसून टाळायचा प्रयत्न केला.

'एवढी सुंदर बायको घरात असतांना सचिन उशिरा घरी येऊच कसा शकतो? कुठे असतो, प्रामाणिकपणे सांगतो का? काही लपवत तर नाही ना? मी तर बाबा असे केलेच नसते माझी बायको अशी सुंदर.....' नीलेश मुद्दाम सुंदर या शब्दावर जोर देत होता.

'यामिनी, मला निलेशचा वावर पटत नाही. तो काहीतरी वेगळा हेतू ठेवतोय'



सचिनला जाणवू लागलं.

'सगळ्यांवर शंका घेणं सोड. निलेश माझ्या आईसाठी, सारिकासाठी किती करतो ते तुला दिसत नाही का?' यामिनी चिडून उत्तर द्यायची.

गैरसमजांची ठिणगी पडली होती.

काळ जसजसा पुढे गेला तसं वाद वाढले. सचिन ऑफिसमधून दमून आला की घरात थंडपणा असायचा.

एका रात्री यामिनीने विचारलं,

'सचिन, मला सांग, खरंच ऑफिसमध्ये एवढं काम असतं का की तू घरी वेळच देऊ शकत नाहीस?'

सचिनला धक्का बसला. 'यामिनी, तू असं काय विचारतेस? सगळं आपल्यासाठीच करतोय. आता घराचे हप्ते सुरू झालेत. जुईचा खर्च वाढला, अजून थोड्या दिवसात शाळेचा खर्च सुरू होईल तर मेहनत करायला हवी.'

'मला तसं वाटत नाही,काही वेगळेच सुरू आहे.' ती रुसून म्हणाली.

सौरभने अनेकदा सचिनला समजावलं.

'सचिन, हे गैरसमज आहेत. तू थोडं जास्त लक्ष दे यामिनीला.'

पण ऑफिसचा ताण, संसाराची धावपळ यातून सचिन काही करू शकत नव्हता.

नातीच्या प्रेमापोटी सुचित्रा आणि विनायकराव अधूनमधून आठ पंधरा दिवसांसाठी सचिनकडे राहायला येत होते. सुचित्राच्या मनात त्यांच्या विषयी विष कळवण्यात नीलेश केव्हाच यशस्वी झाला होता.

'आई, तुम्ही जुईला खूप गोड देताय. डॉक्टरांनी सांगितलंय जास्त गोड देऊ नका.' यामिनी सुचित्रावर चिडली, सुचित्राने

नातीसाठी तांदुळाची खीर करून खाऊ घातली होती.

'अग,पण बाळाला चव येण्यासाठी थोडसं गोड खाऊ घातलं तर चालतं ना.' सुचित्रा हळुवार म्हणाली.

'तुम्हाला काही समजतच नाही, मी आई आहे तिची. तुम्ही फार नका लुडबुड करू.' यामिनीने रागाने उत्तर दिले.

त्या दिवसापासून तिने जुईला आजी आजोबांपासून दूर ठेवायला सुरुवात केली. विनायकरावांना हे फार लागलं.

'सचिन बेटा, आमचे काय चुकले? आमच्यापासून जुईला यामिनी दूर का ठेवते? आम्हाला अधिकारी नाहीये का?आम्ही आमच्या नातीसाठीच इथे येतो ना?' त्यांनी सचिनला विचारले.

'बाबा, समजावतो तिला. पण ती हल्ली ऐकतच नाही. विचित्रच वागते.' सचिन गोंधळाला होता. दोघांमध्ये जे चाललं आहे ते त्याला त्यांना सांगायचे नव्हते.

दुसऱ्याच दिवशी सचिन ऑफिसला गेल्यावर यामिनीने दोघींचे कपडे आणि आवश्यक सामान बॅगमध्ये भरले आणि घरात कोणालाच न सांगता माहेरी निघून गेली. जातांना सासूसासऱ्यांशी एक अक्षर ती बोलली नाही. विनायकरावांनी सचिनला फोन करून सांगितले.

'यामिनी, हे काय आहे?' सचिनने यामिनीला फोन केला.

'काय झालं आता? मी काय केलं?' ती उद्धटसारखी म्हणाली.

'तू आता कुठे आहेस?'

'मी माझ्या आईकडे आली आहे आणि पंधरा दिवस तरी येणार नाही.'

'असं न सांगता? मला नाही त नाही, आई बाबा होते घरात त्यांना तर सांगून जायचे ना?'

'आता तुला सांगितले ना, सांगून दे त्यांना. आणि मला घराबाहेर पडण्याचे स्वातंत्र्य नाही का?'

'तुला कोण अडवणार? स्वातंत्र्याचा प्रश्नच नाही. पण घरात असलेल्या मोठ्या माणसांना सांगायची काही पद्धत असते.'

'हो का,आता शिकावं लागेल मला. पण ती पद्धत फक्त माझ्याच साठी का?'

'आता काय बोलू? आई बाबा जुईसाठी आपल्या घरी आलेत आणि तू आईकडे जाऊन बसली. त्यांना किती वाईट वाटले.'

'माझी आईसुद्धा एकटीच असते. तिला माझी आणि जुईची आठवण येत होती म्हणून मी आले.'

'तू नंतरही जाऊ शकली असतीस ना. आईबाबा कायमचं थोडीच आपल्याकडे राहतात?'

'तू कधीच माझ्या बाजूने उभा राहत

नाहीस.' यामिनी जवळजवळ ओरडली.

'मी तर नेहमीच तुझ्या बाजूने उभा असतो. पण तू आईबाबांना दुखावले ना?' सचिन उत्तरला.

'तुला तुझ्या आईबाबांचीच जास्त काळजी आहे, माझी मुळीच नाही.'

यामिनीसोबत बोलून काही उपयोग नाही म्हणून त्याने फोन ठेवला आणि बाबांना यामिनीची आई आजारी असल्याने तिला माहेरी जावे लागले असे खोटेच सांगितले. बाबांना आणि आईला जाणवले की त्या दोघांमध्ये सारे काही ठीक नाही. सुनेच्या अशा वागण्याचे त्यांना खूप दु:ख झाले.

सचिनचा मेहुणा आणि जवळचा मित्र सौरभला सुध्दा निलेशच्या वागण्याची शंका येत होती.

'सचिन, लोकांमध्ये कुजबुज अशी आहे की निलेश तुमच्या घरात प्रमाणापेक्षा जास्तच लक्ष देतो. त्याचा यामिनीवर जास्तच प्रभाव आहे. तू जरा घरात लक्ष दे.' सौरभने सचिनला सावध केले.

'नाही रे, तसे काही नाही तो तिचा मेव्हणा आहे आणि त्याला जुईचा लळा वाटतो म्हणून तो घरी येतो.'

'हो,पण सावध राहणं वाईट नाही. तू घरी नसतानाच एकट्यानेच येणं जरा विचित्रच वाटतं ना.'

तो संवाद सचिनच्या मनात खोलवर रुतला.

एका दिवशी रात्री सचिनने यामिनीला विचारलंए 'यामिनी, तू सारखी माहेरी जातेस? तुझे मेहुणे सारखे आपल्या घरी येतात. लोकं उलटसुलट बोलतात.'

'तू मला दोष देतो आहेस?आमच्या स्वच्छ नात्यावर शंका घेतोयस?' यामिनी भडकली.

गैरसमज इतके वाढले की यामिनीने थेट घटस्फोटाची मागणी केली.

'मला तुझ्यासोबत राहायचं नाही,' ती निर्विकारपणे म्हणाली.

सचिन हादरून गेला.

आणि जुईचं काय?

ती माझ्याकडे राहील.

कोर्टात दोन वकील समोरासमोर उभे राहिले राजेंद्र पवार आणि आशिष राणे.

सचिनचा आवाज भरून आला,

'माझा काही दोष नाही. मी यामिनीवर, जुईवर मनापासून प्रेम करतो.'

यामिनी फक्त शांत उभी राहिली. सचिनचा वकील राजेंद्र पवार यांनी कोर्टात घटस्फोटाच्या प्रक्रियेस सुरुवात केली. यामिनीच्या वकील आशिष राणे यांनी सगळ्या पैलूंचा सविस्तर उल्लेख केला. दोन्ही बाजूंच्या तर्कांमुळे वातावरण ताणलेले होते. तारखांवर तारखा सुरू झाल्या. अनेक आरोप प्रत्यारोप खालच्या थरावर झाले. सचिन,त्याचे

आईबाबा,बहीण मेहुणे यांच्यावर अनेक खोटे आरोप लावण्यात आले. त्यामुळे सचिन खचून जात होता. त्याच्या हृदयावर आघात होत होता.निलेशने आणि यामिनीच्या आईने यामिनीच्या मनातील संशयाला खतपाणी घालून एवढे वाढवले की, तिच्या डोळ्यांवर असत्याची काळी पट्टी बांधली गेली.

शेवटी कोर्टाने घटस्फोट मंजूर केला.




जुईचा ताबा आईकडे गेला. पण महिन्यातून दोन वेळा सचिनला जुईला भेटण्याची परवानगी कोर्टाकडून देण्यात आली. सचिन पोटगी देत राहिला. आपल्या क्षमतेनुसार महिन्याला ठरावीक रक्कम. त्याची नोकरी चांगली होती, पण मन मात्र रिकामं झालं.

पाच वर्षं लोटली. जुई आता शाळेत जायला लागली होती. मोना टीचर तिच्या हुशारीचं कौतुक करत. पण जुईच्या चेहऱ्यावर नेहमीच एक पोकळी दिसायची, बाबाचं उबदार प्रेम हरवल्याची.

सचिनने अजूनही दुसरं लग्न केलं नव्हतं. आईवडीलही त्याच्या दु:खाने चिंताग्रस्त झाले होते.

'बेटा, नवीन संसार कर, यामिनी आणि जुईला विसरता तर येणार नाही पण आयुष्य थांबल्या सारखं वाटत बेटा. एवढे आयुष्य पडले आहे जोडीदार हवा ना'आई म्हणायची.

'आई, माझं मन अजूनही यामिनी आणि जुईकडेच आहे,' तो शांतपणे उत्तर द्यायचा.

एका दिवशी दुपारी जुई शाळेत, वसुधा बाहेर गेली होती आणि यामिनी घरी एकटी होती. निलेश आला. यामिनी संध्याकाळच्या स्वयंपाकासाठी भाजी चिरत होती. निलेश मागून आला आणि अचानक तिच्या कमरेला धरून जवळ ओढलं.


'भाऊजी सोडा मला, हे काय करता आहेत?' ती घाबरून किंचाळली.

'यामिनी, मी तुला सुरुवातीपासूनच आवडतो. सारिकेशी लग्न केलं ते घरच्यांच्या आग्रहामुळे. तू माझ्यासाठी होतीस, आहेस...' निलेशचा आवाज घोगरा झाला.

यामिनी स्तब्ध झाली.

'काय बडबडताय तुम्ही?'

त्याच क्षणी सारिका दारात आली.



तिने सगळं ऐकलं.

'निलेश! हे काय ऐकलं मी? तू माझी फसवणूक केलीस?'

सारिकेच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. यामिनीचंही डोकं ठणकायला लागलं. तिला आता सगळं उलगडलं सचिन निर्दोष होता, निलेशनेच हा सापळा रचला होता.

त्या रात्री यामिनी रडत बसली.

'मी काय केलं? मी माझ्या संसाराचं चुकून हत्यार केलं. सचिन, तू किती वेळा समजावत होतास... मी ऐकलं नाही.'

तिने आई वसुधाला सगळं सांगितलं. आईही स्तब्ध झाली.

'बाळा, आता उशीर झालाय का? कदाचित अजूनही सचिन तुला माफ करेल.'

निलेश आणि सारिकाच्या कथेला वेगळे वळण लागले. सारिकाला तिच्या नवऱ्याचा तिरस्कार वाटू लागला. निलेशची सारिकाच्या माहेरात किंमत कमी झाली. तो सगळ्यांच्या नजरेतून उतरला.

ऑफिसमध्ये सचिनला कामाची जबाबदारी वाढली होती. त्याला कंपनीचे नवनवीन प्रोजेक्ट मिळत होते. त्याने स्वत:ला अजून व्यस्त करून घेतले. तरीही तो पंधरा दिवसांनी जुईला भेटण्यासाठी वेळ काढतच होता. यामिनी तिला बागेत सचिनला भेट घेण्यासाठी आणत होती. पण ती दूर जाऊन उभी राहत होती. एका शब्दानेही त्याची विचारपूस करत नव्हती. सचिनचा पगार वाढत होता तसे तो जुईसाठी, तिच्या शिक्षणासाठी जास्त खर्च करू लागला. पण अलीकडे त्याला दोन महिन्यांसाठी ऑफिसच्या कामानिमित्त परदेशात जावे लागले आणि लेकीची भेट झाली नाही.

दोन महिन्यांनी जुईच्या शाळेत एक कार्यक्रम होता. सचिन पाहुणा म्हणून आला होता. मोना टीचरने त्याला बोलावलं होतं. जुईने वडिलांना पाहताच धावत जाऊन मिठी मारली.

'बाबा! मला खूप आठवण येते तुझी.' सचिनचे डोळे पाणावले.

तेवढ्यात यामिनी पुढे आली. तिचेही डोळे तुडूंब भरले.तिला आठवलं,सचिनने घटस्फोटाच्या वेळी तिला आणि जुईला मारलेली शेवटची मिठी, त्याचे रडणे,त्याची विनवणी आणि तिने स्वत: केलेली चूक. ती सचिन जवळ गेली, तिचा आवाज थरथरत होता.

'सचिन... मला माफ कर. मी चुकले, तुझ्यावर अन्याय केला. मी गैरसमजांच्या आहारी गेले. निलेशसारख्या माणसामुळे मी आपला सोन्यासारखा संसार उद्ध्वस्त केला.मला आता सत्य कळलं आहे.' सचिनने तिच्या डोळ्यांत पाहिलं, काही क्षण शांत राहिला. मग हळूच म्हणाला,

'यामिनी, मला फक्त एवढंच हवं होतं की, तू माझ्यावर विश्वास ठेवावा. पण माझं अजूनही तुझ्यावर प्रेम आहे. जुई माझं सर्वस्व आहे आणि आजही माझं जीवन तुझ्याशिवाय अपूर्ण आहे.'

जुई दोघांचे हात घट्ट धरून म्हणाली, 'आई, बाबा... आता आपण पुन्हा एकत्र राहू या ना!'

यामिनी रडत सचिनच्या मिठीत शिरली. त्या क्षणी तिघांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. जुनं तुटलेलं रेशीमबंध पुन्हा घट्ट गुंफले गेले.

## चारोळ्या

**आश्वासनांची रोज नवी**
**रंगवली जाते स्वप्नगाथा**
**खिसा मात्र रिकामाच म्हणे**
**सामान्य जनतेची ही व्यथा**

**कर वाढले, दरही वाढले**
**वाढला फक्त खर्चाचा भार**
**सामान्यांच्या नशिबी आला**
**काटकसरीचाच संसार.**

**-जया सुधाकर पाटील**

## पिंपल्सचे डाग घालवतील या फळांच्या साली

### ●केळ्याची साल

बारमाही मिळणारी ही केळीही आरोग्यासाठी फारच फायद्याची असतात. यामध्ये असलेले अनेक घटक जसे आरोग्यासाठी फायदेशीर असतात. अगदी त्याचप्रमाणे ते त्वचेसाठीही चांगले असतात. केळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात अँटी–ऑक्सिडंट असतात. जे त्वचेवरील तेलाला नियंत्रित करण्याचे काम करतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट हे त्वचेची इलास्टिसिटी वाढवण्यासाठी मदत करतात. केळे खाऊन झाल्यानंतर केळ्याची सालही देखील अनेक गुणांनी युक्त असते. या सालीमध्ये असलेले घटक चेहऱ्यावरील पिंपल्सचे डाग हळूहळू कमी करण्यास मदत करतात.

### ● संत्र्याची साल

आंबट-गोड संत्री ही अनेकांच्या आहारात नक्कीच असतील. व्हिटॅमिन्सने युक्त अशा संत्र्याच्या सालीमुळे त्वचा तजेलदार आणि स्वच्छ दिसण्यास मदत मिळते. संत्र्याची साल ताजी असताना ती पिंपल्स आलेल्या ठिकाणी चोळली तरी देखील पिंपल्सचे डाग कमी होण्यास मदत मिळते. पिंपल्सचे नाही तर सनबर्न किंवा चेहऱ्यावर आलेली लालिमा कमी होण्यासही त्यामुळे मदत मिळते. जर तुम्हाला ताजी संत्र्याची साल मिळाली नाही तर तुम्ही पावडर आणून देखील ती भिजवून डागांवर लावू शकता.

### ●पपईच्या साली

पपई ही देखील व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सनी युक्त असते. यामध्ये असलेले ब्लिचिंग एजंट हे त्वचेसाठी फायद्याचे असतात. पपई खाल्यानंतर त्याच्या साली तोंडाला चांगल्या चोळा. ज्या ठिकाणी तुम्हाला पिंपल्सचे डाग असतील त्या ठिकाणी चोळा. त्यामुळे हे डाग मुळापासून जाण्यास मदत मिळते. पपईचा गर ही घरात असेल तर तो देखील तुम्ही काढून ठेवला आणि त्याचे आईसक्युब बनवून चेहऱ्यासाठी वापरला तरी देखील त्वचा अधिक सुंदर दिसण्यास मदत मिळते.


आता फळांच्या साली नक्की वापरा आणि तुमच्या त्वचेवरील पिंपल्सचे डाग घालवा.



**शुभ**
**दीपावली**



**सखी संवादिका**



# मुके प्राणी

- वैशाली नेरकर

**रीमाच्या लक्षात आले की त्या छोट्या पिलाने आपल्याला घराचा रस्ता दाखवला. खरच हे मुके प्राणी आपल्यावर मनापासून प्रेम करतात. आपण त्यांना प्रेम द्यायला हवे. त्यांना जपायला हवे.**

चिमा सहा सात वर्षांची गोड मुलगी .ती दररोज संध्याकाळी तिच्या मैत्रिणींबरोबर घरा जवळच्या मैदानावर खेळायची. तिच्या साऱ्या मैत्रिणी काही तिच्या बरोबरीच्या तर काही तिच्या पेक्षा थोड्या मोठ्या. तिची आई सर्वांना चांगले ओळखायची म्हणून चिमाला त्यांच्या बरोबर खेळायला जाऊ द्यायची.

आजही साऱ्याजणी बरोबर खेळायला मैदानावर गेल्या. तिथे त्यांना एक कुत्र्याचे पिलू दिसले. मग काय ते कुत्र्याचे पिलू त्यांचे जणू खेळणेच झाले. ते छान दुडु दुडु चालायचे आणि मग ह्या सर्व त्याच्यामागे जायच्या. ते जमिनीवर लोळून काही जरी करायला लागले कि यांना गंमत वाटायची .पण काही वात्रट मुले असतातच. त्यांनी त्या पिलाला छोटे दगड मारायला सुरवात केली. त्यामुळे ते पिलू ओरडायला लागले. त्याचा आवाज ऐकताच त्यापिल्लाची आई धावत आली. त्याच्या आईला आलेले बघून ही मुले घाबरली व पळायला लागली. तितक्यात चिमाची आई मैदानावर फेरफटका मारण्यासाठी आली व त्यांनी झालेला प्रकार पाहिला. त्यांनी मुलांना समजावून सांगितले की, अरे ते पिलू किती लहान आहे. अगदी तुमच्या सारखेच लहान! मग त्याला तुम्ही दगड का मारत आहात? तुम्हाला जर कोणी मारले तर आईला आवडेल का? नाही ना! त्याचप्रमाणे ह्या पिलाच्या आईला पण आवडले नाही म्हणून. ती तुमच्या मागे लागली.

अरे हे मुके प्राणी आहेत म्हणून काय झाले? ते देखील आपल्या पिलांवर प्रेम करतात. आपण जर त्यांच्याशी प्रेमाने वागलो

तर ते देखील आपल्याशी प्रेमाने वागतात. त्या दिवसानंतर मुले त्या पिलाबरोबर अगदी प्रेमाने व आपुलकीने खेळायला लागली. एके दिवशी चिमा तिच्या मैत्रिणींबरोबर खेळत होती. लपाछपीचा खेळ सुरू झाला. चिमा आणि तिच्या बरोबर दुसरी एक मैत्रीण




लपण्यासाठी वेगवेगळ्या जागा शोधू लागल्या. त्याच गडबडीत दोन्हीही रस्ता चुकल्या. घरी कसे जावे अजिबातच समजत नव्हते. कोणाला विचारायचे म्हटले तर दोघीही फारच घाबरलेल्या. त्यांना काहीच सुचत नव्हते.

अगदी रडायलाच आल्या दोघीही. तितक्यात चिमाच्या पायाजवळ तिला काहीतरी असल्यासारखे वाटले. तिने पहिले तर काय छोटे कुत्र्याचे पिलू. तिच्या लक्षात आले की, आपण ज्या सोबत खेळतो ते हेच पिलू. तिने त्याच्या अंगावरून हात फिरवला. तितक्यात ते पिलू पुढे चालायला लागले.

पण ह्या दोन्ही मात्र काही चालायला तयार नव्हत्या. ते पिलू पुन्हा चिमाच्या पायाजवळ घुटमळायला लागले. जणू ते चिमाला सांगत होते की, तुम्ही पण माझ्या बरोबर चला. आता पिलू पुढे चालायला लागले तेव्हा चिमा व तिची मैत्रीण त्याच्या मागून जाऊ लागल्या. पिलू आता हळूहळू घराच्या रस्त्याला आले. मग दोन्ही मैत्रिणींना फार बरे वाटले. दोघी पण घराकडे पटापट चालू लागल्या. छोटेशा पिलाला त्याची आई दिसताच ते पटकन आईजवळ गेले. त्याचप्रमाणे रीमा व तिची मैत्रीण त्यांच्या आईजवळ गेल्या. रीमाने तर आईल घट्ट मिठीच मारली.

रीमाच्या लक्षात आले की, त्या छोट्या पिलाने आपल्याला घराचा रस्ता दाखवला. खरंच हे मुके प्राणी आपल्यावर मनापासून प्रेम करतात. आपण त्यांना प्रेम द्यायला हवे. त्यांना जपायला हवे. हे रीमाच्या चांगलेच लक्षात आले. ती आता त्या पिल्लाला अगदी जपायला लागली व आनंदाने त्या बरोबर खेळायला लागली.



# छंद माझा वेगळा

- भारती सावंत

**माहेरवासही सुटला होता. कधी माहेरी जायची इच्छा व्यक्त केली तर गाडी ड्रायव्हर तयारच असायचा. सकाळी माहेरी सोडले की, संध्याकाळी परत नेण्यासाठी गाडी, ड्रायव्हर हजरच!**

आज डोळ्यांपुढून भूतकाळातील आयुष्याचा पट सरकत गेला आणि माझे डोळे पाण्याने भरले. समोर सासूबाई विळीवर कांदा कापत होत्या. मी कोणत्यातरी विचारात गुरफटले आहे हे लक्षात येताच त्यांनी मला टोकले, 'काय गं ! कशात एवढी हरवली आहेस? तुझ्या डोळ्यांत पाणी? काय झाले? अमित तुला काही बोलला का?' मी चटकन ओढणीने डोळे पुसले आणि केविलवाणे हसत उत्तर दिले, 'काही नाही हो आई! तुम्ही कांदा कापताय म्हणून डोळे पाणावलेत. मी दूध ठेवलेय गॅसवर म्हणून उभी आहे ते उकळेपर्यंत' तरीही चाणाक्ष सासूबाईंच्या नजरेने माझ्या मनातली खळबळ हेरली होती पण आणखी प्रश्न विचारून त्यांना मला नाराज करायचे नव्हते म्हणून त्या गप्प राहून कांदे कापू लागल्या. माझे मन मात्र स्थिर होत नव्हते. माझ्या बालपणीची मी माझ्या डोळ्यांपुढून हलत नव्हती. जणूकाही झुळझुळणारा झराचं! सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपी जाईपर्यंत माझे घर आणि अंगणभर नाचणे! भूक लागली की आई, आजीकडून खाऊचा मस्त जिन्नस बनवून घेणे यातच माझे बालपण कधी सरले ते कळले नाही. बाबा आणि दोन काका यांच्यात मी एकमेव कन्यारत्न! त्यामुळे घरात माझा थाट एखाद्या राजकुमारीसारखा असायचा. सगळे मला 'प्रिन्सेस' म्हणूनच बोलवायचे. माझी चुलत भावंडे मला फुलासारखी जपायची. कारण दरवर्षी रक्षाबंधन आणि भाऊबिजेला माझ्याकडून ओवाळून घेताना त्यांना कोण आनंद व्हायचा! चौघेही हातातील राखी

सगळ्यांना दाखवत सुटायचे. ओवाळणी तरी मी सांगणार तीच घेऊन यायचे. त्यामुळे घरात मला खेळणी, कपडे, घड्याळे, चपला, पर्स अशा वस्तुंची रेलचेल असायची. घरातली लक्ष्मी म्हणून माझा शब्द प्रमाण मानला जायचा. आमच्या घराण्याचा पिढीजात व्यवसाय असल्याने दिवाळीला घरातील, कारखान्यातील पूजा माझ्या हस्ते केली जायची.

माझ्या लग्नातही मुक्तहस्ते खर्च करून सगळे भाऊ मला सासरी सोडायला आले होते. लग्नाच्या वेळी कोणाला काही कमी पडू नये याची खबरदारी घेतली गेली होती. प्रत्येकाच्या उत्साहाला उधाण आले होते जणू! माझी पाठवणी होताना सगळा परिवार धाय मोकलून रडत होता. तरीही सासरचे गाव माहेराहून जास्त दूर नव्हते. माझ्या सासरच्या सर्वांना हात जोडून विनंती करताना सगळेजण एका ओळीत उभे राहिले होते. सद्गदित स्वरात शेवटी बाबा म्हणालेच, 'आम्ही आमची मुलगी नव्हे तर काळीज काढून तुमच्या हातात सोपवले आहे. ती आनंदात, हसतखेळत रहावी हीच फक्त आमची इच्छा आहे. तिला काही कमी पडू नये याची आम्ही काळजी घेऊच, पण तिच्या डोळ्यात अश्रू येता कामा नयेत' माझ्या सासरच्या सर्वांनी कबूल करताना म्हटलेच होते, 'तुमची मुलगी ती आता आमची मुलगी झाली आहे. आमच्या घरात कशाचीच कमी नाही. तुम्ही निश्चिंत असावे' त्यावेळी आम्हां कोणालाच हे माहीत नव्हते की, आपली स्वच्छंदी प्रिन्सेस आता सोन्याच्या पिंजऱ्यात रहायला जाणार आहे. सासर घरही माहेरच्या तोलामोलाचे होते. घरात कशालाच काही कमी नव्हते; पण माहेरी मिळणारे स्वातंत्र्य इथे मिळत नव्हते. घरात सगळ्या कामाला नोकरचाकर होते पण घरच्या मंडळींना नोकरांच्या हातचे जेवण चालत नसे. सासूसासरे, दोन दीर, यजमान यांच्यासाठी घरच्या बायकांनीच रांधणे अपरिहार्य होते. त्यामुळे माहेरी मिळणारे स्वैर जीवन इथे बंद कुपीत अडकून गेले होते. सासरे आमदार असल्याने येणाऱ्या जाणाऱ्यांची सतत वर्दळ असायची. घरात नोकर होते तरीही घरातील गृहिणीला



कामातून सुटका नसायची. दिवसभर घरात बाहेरच्या माणसांचा राबता असायचा. दिरांची अजून लग्ने झाली नव्हती. सासूबाई आणि मी सतत स्वयंपाकघरात असायचो. बाहेरून कधी आणि काय ऑर्डर येईल आणि आपणाला ते बनवावे लागेल याचा नेम नसायचा. लग्नात सासरकडच्यांनी मला सोन्यामोत्याचे भरपूर दागिने घातले होते. साड्यांची कपाटे खचाखच भरली होती, पण सतत डोक्यावर पदर घेऊन घरात वावरावे लागायचे. खानदानीपणाच्या ओझ्याखाली माझ्या इच्छा आकांक्षा दबून गेल्या होत्या. मनात येईल तसे स्वैर फिरणे, मैत्रिणींसोबत नदीकिनारी भटकणे, चित्रपट पहायला जाणे, मॉलमध्ये जावून शॉपिंगच्या नावाखाली सगळा मॉल पालथा घालणे, तिथल्याच रेस्तराँमध्ये पिझ्झा, बर्गर खाणे या सगळ्याला मी मुकले होते. कॉलेजच्या कँटीनमधले वडापाव, समोसा, कचोरी, सँडवीच खाऊन जमाना लोटला होता. इतकेच नाही तर, माहेरवासही सुटला होता. कधी माहेरी जायची इच्छा व्यक्त केली तर गाडी ड्रायव्हर तयारच असायचा. सकाळी माहेरी सोडले की, संध्याकाळी परत नेण्यासाठी गाडी, ड्रायव्हर हजरच! कित्येक वेळा घरातील सर्वांच्या गाठीभेटी पण होत नसत, पण सासरची शिस्त पाळणे अनिवार्य होते. माझे आईबाबा देखील सासरच्या नियमानुसार वागत असत. त्यामुळे माहेरी गेले तरी त्यांच्या वागण्यात देखील पहिल्यासारखा मोकळेपणा राहिला नव्हता. आपली मुलगी सासरघरी लक्ष्मीसारखी त्यांच्या अंदाजाप्रमाणे सुखात नांदत आहे यातच ते खूश होत होते. माहेरचे कोणी मला भेटायला सासरी आले तर मी चहा नाश्ता घेऊन यायचे. त्यांचे खाऊन होईपर्यंत त्यांच्याशी बोलायचे आणि त्यांना निरोप द्यायचा. सासरगावाशेजारीच माहेरगाव असल्याने कोणी मुक्कामी येण्याचा प्रश्नच येत नव्हता. माझ्या हृदयातील व्यथा मी कोणाकडे बोलूही शकत नव्हते. कारण माझ्या अंगावरील हजारोंच्या साड्या, अलंकृत सजलेली मूर्ती पाहून कोणाला मी व्यथित वाटणार? पण कठपुतळी बाहुलीप्रमाणे रहाताना होणारी माझी घूसमट कोणाला कळणार!




मला बालपणापासून वाचनाचा भारी नाद! माहेरी घरात सगळ्या प्रसिद्ध लेखक कवींची पुस्तके कपाट भरून होती. घरात मला काहीच काम नसल्याने त्या

सर्व पुस्तकांचे अनेकदा वाचन झाले होते. सासरघरीदेखील सासरेबुवा, यजमान आणि दिरांनी हौसेने आणलेली बरीच पुस्तके



कपाटात होती पण दिवसभरात तिकडे पहायला देखील वेळ मिळायचा नाही. वाचन तर दूरच! पण गावी पाहूणेरावणे, 'रांधा वाढा उष्टी काढा' या कामाच्या राम रगाड्यात मी माझे अस्तित्वच विसरले होते. त्यात पुस्तक वाचणे दुर्मीळच! वाचनाचा हा आनंद लुटण्यासाठी माझ्या मनाची सतत घालमेल होत होती आणि मी नेहमी पुस्तकांच्या कपाटाकडे आकर्षिले जात होते. एके दिवशी सासरेबुवांनी मला पुस्तकांच्या कपाटाकडे आशाळभूतपणे पाहताना पाहिले आणि त्यांना माझ्या मनाची व्यथा कळाली. त्यांनी कपाटाच्या चाव्या माझ्या हातात दिल्या आणि म्हणाले, 'सूनबाई तुम्हाला वाचनाची आवड आहे असे दिसते. आता दिवसातले दुपारचे दोन तास तुम्ही फक्त या पुस्तकांच्या सहवासात रहायचे. आमची सर्व कामे आम्ही कोणाकडूनतरी करून घेऊ पण तुम्ही तुमचे मन मारून तुमचा वाचनाचा छंद दूर करू नका. ही सर्व पुस्तके वाचून झाली की, आपण दुकानातून नवीन पुस्तके घेऊन येऊ.'

सासरेबुवांच्या या शब्दांनी माझे हृदय सुपाएवढे मोठे झाले आणि मी माझ्या पूर्वीच्या वाचन छंदाला पुन्हा आपलेसे केले. माझे सासरे म्हणजे मला प्रत्यक्ष देवाहुनी मोठे असे भासले. आज देखील मी माझा छंद जोपासण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. आता व्हाट्सअपमुळे निरनिराळे वाचनाचे ग्रुप तयार झाले आहेत आणि ॲडमिन आपापल्या परीने कितीतरी कादंबऱ्या, कथा, ललित लेखन व्हाट्सअपवर पाठवत असतात. मेहनत घेत असतात आणि सर्वांना वाचनाचा लाभ मिळवून देत असतात. पुस्तकालय ग्रुप तयार झाल्यापासून मी त्यांच्यासोबत आहे आणि त्यांनी पाठवलेल्या सर्व साहित्याचा मी आनंदाने आस्वाद घेत असते. सर्व ॲडमिन निरनिराळ्या प्रकारचे साहित्य समूहावर पाठवून वाचकांना आपापल्या आवडीप्रमाणे वाचनाचा लाभ घेऊ देतात. धन्यवाद. पुस्तकालय समूह आणि समग्र ॲडमिन टीम.



# हरवत चाललेला कौटुंबिक संवाद

-कविता झुंजारराव

**आईवडिलांकडे आपल्या अपत्याशी बोलायला वेळ नसणे ही तर सर्वांत दुःखद बाब आहे असे म्हणावे लागेल. त्यांच्यावर नुसता अपेक्षांचा डोंगर लादायचा. पूर्ण बिझी करून टाकायचे.**

खरचं आहे ते..आज संवाद हरवत चाललायं. आईवडिलांबरोबरचा संवाद, भावंडांमधला संवाद, आजी-आजोबांशी असलेला संवाद...कमी कमी होत चाललायं. पण गप्पा म्हणजेही संवाद नाही म्हणता येणार. कारण एके ठिकाणी व. पु. म्हणतात 'गप्पा म्हणजे संवाद नव्हे. संवादाचं नातं असतं ते विचारांशी.'

पूर्वीच्याकाळी गावामध्ये एकत्र कुटुंबपद्धती असायची. सर्वजण एकत्र गुण्यागोविंदाने रहायचे. कुरबुरी होत असतीलही. पण घरातले कधी ओट्यावर आले नाही. भांडणे आतल्याआत निवायची. आजी आजोबा, आई बाबा, काका काकू, आत्या सगळे एकत्र रहायचे. एकमेकांत प्रेम ओलावा व जिव्हाळा असायचा वागण्यात, बोलण्यात. खेळायला घरातचं छोटी मोठी भावंडे असायची. एकमेकांशी व्यक्त होणे असायचे. संवाद असायचा परस्परांमध्ये. नाती रिचार्ज व्हायची आपोआप. वेगळे काही करण्याची गरजच नसायची. किती छान होते ना तेंव्हा सगळे.

हळूहळू शहरीकरणाचा झपाटा वाढला आणि गावाकडची घरे सोडून शहरात वस्ती वाढायला लागली. तरीही चाळसंस्कृतीमुळे संवाद, आपुलकी टिकून होती. एकमेकांच्या घरात कधीही डोकावता येत होते. सगळ्या सणवाराला घरात बनवलेले शेजारच्या घरी वाटीभर तरी जात होते. एकमेकांची मदत सामारंभात, दुखल्याखुपल्याला असायची. काही अडचणीला सगळी चाळ एक असायची. पण

हळूहळू ब्लॉक व टॉवर सिस्टीम आली. माणसांतला दुरावा वाढू लागला. हम दो हमारा एकच्या राज्यात मुलं एकलकोंडी झाली. चिडचिड वाढली. आजी-आजोबांशी जमलेली गट्टी तुटली. त्यांच्यांशी जमत चाललेला संवाद संपला. त्यांच्याकडून करून घ्यायचे लाड, हट्ट, आवडता खाऊ सारे सारे संपले. त्या चिमुकल्या जगात एकदम बदल झाला. आजी




आजोंबाबरोबरचा प्रेमळ सहवास संपून डे केअर सेंटरमध्ये रहाणे आले आणि ते इवलुसे लेकरू केविलवाणे, एकलकोंडे झाले. आई बाबा सतत कामात गर्क. त्यांच्याकडे लेकरासाठी वेळच नसायचा. कमावण्यासाठी लागणारा पैसा आणि आईवडिलांकडे नसणारा वेळ यात त्या लेकराची ओढाताण झाली आणि संवादच हरवला गेला हळूहळू.

सगळ्यांत मोठी शोकांतिका झाली ती मोबाईलने. नात्यातला, परस्परांमधला उरलासुरला संवादच संपवून टाकला या मोबाईलने. स्क्रिन, मोबाईलवरचे खेळ आणि चॅटिंगचे वेड लागले साऱ्यांनाच. आता वाढदिवस असो वा सणवार. छापील व फॉरवर्डेड शुभेच्छा पोस्ट करण्यात अहमहमिका लागते सगळ्यांमध्ये. मोबाईलमध्ये सरते शेवटी हा ढीगभर शुभेच्छांचा कचरा जमतो पण समाधान मिळते का हो त्याने? तर याचे उत्तर 'नाही' असेच येईल सर्वांकडून. पण तोच जर शुभेच्छा देण्यासाठी दोन तीन मिनिटांचा फोन आपण केला तर तो लक्षात रहातो. समाधान वाटते. परस्परांशी संवाद साधला जातो. ख्यालीखुशाली कळते. मनातली व्यथा सहज बाहेर पडते.

आईवडिलांकडे आपल्या अपत्याशी बोलायला वेळ नसणे ही तर सर्वांत दुःखद बाब आहे असे म्हणावे लागेल. त्यांच्यावर नुसता अपेक्षांचा डोंगर लादायचा. पूर्ण बिझी करून टाकायचे. हा क्लास, तो क्लास, अभ्यास यांतच डांबून टाकायचे. हौसमौज, गप्पा, त्याला काही हवेनको काही नाही. पेपर्स कठीण गेले, मनासारखा अभ्यास झाला नाही, मार्कस मिळाले नाही की हीच मुले घाबरून गळफास घ्यायला मागेपुढे पहात नाहीत! कारण ज्यांच्याशी बोलून संवाद साधायचा तेच बिझी त्यांच्या व्यस्त श्येड्यूलमध्ये आणि

उरलेल्या वेळी मोबाईलमध्ये. संवाद साधायची गरजच वाटत नाही त्यांना. नंतर त्यांना त्यांची चूक उमजते पण तोपर्यंत फार उशीर झालेला असतो. हातातून सर्वस्व निसटलेले असते.

संवाद साधताना दोन्ही व्यक्तींचा त्यात सहभाग असावा. नाहीतर नाते टिकवणे हे काम फक्त एकाच व्यक्तीकडून होईल. त्या संवादात ओलावा, प्रेम नसेल तर त्या इकडच्या तिकडच्या गप्पा होऊन फक्त वेळ घालवण्याचे, काढण्याचे साधन होऊ नये याकडेही जरूर लक्ष द्यावे. प्रत्येकवेळी मीच का पुढाकार घ्यावा असा भाव कधीही मनात येऊ देऊ नये. नाते जोडायला वेळ लागतो, पण मोडायला वेळ लागत नाही.

हल्लीचा समाज ढोंगी व दिखाव्यावर भर देणारा आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. आनंदी असण्यापेक्षा आनंदी दिसण्यावर, दिखाव्यावर भर दिला जातो. त्यात तंत्रज्ञानाच्या या जगात वाचनसंस्कृतीही कमी होत चालली आहे. नवनवीन साहित्य वाचणे, त्यावर विचार करणे, त्या अनुषंगाने संवाद साधणे यावर फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. वाचनाचा उपयोग योग्य व्यक्तिमत्त्व घडविण्याबरोबरच आपली विचारसरणी बदलावरही होत असतो.

आजच्या आभासी जगात मोबाईलवर चॅटींग करणे अनेकांना जमते पण प्रत्यक्ष संवाद साधणे त्यांना जमत नाही हे सत्य आहे. आभासी जगात अनेक मित्र असतीलही पण प्रत्यक्षात मात्र ते एकटे पडलेले असतात ही आजची वस्तुस्थिती आहे. त्यासाठी आपल्यात संवाद हवा. तो जसा घरात हवा आहे, तसाच बाहेरच्या जगातही. संवाद नसेल तर माणूस एकटा पडतो. यंत्रयुगात हरवून जातो. मोबाईललाच त्याचा मित्र, त्याचा सखा समजतो आणि इथेच चुकतो.

म्हणूनच शब्द, स्पर्श, देहबोलीतून प्रत्यक्ष भेटून किंवा फोनवरती संवाद साधण्याचा प्रयत्न करू या. एकमेकांसोबत जगण्याचा निर्मळ आनंद घेऊ या. त्यासाठी सर्वात पहिली पायरी आहे ती घरात आईवडिलांनी त्यांच्या अपत्यासोबत दररोज थोडावेळ तरी संवाद साधणे गरजेचे आहे. जेवणाच्यावेळी सर्वांनी एकत्र जेवायला बसून एकमेकांच्या विचारांची, दिवसांत घडलेल्या गोष्टींबद्दल सांगितले,त्याबाबत संवाद साधला तर कितीतरी गोष्टींचा आपोआप निचरा तर होईलचं; पण परस्परांमध्ये प्रेमाची, विश्वासाची मोट बांधली जाईल ते वेगळेचं..

## चारोळी

बावरी राधा जशी ती
शृंगारली शब्दात होती
वृंदावनातील त्या सावळ्याची
तशीच प्रतिक्षेतील राधा होती

**- निशा खरात**

## कुकिंग टीप्स

१. शेवेसाठी डाळ दळायला देताना त्यामध्ये मूठभर पांढरी चवळी घालावी. यामुळे शेव छान हलकी होते.

२. बटाट्याचे वेफर्स करताना काप पातळ चिरावेत आणि थोडा वेळ पाण्यात ठेवून नंतर कोरड्या फडक्याने पुसून घ्यावेत. यामुळे वेफर्स कुरकुरीत होतील.

३. लोणी नेहमी मिठाच्या पाण्यात ठेवावे. यामुळे ते बरेच दिवस टिकते; त्याचप्रमाणे घाण वास येत नाही.


४. केकच्या बॅटरमध्ये थोडे ग्लिसरीन घातल्यास केक मऊ होतो.

५. केळी जास्त पिकली तर काळी पडून वाया जातात.हे टाळण्यासाठी केळी कुस्करून त्यात पुरेशी साखर घालावी आणि हे मिश्रण प्लास्टिकवर थापून केळे पोळी बनवावी. वाळल्यावर ही पोळी छान लागते.

## *कोरफडीचे तेल लावण्याचे फायदे*

**हे तेल कोरडे केस असलेल्या महिलांसाठी खूप फायदेशीर आहे. यामध्ये आढळणारे प्रोटेक्यू एन्झाइम टाळू आणि केसांना मॉइश्चरायझिंग करण्यास मदत करते.**

**कोरफडीमध्ये अमिनो ॲसिड असतात, जे तुमच्या कुरळ्या केसांना चमक आणू शकतात. त्यामुळे त्याचा रोज वापर करावा. कारण त्यात खोबरेल तेल असते, त्यामुळे केस वाढू लागतात आणि केस गळण्याची समस्याही कमी होते.कोरफडीमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि प्रथिने असतात. ज्यामुळे आपले केस मऊ होतात.**



# 'जरा- जिवंतिका'

-सरोज सुरेश गाजरे

**प्रतिमेत सगळ्यात शेवटी येतात बुध व बृहस्पती. बुध हत्तीवर बसलेला आणि हातात अंकुश असलेला पाहायला मिळतो. तर गुरु वाघावर बसलेला आणि हातात चाबूक घेतलेला पाहायला मिळतो. बुध हा ग्रहांचा राजकुमार आहे.**

'जरा जिवंतिका' ही देवी पार्वतीचे रूप मानली जाते, जी मुलांचे रक्षण करते.जरा आणि जिवंतिका याचा एक अर्थ 'जरा' म्हणजे म्हातारपण आणि 'जिवंतिका' म्हणजे जिवंत ठेवणारी, अर्थात म्हातारपणापर्यंत जिवंत ठेवणाऱ्या देवता म्हणून 'जरा–जिवंतिका' याचं पूजन केलं जातं.

जिवतिची प्रतिमा चार देव एकत्र असणारी प्रतिमा आहे. यात सर्वांत आधी नरसिंह, मग कृष्ण, त्यानंतर मुलांना खेळवण्याऱ्या जराजिवंतिका आणि सर्वांत शेवटी बुध आणि गुरु यांचा समावेश आहे. आता या क्रमाचं महत्त्व काय आहे हेही सांगणं आवश्यक आहे.

भगवान विष्णूंचा चवथा अवतार असलेले नरसिंह, आपल्या बाल भक्तासाठी प्रगट झाले. ही कथा आपल्या सर्वांनाच ठावूक आहे. हिरण्यकश्यपूच्या रूपात असणाऱ्या दैत्यांपासून बालकांचं रक्षण करणे, हा नरसिंहाचा उद्देश असल्याने प्रथम नरसिंहाची पूजा केली जाते. नरसिंह घरात ओढवणाऱ्या आपत्तीपासून बाळाचा बचाव करतात. उंचावरून पडणे, अन्नातून कधी विषबाधा होणे, आगीपासून होणारी हानी इत्यादी.

त्यानंतर येतात कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण. कृष्ण आणि त्याचे सवंगडी खेळत असताना त्यांचा चेंडू यमुनेच्या डोहात गेला आणि कृष्णाने तो परत आणला. खेळणाऱ्या– बागडणाऱ्या मुलांवर आलेला वाईट प्रसंग कृष्णाने दूर केला. तसेच, कालियाला न मारता त्यालाही अभय देऊन दूर जाण्याचा आदेश दिला.

नंतर येतात त्या जरा व जिवंतिका. यांची एक कहाणीही प्रसिद्ध आहे. मगध नरेश राजा बृहदरथ याला दोन राण्या होत्या. दोन्हीही राण्यांवर त्याचे सारखेच प्रेम असते. परंतु राजाला मूलबाळ नसल्यामुळे राजा चिंतीत असतो. याच सुमारास नगरजवळील उपवनात ऋषी चंडकौशिक आल्याचे राजाला समजते. राजा त्यांचे दर्शन घेऊन आपली चिंता प्रगट करतो. ऋषी राजाला प्रसादात आंबा देतात व राणीला खायला द्या म्हणून सांगतात. दोन्ही राण्यांवर समान प्रेम असल्यामुळे राजा आंब्याचे समान भाग करून राण्यांना देतो. कालांतराने दोन्ही राण्यांना पुत्र होतो परंतु केवळ अर्धा– अर्धा. अशा विचित्र आणि अर्धवट अभ्रकांना राजा जंगलात नेऊन टाकतो. त्याच वेळेस तेथून जरा नामक यक्षिणी जात असते. ती दोन्ही अभ्रक तुकड्यांना हातात घेते आणि आपल्या अवयव सांधण्याच्या कलेने दोन्हीही शकलं सांधते. जरा ते सांधलेले अभ्रक संध्यासमयास बृहदरथ राजाला आणून देते. जरा यक्षिणीने सांधले म्हणून राजा त्याचे नाव जरासंघ ठेवतो आणि जरा यक्षिणीच्या उपकाराप्रीत्यर्थ नगरात देऊळ बांधून तिला मगधाच्या इष्टदेवतेचा मान देतो. त्याच प्रमाणे जरादेवतेचा वार्षिक महोत्सव सुरू करतो, अशी ही जरा देवी. जरेंचीच सखी जिवंतिका. जिवंतिका या शब्दाचा अपभ्रंश जिवती. जिवंतिकेचा अर्थ होतो 'दीर्घायू प्रदान करणारी'. बालकाच्या दीर्घायुष्याची कामना करून या देवीची पूजा करतात. ही देवी पाळण्यात व आजूबाजूंनी बालकांना खेळवतो




अशा रूपात दाखवतात.

जिवतीला दिव्याच्या रूपात पाहिलं गेलं आहे. साधारणपणे फक्त जिवतीचं पूजन हे आषाढ अमावस्येच्या दिवशी केलं जातं. दिवा हा ज्ञानाचा, अंधकार मिटवून प्रकाश पसरवण्याचा प्रतिक म्हणून पाहिला गेला आहे. यालाच 'वंशवृद्धीचं' प्रतिकही मानलं

गेलं आहे. त्यामुळेच जिवतीचं पूजन केल्याने मुलांना दीर्घायुष्य प्राप्त होतं असं म्हटलं गेलं आहे. जरा आणि जिवंतिका याचा एक अर्थ 'जरा म्हणजे म्हातारपण आणि जिवंतिका म्हणजे जिवंत ठेवणारी', अर्थात म्हातारपणापर्यंत जिवंत ठेवणाऱ्या देवता म्हणून जरा-जिवंतिका पूजन केलं जातं.

प्रतिमेत सगळ्यात शेवटी येतात बुध व बृहस्पती. बुध हत्तीवर बसलेला आणि हातात अंकुश असलेला पाहायला मिळतो. तर गुरु वाघावर बसलेला आणि हातात चाबूक घेतलेला पाहायला मिळतो. बुध हा ग्रहांचा राजकुमार आहे. बुध बालकाला अलौकिक बुद्धिमत्ता, आकर्षक व्यक्तिमत्त्व हे गुण प्रदान करतात तर गुरु बालकाला शैक्षणिक प्रगती, आध्यात्मिक उन्नती, विवेकबुद्धी हे गुण प्रदान करतात. अशात बालकापासून मोठी व्यक्ती बनताना मनात उन्मत्तता आली तर ती अंकुश घालून बुधाने दूर करावी आणि अहंकार जागृत झाला तर तो गुरुंनी आपल्या चाबकाच्या फटक्यानं दूर करावा अशी इच्छा त्या बालकांच्या माता व्यक्त करतात. आपलं मूल हे सर्वगुण संपन्न होत असताना त्याला गर्वाची बाधा होऊ नये यासाठी बुध आणि गुरुंना पूजलं जातं.

या चार देवतांना अशा क्रमाने पूजलं जातं. म्हणजे प्रथम बालकांचं रक्षण करणारी देवता, दुसरी जन्मलेल्या बालकांचं रक्षण आणि त्यांना दीर्घायुष्य देणारी देवता, बालकांच्या रूपात भर घालणाऱ्या जराजिवंतिका आणि त्यानंतर बालकांना प्रौढ़ावस्थेत जाताना अहंकार किंवा उन्मत्ता येऊ नये म्हणून पुजले जाणारे बुध आणि गुरु.!

## पायांचा कोरडेपणा घालवण्यासाठी काही टीप्स

काही लोकांची त्वचा खूप कोमल आणि मुलायम असते. मात्र याउलट काही लोकांची त्वचा खूप प्रयत्न केल्यावरही कोरडीच असते आणि हिवाळ्यात समस्या वाढतात. पायाच्या कोरड्या त्वचेवरील उपचाराबाबत काही टीप्स...

तुमची त्वचा खूप जास्त कोरडी असेल आणि पायाच्या कोरड्या त्वचेमुळे तुम्हांला त्रास होत असेल तर त्याची काळजी घेणे आवश्यक आहे. कोरड्या त्वचेसाठी केवळ क्रीम इ. पुरेसे नाही तर साफ सफाईकडेही लक्ष देण्याची गरज असते. पायाची कोरडी त्वचा मुलायम करण्याआधी हे लक्षात घ्या की, तुम्ही कधीही उघड्या पायांनी राहू नका, पायात नेहमी बूट- चप्पल इ. घाला.



# किचन टीप्स

### १.जेवणात जास्त मीठ पडतं

जर जेवणात कमी मीठ पडलं तर वरून घालता येतं पण जर जेवणात मीठ जास्त झालं तर प्रश्नच निर्माण होतो. जर रस्सा भाजी असेल तर त्यात थोडा उकडलेला बटाटा घालावा किंवा कणकेचा छोटा गोळा घालावा. यामुळे जास्त झालेलं मीठ शोषलं जाईल आणि भाजीमध्ये काही बदल होणार नाही. पण हे करताना एक गोष्ट लक्षात घ्या की, थोड्यावेळाने कणकेचा गोळा किंवा बटाटा आठवणीने काढा. जर सुकी भाजी असेल आणि मीठ जास्त पडलं तर त्यात तुम्ही थोडंसं भाजलेलं बेसन किंवा दाण्याचं कूट घालू शकता.



### २.पास्ता किंवा न्यूडल्स शिजवताना चिकट झाल्यास


जर शेवया, पास्ता किंवा न्यूडल्स शिजवताना चिकट झाल्यास त्यात काही थेंब तेल घालावं. गरम पाण्यातून काढल्यावर लगेच थंड पाण्याने धूवून घ्या. मग बघा अगदी बाहेरसारखे न्यूडल्स घरी बनतील.

### ३.विरजणाशिवाय दही कसं लावावं

जर घरात विरजण नसेल आणि दही लावायचं असल्यास सर्वात आधी दूध गरम करून घ्या. त्यात लिंबाचा रस घालून पातेलं १० ते १२ तास झाकून ठेवा. मस्त सायीचं दही लागेल.

### ४.लसणाचा योग्य उपयोग

जर जेवणांमध्ये लसूण घालूनही त्याचा वास लागत नाही. अशावेळी लसूण कापून घालण्याऐवजी कूटून किंवा किसून घालावा. असे केल्यास लसणाचा वास चांगला लागतो.



# नेल पॉलिशची गंमत

-ओमनी फिचर्स

**नखांवर वेगवेगळ्या प्रकारची कलाकुसर करण्याची फॅशन सध्या बूममध्ये आहे.त्यासाठी बाजारात भरपूर साधनं उपलब्ध आहेत.वेगवेगळ्या प्रकारच्या टिकल्या ,चमकी,डिझाइन बाजारात मुबलक मिळत आहेत**

कोणती चावी कसली हे पटकन ओळखायचं असेल, नखांना कुल लूक देऊन काही हटके करायचं असेल तर संपत आलेली नेलपॉलिश वापरून बघा.

कधी कधी काही गोष्टी सहज गंमत म्हणून करायच्या असतात. त्याला काही अर्थ असतोच किंवा असायलाच हवा असा आग्रह नाही.पण त्या करताना कल्पनाशक्तीचा जो वापर होतो आणि जे साध्य होते त्यामुळे मिळणारा आनंद हा खूप मोठा असतो. काहीतरी हटके केल्याचं समाधान यातूनच मिळतं. गंमत आणि समाधान देणारा हा प्रयोग घरातल्या चाव्यांवर आणि आपल्या नखांवर नेलपॉलिशच्या सहाय्याने करून बघायला काय हरकत आहे!

चाव्यांचं रंगकाम:

टू व्हीलर,फोर व्हीलर म्हणा किंवा कपाट,लॉकर वगैरेच्या टिपीकल काळ्या कव्हरच्या चाव्या सगळ्यांजवळच दिसतात आणि त्याचमुळे अनेकदा अशा चाव्या इतरांच्या चाव्यांबरोबर एकत्र होतात आणि ऐनवेळेला सापडत नाहीत. वेगवेगळ्या की - चेन वापरल्या तरीही सतत हरवतात, तुटतात हे सगळं टाळायचं असेल आणि आपली चावी इतरांच्या चाव्यांपेक्षा वेगळी व उठून दिसावी म्हणून एक सोपा उपाय आहे.घरातील जुनी संपत आलेली नेलपॉलिश घ्यायची आणि ती चाव्यांना लावून ठेवायची.नेलपॉलिशनं रंगवलेली प्रत्येक चावी वेगळी तर दिसतेच शिवाय कपाटाच्या ड्रॉवर्सच्या, गाड्याच्या आणि सायकल इ. वेगवेगळ्या लॉक्सच्या

चाव्या गहाळ जरी झाल्या तरी नेमक्या रंगामुळे चटकन सापडतात.


नखांवरची कलाकुसर :




नखांवर वेगवेगळ्या प्रकारची कलाकुसर करण्याची फॅशन सध्या बूममध्ये आहे.त्यासाठी बाजारात भरपूर साधनं उपलब्ध आहेत.वेगवेगळ्या प्रकारच्या टिकल्या ,चमकी,डिझाइन बाजारात मुबलक मिळत आहेत.मात्र बाजारातल्या वस्तू न वापरता घरच्या घरी नखांवर मस्त कलाकुसर करू शकतो.नखांवर हवं ते टेक्चर रंगवू शकतो.नखांवर टेक्चर पेंटिग केल्याने नखांना कुल लूक देता येऊ शकतो याची पद्धतही एकदम सोपी असते.

टेक्चर पेंटिग करताना सुसंगत अशा रंगाची दोन वेगवेगळ्या शेड्सची नेलपॉलिश घ्यावी.प्लॅस्टिक पेपरचे दोन नखांच्या आकाराचे लहान लहान तुकडे घ्यावेत. एका तुकड्यावर एक अशाप्रमाणे दोन्ही नेलपॉलिश प्लॅस्टिकच्या कागदावर लावाव्या. नंतर दोन्ही तुकडे अर्धावर ठेवावेत. टूथपिकच्या सहाय्यानं दोन्ही तुकड्यांच्या समान भागावरील नेलपॉलिश शेंडिग केल्याप्रमाणे एकत्र कराव्या आणि स्पंजच्या तुकड्यावरील डिझाईन उमटवा. नंतर फिक्या रंगाचे नेलपॉलिश नखांवर लावावं आणि ते पूर्ण वाळल्यावर त्यावर स्पंजच्या तुकड्यावरील डिझाइन उमटवावं. अशा रीतीनं सगळ्या नखांवर डिझाइन उमटवल्यावर नखाबाहेरील बाजूस लागलेलं जास्तीचं नेलपॉलिश रिमूव्हरच्या सहाय्यानं पुसून टाकावं. सहज गंमत म्हणून केलेलं नखांवरचं हे कोरीव काम एकदम भारी दिसतं!





# स्त्री

- भारती सावंत

**आता तर महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्यालयात काम करत आहेत. ऑफिसमधून घरी आल्यानंतर घरातील स्वयंपाक, मुलांचा अभ्यासही सर्व त्याच सांभाळत आहेत. पुरुष मात्र कार्यालयातून आला की टीव्हीसमोर बसेल किंवा पलंगावर आडवा होईल.**

डंका सर्वत्र पिटला जातोय. गृहलक्ष्मी नवअवतारी देवी आहे. अष्टभुजांनी घरातील आणि ऑफिस– मधील सर्व कामे करत असते. ती आजी, आई, मावशी, आत्या, काकू, बहीण, पत्नीच्या रूपात असते. मुलगी नि सून अशी तिची आधुनिक रूपे.ती आई, आजीप्रमाणे प्रेमळ, आत्या मावशीप्रमाणे व्यवहारी, काकी मामीप्रमाणे रीतीरिवाज पाळणारी. पत्नी बहिणीप्रमाणे प्रेमाने भारावून जाणारी, थोड्याशा गोड बोलण्याने मेणासारखी विरघळणारी जशी बाहूलीच.

पण सख्यांनो तुम्ही स्वत:चा एवढा उदोउदो करता,स्वत:च्या कार्यकर्तृत्वाचा गोडवा गाता असा गोडवा पुरुषांनी कधी गायलाय का? ही स्त्री नवदुर्गा आहे, सहस्त्र करांनी कामे करते,घराबाहेरच्याही जबाबदाऱ्या सांभाळते. तर नाही असेच उत्तर असेल. आपणच स्त्रियां आपल्याविषयी लिहित असतो,बोलत असतो.पुरुषवर्ग असा कधीच शब्द बोलत नाहीत की, बाई तू सर्वगुणसंपन्न आहेस. ते त्यांचे श्रेष्ठत्व सादर करतात, 'मी आहे म्हणून तू सुरक्षित आहेस मी काम करतो तुम्हाला पोसतो.' पण ते हेही विसरतात की बाई घरी असते ती का कमी काम करते? सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत तिचा हात अविरत चालूच असतो. वर्षाचे ३६५ दिवस ती राबत असते. पण पुरुषवर्ग बोलतो का कधी की बाई ३६५ दिवस तू काम करतेस ते ३६४ दिवस करा मी एक दिवस तुझे सारे काम करतो तर 'नाही!' असेच उत्तर मिळेल. स्त्रियांनी जन्माला येतानाच सर्व घरगुती कामांचा, जबाबदाऱ्यांचा ठेका घेतलेला

असतो. तिला त्यातून मोकळीक नसते. आपण हे पाहतो की एकाच घरात मुलगा मुलगी असेल तर मुलीला स्वयंपाक, धुणी–भांडी, दळणकांडण सर्व काम शिकवले जाते. तिच्याकडून करून घेतले जाते. परंतु मुलगा मात्र मैदानावर खेळायला रिकामा! असे का? हल्ली तरी मुली शिक्षणाच्या बाबतीत, अर्थार्जनाच्या बाबतीत सर्वच स्वावलंबी आहेत. त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून घराबाहेर पडल्या आहेत आणि स्वकमाई करत आहेत. मग घरातील सर्व कामांचा वाटा तिनेच का उचलावा? पुरुषांनी का नाही? घरातील ज्येष्ठ व्यक्ती देखील स्त्रीलाच काम सांगत असते. पुरुषांनी टीव्ही बघत, मोबाईलवर खेळत किंवा गप्पा मारत दिवाणखान्यात बसायचे आणि स्त्रियांनी मात्र दळणकांडण, नीट निवडा अशी सर्व कामे स्वयंपाक घरात बसून करायची! स्त्री जातीवर हा जन्मल्यापासूनच अन्याय होत आहे.

या अन्यायाला वाचा कोणी फोडायची? सर्वत्र पुरुषांची मक्तेदारी असताना स्त्रीच्या अन्यायाविरूद्ध कोण आवाज उठवणार ? स्त्रीच स्त्रीची जणू शत्रू आहे. ती आपल्या मुलाला खानदानाचा दिवा समजते. परंतु हा खानदानाचा दिवा तिला शेवटपर्यंत साथ देतो का? स्वत:चे लग्न होईपर्यंत बरोबर तो आईकडून, ताई कडून आपली सर्व कामे करून घेतो. एकदा का लग्न झाले की त्याची आई आणि ताई कडूनची गरज संपते. तो पत्नीकडून सर्व कामे करून घेतो आणि आई, ताईला तांदळातील खड्याप्रमाणे बाहेर फेकून देतो. परंतु मातृहृदय त्या मुलासाठीच तडफडत राहते. ती आपल्या मुलीला मुलगा समजू



शकत नाही. मुलगी म्हणजे परक्या घरचे धन! ती दुसऱ्या घरात जाणार! तिचा आपल्याला काय उपयोग ?अशी मानसिकता जोवर बदलत नाही तोपर्यंत स्त्रीचा पूर्णार्थाने सन्मान होत नाही.

आता तर महिला पुरुषांच्या बरोबरीने

कार्यालयात काम करत आहेत. ऑफिसमधून घरी आल्यानंतर घरातील स्वयंपाक, मुलांचा अभ्यासही सर्व त्याच सांभाळत आहेत. पुरुष मात्र कार्यालयातून आला की टीव्हीसमोर बसेल किंवा पलंगावर आडवा होईल.



बायकांना अष्टभुजा म्हटले आहे. परंतु कोणतेही काम त्या लिलया पार पाडतात म्हणून. त्यांना ही शरीर आहे, मन आहे, थकवा येतो. या गोष्टीचा विचार पुरुष वर्गाकडून कधी होईल का?

म्हणूनच एक सखी या नात्याने मी सांगते जरा स्वत:कडेही लक्ष द्या. आपलं सगळं तरुणपण घर संसार ,'चूल नि मूल' यातच जाते.यातच चाळीशी गाठली की नटणे,थटणे करायला शोभत नाही.'लोकं काय म्हणतील! समाजाला काय वाटेल?' त्याच्यामुळे आपण पण फॅशन करायला धजावत नाही. लहानपणापासून जबाबदारीचे ओझे डोक्यावर साठवत ह्या स्त्रिया अशाच वाढत जातात आणि एके दिवशी असे वाटू लागते की 'आपण काय जीवन जगलो? आपले स्वत:चे जीवन जगायला आपण विसरलोच'. म्हणूनच सख्यांनो चूल नि मूल तरी सांभाळाच. परंतु आपलेही जीवन जगा. स्वत:कडे दुर्लक्ष करू नका. आपल्या हौशी मौजी आपणच पूर्ण करायच्या आहेत. जीवन क्षणभंगुर आणि अनमोल आहे. त्याचा पूर्ण लाभ घेऊ या. म्हणजे पुन्हा पश्चातापाची पाळी येणार नाही. पटलं नां सख्यांनो तुम्हांला?

**विनोद**

**आई आणि सोनू**

आई : बाळा, एक ग्लास पाणी दे रे

सोनू : देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे, आम्ही काही गुलाम नाही आहोत...

आई : नालायका, तू चहा माग, मग सांगते...

# टीप्स

## चेहऱ्यासाठी घरगुती उपाय

बेसन आणि गुलाबपाणी : ४ चमचे बेसनमध्ये थोडे गुलाबपाणी मिसळून पेस्ट बनवा. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून १० ते १५ मिनिटे सुकवू द्या. नंतर पाण्याने चेहरा धुवा. यामुळे त्वचा स्वच्छ होते आणि नैसर्गिक उजळपणा येतो.

कच्चे दूध आणि बेसन : १ चमचा बेसनमध्ये थोडे कच्चे दूध मिसळून रात्री झोपण्यापूर्वी चेह्रयावर लावा. २० मिनिटांनी चेहरा धुवून टाका. यामुळे चेहऱ्यावर त्वरित चमक येते.

एलोवेरा जेल आणि गुलाबपाणी : ताज्या एलोवेराच्या (कोरफड) गरामध्ये दोन चमचे गुलाबपाणी मिसळून रात्री चेह्रयावर लावा. सकाळी थंड पाण्याने धुवा. यामुळे चेहऱ्यावरील टॅनिंग (उन्हामुळे काळेपणा) कमी होतो. मुलतानी माती: तेलकट त्वचेसाठी मुलतानी माती आणि गुलाबपाणी एकत्र करून चेहऱ्यावर लावा. यामुळे चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल आणि दुर्गंधी साफ होते.

## त्वचेची काळजी घेण्यासाठी महत्त्वाच्या सवयी

चेहरा धुणे: सकाळी उठून थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. यामुळे पोअर्स (छिद्र) बंद होतात आणि त्वचा ताजेतवाने राहते.

हायड्रेशन (पाणी पिणे): शरीरात पाण्याची कमतरता भासू देऊ नका. भरपूर पाणी प्या आणि नारळ पाणी किंवा ग्रीन टी चे सेवन करा.

सक्सेन्स्क्रीनचा वापर: घराबाहेर पडताना चेहऱ्यावर, मानेवर आणि हाता–पायांवर चांगले सनस्क्रीन लावा, ज्यामुळे सूर्यकिरणांपासून त्वचेचे संरक्षण होते.

रात्रीची काळजी: झोपण्यापूर्वी चेहऱ्यावरील मेकअप आणि दिवसभर साचलेली धूळ सौम्य क्लिंजरने नक्की काढून टाका.

# काव्यसृष्टी

## कंजूस खटारा

गल्लीतले अण्णाकाका गह्यरेज भारी
त्याह्यच्या कंजूसपनाची गोठज न्यारी
हजार भोकायच बनीयन गल्लीत मिरोयता
लुंगी गुंडायीसन समद्या गावभर फिरता
पाव्हने आले घरी त अर्धाज गलास पानी
चहा अशी जशी धोयेल पान्यावानी
जेयाच त मंग तुमी काढूज नका नाव
चादर पांघरीसन करीन आजाराचा बनाव
लाखोचा पगार याले याचा सुटेना पैसा आना
रस्त्यावरचा बी येचीघीन सांडेल दाना दाना
बायको याले किदरीसन बोंबा मारत फिरते
हा सुटला बैलावानी ती बिचारी मरमर मरते
अरे काय कामाची कंजूसी.....,
रिकामे आले रिकामेज जानार
तुमची लाखोची इस्टेट मंग.....
ऐरे गैरेज खानार...!
तुपातली माशी ओरपिसन खान्यात
काहीज नसतो अर्थ.....!
मनच मोठ नशील त गडेहो
जिंदगी हाय व्यर्थ!!

**- माधुरी चौधरी**

## असा झिम्माड पाऊस

अशा सरीवर सरी
जशा कालिंदी किनारी गोकुळच्या गोड पोरी

चिंब पानापाना आड
थेंबा थेंबात चांदणी
मन भिजलं भिजलं
केवड्याच्या रानावानी



असा कसा कोसळतो
वेडा पाऊस सारखा
दूर बासरीची धून
छेडितो का कृष्ण सखा?

उभी राहते थांबते
खिडकीशी ओठांगून
काळजात शहारली
ओल्या बासरीची धून

घन वनात नांदतो
मनभावन श्रावण
उंबरठा ओलांडून
गेली गेली गवळण

**- वृंदा भांबुरे**

## मनातली नदी

नदीचे दोन किनारे
अथांग पसरलेले
नभाला कवेत घेणारे
धरेवर अमृत ओसंडलेले.

तटा भोवती उभी
सखे सोबती किनारी
खग करती किलबिल
सुरेल झालर हलनारी.

नदीत उठती तरंग
माशांचा मनसोक्त वावर
संसार चालती अनेकांचे
नावांचाही असे वावर.

नदीचा गावा भोवती
आवाज खळखळणारा
घराघरात मन भरणारा
मायेने चिंब भिजवणारा.

नदी गावचे यशोगान
जनमाणसांचे श्रध्दास्थान
वसुंधरे वरचे संजीवन
अंतक्षणीचे आश्रयस्थान.

**- वर्षा प्रदिप ब्रम्हपुरकर**



## सुकलेलं फूल

नाही सुखाची कहाणी
नसे दु:खाची वेदना
सुकलेल्या फुलाच्या त्या
रित्या रित्या संवेदना

स्मरे हलकेसे त्याला
पुसे जन्माची कहाणी
वार्यावर विरलेली
एक सुगंधी विराणी

जन्म मृत्युचे अंतर
काही क्षणांत मिटले
एका हिरव्या सुखाचे
आता निर्माल्य उरले

कुठे जाणिवा नेणिवा
नि:शब्दाचे सारे लेणे
कसे मातीच्या पान्ह्याने
आत उन्मळून येणे

ओल काळजात खोल
नाही सल ना बंधन
खुणा जन्मलेल्या कशा
अशा गेलेल्या पुसून

आता रूजून आलेल्या
वेळा नवीन जन्माच्या
कुठे फुलती नव्याने
कळ्या हळव्या श्वासाच्या

**- कविता झुंजारराव**

## संसार सुख

संपले का क्षण दु:खाचे
अंतरातून हाक आली
थांब अजून शब्दवेडे
भावनांची गर्दी झाली
अजून कित्ती परीक्षा बाकी
गाठले ते उतारवय
थांब अजून शब्दवेडे
करुन सांगतो विचारवय
हसता हसता सोसले ते
अजून किती सांग घाव बाकी
थांब अजून शब्दवेडे
मागतो मी खरच माफी
सोसवेना तरी सोसले ते
कल्पतरु हे ऊन्हात सुकले
थांब जरा तू शब्दवेडे
प्रारब्ध हे कुणा सुटले
क्षणिक सुखाला संसाराच्या
अजूनही ती आसुसलेली
थांब जरा तू शब्दवेडे
अजून कुठे ती हारलेली
या जन्मी सांग खरेच मिळेल का
अल्प संसार सुख तिला ?
थांब जरा तू शब्दवेडे
सांग...नकोस सोडू आशा तिला

**- निशा खरात-शिंदे**

## मासिकपाळी..

टपोऱ्या डोळ्यांत तुझ्या सखे
लाज आज का दाटून आली..
आज दिले दान तुला गं देवाने
खऱ्या अर्थाने तू आज बाई झाली..
वेदना,संवेदनाअन हसरी जखम
आज सुखाने तू पदरी बांधली..
आज दिले दान तुला गं देवाने
तनुने मातृत्वकला आज स्वीकारली..
नको बाळगूस लाज शरम तू
असे ही नैसर्गिक बदलाची..
आज दिले दान तुला गं देवाने
जाणीव फक्त आज परिपक्वतेची ..
सांगेल गोष्ट कुणी कावळा शिवल्याची
वा भीती तुजमुळे अपवित्र देवघराची..
आज दिले दान तुला गं देवाने
गरज तुला आज वैयक्तिक स्वछतेची..
घे नेहमीच सकस आहार तू
सोबतीला असावे बळ व्यायामाचे..
आज दिले दान तुला गं देवाने
नसावे कोणते नियम मासिकपाळीचे
घे विश्रांती, कर आराम थोडा तरी तू
असेल गोष्ट जरी चार दिसांच्या पाहुणीची..
आज दिले दान तुला गं देवाने
गरज सृष्टीला निकोप जन्मदात्रीची..

**- सीमा ह.पाटील**

# ब्युटी टीप्स

## फेस मास्क

त्वचेची स्वच्छता जितकी गरजेची आहे तितकीच त्वचेची काळजी घेणे गरजेचे असते. फेस मास्क हे त्वचेसाठी गरजेचे असतात. त्वचेला हवे असलेले घटक फेस मास्कमधून मिळतात. त्वचा अधिक चांगली करण्यासाठी, त्वचेला थंडावा देण्याचे काम फेस मास्क करते. कोणतेही ऑर्गेनिक फेस मास्क चेहऱ्याला एकदा तरी लावा. त्यामुळे त्वचा अधिक चांगली होण्यास मदत मिळते.

## एक्सफोलिएट

त्वचेची काळजी घेण्यामध्ये एक्सफोलिएट देखील येते. त्वचा स्वच्छ करण्यासाठी त्वचा स्क्रब करणे गरजेचे असते. बाजारात असे एक्सफोलिएटर मिळतात. ते तुम्ही नक्की वापरायला हवे. स्क्रब हे त्वचेच्या पोअर्समध्ये अडकवलेली घाण काढून त्वचा स्वच्छ करण्यास मदत करते. त्यामुळे त्वचा एक्सफोलिएट आठवड्यात एकदा तरी करा.

## सनस्क्रीनचा करा वापर

सनस्क्रीन हे त्वचेसाठी मस्ट असते. तुम्ही अगदी घरी जरी असलात तरी देखील तुम्ही मॉश्चरायझर नंतर सनस्क्रीन लावायलाच हवे. सनस्क्रीनमुळे तुमच्या चेहऱ्यावर एक संरक्षण कव्हर तयार होते. त्यामुळे त्वचेचे संरक्षण होते. उन्हात जाण्याआधी सनस्क्रीन लावायलाच हवे. त्यामुळे त्वचा चांगली राहते. हल्ली त्वचेच्या प्रकारानुसार सनस्क्रीन मिळतात. त्यामुळे तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार तुम्ही सनस्क्रीन निवडायला हवे.

## मेकअप करा रिमूव्ह

मेकअप तुम्हाला सुंदर करतो. घरच्या घरी मेकअप करून सुंदर दिसायला सगळ्यांना आवडते. हा मेकअप तुमच्या त्वचेवरून उतरवणेही तितकेच गरजेचे असते. मेकअप केल्यानंतर तो काढणेही गरजेचे आहे. कारण मेकअप हा त्वचेच्या पोअर्सच्या आत जाऊन बसतो. तो काढला नाही तर त्यामधील घटक त्वचेवर पिंपल्स आणण्यास कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे मेकअप काढायला कधीही विसरू नका.

# पाककृती

## नाचणी पिझ्झा



**साहित्य:** १०० ग्रॅम नाचणी पीठ, ७० ग्रॅम ज्वारी पीठ, १ कांदा ७–८ ठेचलेला लसूण, १ सिमला मिरची १ टोमॅटो,१ टेबल स्पून कोबी, २ चीझ क्यूब्स, ५० ग्रॅम पनीर तुकडे,१ टेबल स्पून चिंग शेजवान चटणी, २ टेबल स्पून टोमॅटो सॉस,१ टी स्पून अमूलबटर,चवीपुरते मीठ.

**कृती:** प्रथम सर्व भाज्या उभ्या कट करून घ्या. लसुन ठेचून घ्या.एका प्लेटमध्ये नाचणी पीठ व ज्वारी पिठात चवीपुरते मीठ टाका. तव्यावर पाणी टाकून गरम झाल्यावर पिठात टाका. व भरपूर मळून घ्या. चांगले मळल्यामुळे पीठास मऊपणा येतो. प्लेटमध्ये थोडेसे नाचणी पीठ भुरभुरून भाकरी जाडसर थापून घ्या. भाकरीच्या दोन्ही बाजू भाजून झाल्यावर गॅसवर फुगवून घ्या.भाकरी किंचित गरम असताना फुगलेल्या भाकरीचा वरील भाग अलगदपणे चाकूने कट करून घ्या. एका बाऊलमध्ये शेजवान चटणी व टोमॅटो सॉस मिक्स करून भाकरीचा पापुद्रा काढलेल्या भागात लावून घ्या.वरील पापुद्रा लावून वरील बाजूस तयार सॉस व अमूल बटर लावून घ्या.त्यावर चिरलेला कांदा, सिमला मिरची, कोबी, ठेचलेला लसूण, टोमॅटो सगळ्या भाज्या एकावर एक त्यावर पनीरचे तुकडे टाका व शेवटी भरपूर चीज किसून घ्या.गॅसवर निर्लेप तवा ठेवून त्यावर बटर टाका. नंतर तयार नाचणी पिझ्झा ठेवून झाकून मिडीयम गॅसवर तीन ते चार मिनिट ठेवा. चीज थोडेसे वितळते. नंतर एका प्लेटमध्ये काढून घ्या. आपला अत्यंत पौष्टिक हेल्दी पिझ्झा तयार....डिश सर्व्ह करताना – तयार नाचणी पिझ्झा त्याबरोबर टोमॅटो सॉस ठेवून सर्व्ह करा. यात भरपूर प्रमाणात विटामिन्स, कॅल्शियम, मिनरल्स मिळतात. असा हा नाचणी पिझ्झा लहान व मोठ्यांना आरोग्यवर्धक आहे. तुम्हीही नक्की करून पहाल....

## व्हेज सलाद



**साहित्य:** १ टोमॅटो बारीक चिरून,१ बीट बारीक चिरून,१ वाटी कॉर्न्स,१/२ हिरवी शिमला मिरची बारीक चिरून,१ वाटी बारीक चिरलेला लाल कोबी,१ वाटी बारीक चिरलेली सलाद पाने, १/२ पिवळी झुकीनी बारीक चिरून,१ टे. स्पून ऑलिव्ह ऑईल, १/२ टीस्पून मिरी पूड,१ टीस्पून इटालियन सिझनींग,१/४ टीस्पून मीठ,१ टे. स्पून मेयॉनीज.

**कृती:** प्रथम एका पॅन मधे ऑलिव्ह ऑईल थोडे गरम केले व त्यांत सलाद ची पाने सोडून इतर सर्व बारीक चिरलेल्या भाज्या घातल्या.नंतर त्यावर मिरी पूड, इटालियन सिझनींग व मीठ घालून छान परतवून घेतले. नंतर त्यांत चिरलेली सलाद ची पाने घालून सर्व एकजीव करून घेतले.नंतर त्यावर मेयॉनीज घालून हेल्दी सलाद मुलांना सर्व्ह केले.


## डोसा



**साहित्य:** ५० ग्रॅम तांदूळ,५० ग्रॅम उडदाची डाळ, ५० ग्रॅम नाचणी,५० ग्रॅम मका,५० ग्रॅम मुग, ५० ग्रॅम मटकी, दालचिनी आणि काळा मीरी, थोडे तेल.

**कृती:** वरील सर्व धान्य सहा ते सात भिजत ठेवणे भिजल्यानंतर ते वाटावे व परत सहा ते सात तास आंबवून त्याचे डोसे बनवावे खूप हेल्दी असे डोसे तयार.

## बीट भेळ



**साहित्य:** १/४ किलो मुरमुरे,१ टेबलस्पून मोड आलेले मूग, १ टेबलस्पून मोड आलेले चवळी १ टेबलस्पून खजूर उभे कापून,१ टेबलस्पून शेंगदाणे,१ टेबलस्पून दाळवा, छोटी काकडी चिरून,छोटा गाजर बारीक किसून, छोटा बीट बारीक किसून,१/२ वाटी कोथिंबीर बारीक चिरून२ टेबलस्पून चिंच गूळ पाणी, १/२ टेबलस्पून काळे मिरे पावडर,सिंधव मीठ चवीनुसार, ड्राय फ्रुट काप आवडी नुसार.

**कृती:** मुरमुरे स्वच्छ करून. सर्व जिनसा एका भांड्यात घ्यावे .सर्व जिन्नस एकत्र करून छान हेल्दी भेळ तयार.

## क्रिस्पी मखाने चिवडा

**साहित्य:**२ कप मखाने,२ चमचे शेंगदाणे, १ टेबलस्पून लाल तिखट व मीठ चवीनुसार,२ चमचे तूप.



**कृती:** प्रथम सर्व साहित्य एकत्र करून घ्या,मग एक कढई गॅसवर ठेवून ती गरम झाली की त्यात २ चमचे तूप घालून शेंगदाणे,मखाने घाला व मखाने क्रिस्पी होवू पर्यंत ते भाजून घ्यामखाने कुरकुरीत होवू पर्यंत भाजून झाले की त्यात लाल तिखट, मीठ घाला व सगळं छान मिसळून घ्या मग तयार झाला आपला हेल्दी, क्रिस्पी मखाने चिवडा, हा चिवडा उपवासाला देखील खाल्ला तरी चालतो

## पालक चीज पराठा



**साहित्य:** १ मध्यम पालकची जूडी,३–४ कप गव्हाचे पीठ, २ टेबलस्पून बेसन, ३ हिरव्या मिरच्या, तुकडा आल्याचा,१ टीस्पून लाल तिखट, १/२ टीस्पून हळद, मीठ चवीनुसार,१ टीस्पून गरम मसाला, १/२ टीस्पून जीरे पूड, १/२ टीस्पून धणेपूड, चिमूटभर ओवा, १/२ टेबलस्पून सफेद तीळ, तूप किंवा बटर,१/२ कप किसलेले चीज, चिली फ्लेक्स आवडीनुसार, पाणी गरजेनुसार.

**कृती:** पालकची पिने स्वच्छ धुवून गरम पाण्यात मिनिटभर बुडवून घ्या व ही पानं गाळून घ्या, ब्लेंडरमधे मिरची आलं घालून छान बारीक पेस्ट वाटून घ्या.एका मिक्सिंग बाऊलमधे वरील सर्व साहित्य आणि पालकांची पेस्ट छान एकत्र करून गरजेनुसार पाणी घालून कणीक मळून घ्या.तयार पिठाची पारी करून पुर्ण भरतो त्याप्रमाणे चीज आणि चिली फ्लेक्स घालून पारी बंद करून पोळी लाटावी.तवा गरम करुन त्यावर हा पराठा खमंग खरपूस भाजून घ्यावा व वरून तूप सोडावे. गरमागरम पराठा चटणी किंवा लोणच्यासोबत सर्व्ह करा.

## तुळशीच्या पानांची चटणी

**साहित्य:** तुळशीचे पाने, लिंबू, पुदिन्याची पाने, मीठ,हिरवी मिरची, कोथिंबीर, तेल, आलं.

**कृती:** एका भांड्यात कोथिंबीर, तुळशीचे पाने आणि पुदिन्याची पाने घ्यावी.त्यात बारीक हिरव्या मिरच्याची तुकडे टाकावीत. त्यात बारीक चिरलेलं आलं आणि चवीनुसार मीठ टाकावं त्यावर थोडं लिंबू पिळून घ्यावं आणि थोडं त्यात तेल टाकावं हे सर्व मिश्रण मिक्सरमधून बारीक करावं. तुळशीच्या पानांची चटणी तयार होईल.



With best compliments from



# M/s. Ankit Construction




Proprietor- Ankit Arun Bhaip

Email- ankitbhaip8988@gmail.com

Mob-9892408606/9892591606

Address- plot no.8, bldg no.5, flat no.1, Mount View Society, Bhawani Nagar, Marol Maroshi Road, Andheri East, Mumbai-400059


With best
compliments from
SAVANI
HERITAGE

# मे. वामन शंकर मराठे प्रा. लि. ठाणे
# व
# वामन शंकर मराठे ज्वेलर्स ठाणे

## सहर्ष सादर करीत आहेत



# अभिनव सुवर्ण संचय डिस्काऊंट योजना



**मे. वामन शंकर मराठे ज्वेलर्स प्रा. लि.**

**अभिवादन, १ला मजला, शिवाजी पथ, ठाणे (प.)**

**मोबाईल : ९००४००७९५०**



Happy दिवाली



**अवश्य भेट द्या : website : www.vsmarathe.com**

**Email : vsmarathe@gmail.com**





**APPROVED GOLD VALUER**
**(GOVT. OF INDIA)**

